म. ग्रं. सं. ठाणें
विषय निबंध
सं. नं.

# णि नीतिमत्ता

संपादक

**केशव लक्ष्मण किल्लेदार**

बी. ए., एल्एल्. बी.

विषय

१. आवश्यकता व महत्त्व.
२. बाल्यावस्था आणि गृहशिक्षण.
३. शील आणि शिक्षण.
४. शील आणि संसार.
५. शील आणि सत्कृत्य.
६. आत्मनिरीक्षण.
७. आत्मसंयमन.
श्रद्धा.
खुलासा.

REFBK-0001526

बळवंत गणेश दाभोळकर, ग्रंथप्रकाशक
४६८ नारायण पेठ, पुणें सिटी.

# शील आणि नीतिमत्ता

हा ग्रंथ

केशव लक्ष्मण किल्लेदार, बी. ए., एल्‌ एल्‌. बी.
वकील, डिस्ट्रिक्ट कोर्ट सोलापूर

ह्यांनीं लिहिला.

प्रकाशक

बळवंत गणेश दाभोळकर
४६८ नारायण पेठ, पुणें सिटी.

पुणें पेठ शनिवार मेहुणपुरा येथें, केशव रावजी गोंधळेकर
ह्यांनीं आपले " जगद्धितेच्छु " छापखान्यांत छापिला.

REFBK-0001526

शकवर्ष १८४०–इ० सन १९१८

# नीतिशास्त्राचीं मूलतत्त्व

सदहूं ग्रंथ हर्बर्ट स्पेन्सर नामक तत्त्ववेत्त्याच्या "Data of Ethics" ह्या ग्रंथाधारें प्रोफेसर चिंतामण गंगाधर भानु, बी. ए. ह्यांनीं लिहिलेला असून दक्षिणाप्राइज कमिटीनें पसंत केलेला आहे. तो सन १८९१ सालीं आह्मीं प्रथम छापला होता व त्या वेळीं त्याच्या प्रती वर्षभरांतच खपल्या. सदरील ग्रंथाची प्रत हल्लीं कोठेंहि मिळेनाशी झाल्यामुळें व कांहीं वाचक मागतात सबब त्याची दुरुस्ती करून छापविण्याचा विचार आहे. २०० ग्राहक मिळतांच छापण्यास सुरुवात करूं.

ग्रंथांतील विषय

१. आचरण ( सामान्यदृष्टया विचार ).
२. आचरणाचें सत्कार्य.
३. सदाचरण आणि दुराचरण.
४. आचरणपरीक्षणाचे मार्ग.
५. शारीरिकदृष्टया विचार.
६. जीवनशास्त्रदृष्टया विचार.
७. मानसशास्त्रदृष्ट्या विचार.
८. सामाजिकदृष्ट्या विचार.
९. टीका आणि स्पष्टीकरण.
१०. सुखदुःखाची सापेक्षता.
११. स्वहित विरुद्ध परहित.
१२. परार्थ विरुद्ध स्वार्थ.
१३. पुनःपरीक्षण व तोडजोड.
१४. एकवाक्यता.
१५. केवल आणि प्रासंगिक नीतिशास्त्र.
१६. नीतिशास्त्राची व्याप्ति.

आगाऊ वर्गणीदारांस २ रु. किंमत पडेल. वर्गणीदार होणारांनीं व्हीं. पी. चीं आर्डर देऊन ठेवावी.

बळवंत गणेश दाभोळकर, ग्रंथप्रकाशक
४१८ नारायण पेठ, पुणें सिटी.

श्रीमंत राजमान्य राजश्री

# योगेश्वर पांडुरंग देशपांडे
# अफझलपूरकर, जहागीरदार

ह्यांस हा ग्रंथ

त्यांचा परोपकारी व थोर स्वभाव, विद्याभिरुचि

इत्यादि गुणांस्तव

सन्मानपूर्वक नजर केला आहे.

# प्रस्तावना

व्यक्ति, कुटुंब, समाज अथवा राष्ट्र यांचा योगक्षेम नीटरीतीनें चालून त्यांची उन्नति होण्यास त्यांच्या शीलाची व नीतिमत्तेची योग्य वाढ होणें अत्यंत जरूर आहे. कोणत्याही राष्ट्राच्या ऱ्हासाचीं कारणें शोधूं लागल्यास, त्यांच्या मुळाशीं नैतिक ऱ्हासच आहे असें बहुतकरून दिसून येईल. नीति बिघडली म्हणजे आपत्ति येते; ती सुधारली म्हणजे सुखाचे दिवस येतात असा सामान्य नियम आहे. अशा या अत्यंत उपयुक्त विषयावर यथामति एक लहानसा ग्रंथ लिहून आपल्या मातृभाषेची थोडीबहुत सेवा करावी असा विचार मनांत आला. तथापि, असल्या कठीण विषयासंबंधानें लिहावयाचें काम सोपें नसल्यामुळें, त्या विषयावर लिहिण्याचा विचार करणें म्हणजे धाष्टर्यच होय असें वाटलें; व ' प्रांशुलभ्ये फले लोभादुद्बाहुरिव वामनः ' या कविकुलगुरु कालिदासाच्या उक्तीप्रमाणें स्थिति व्हावयाची अशी भीति वाटली. तथापि, वर सांगितल्याप्रमाणें, विषयाची उपयुक्तता व मातृभाषेची सेवा या दोन गोष्टींकडे लक्ष देऊन या विषयावर जे वेडेवांकडे चार शब्द सुचले ते सादर केले आहेत. अशा स्थितीमध्यें हा ग्रंथ लिहिला असल्यामुळें, त्यांत पुष्कळ दोष असणें अगदीं साहजिक आहे; यासाठीं सुज्ञ वाचक हंसक्षीरन्यायानें दोषांबद्दल क्षमा करून ते टाकून देतील व कांहीं मननीय भाग असल्यास त्याचा स्वीकार करितील अशी उमेद आहे.

या ग्रंथांत एकंदर प्रकरणें दहा लिहिलेलीं आहेत. पैकीं, पहिल्या प्रकरणामध्यें नीतिमत्तेची आवश्यकता व महत्त्व यांबद्दल सा-

मान्य विवेचन केलें आहे. बाल्यावस्थेमध्यें, प्रौढावस्थेमध्यें व सांसारिक अवस्थेमध्यें मनुष्याचे शीलावर, गृहांतील परिस्थितीचा, शिक्षणाचा व सांसारिक कर्तव्याचा, अनुक्रमें, कसा परिणाम होतो व मनुष्याचें शील बनविण्यास या अवस्थांचा कसा उपयोग होतो याबद्दलचें विवेचन दुसऱ्या, तिसऱ्या व चवथ्या प्रकरणामध्यें केलें आहे. नीतिमत्तेचा व सत्कृत्याचा परस्परसंबंध कसा असतो याविषयीं पांचव्या प्रकरणांत विचार केला आहे. आत्मनिरीक्षणबुद्धि, आत्मसंयमन व श्रद्धा या मानसिक गुणांची नीतिमत्तेची अभिवृद्धि करण्यासाठीं अत्यंत जरूरी आहे यासाठीं सहाव्या, सातव्या व आठव्या प्रकरणांमध्यें त्यांबद्दल विवेचन केलें आहे. नवव्या प्रकरणामध्यें समाजाचा व समाजनिर्बंधांचा नीतिमत्तेवर कसा जबरदस्त परिणाम होत असतो याबद्दल लिहून दहाव्या प्रकरणामध्यें मागील प्रकरणांतील विवेचनामध्यें उत्पन्न होणाऱ्या कांहीं शंकांचा खुलासा केला आहे. याप्रमाणें या पुस्तकाचीं प्रकरणें आहेत. हें पुस्तक स्वतंत्रच असल्यामुळें, त्यांतील प्रकरणें व मजकूर यांची जुळणी जशी वेडीवांकडी सुचली तशी करून तें बहुजनसमाजाच्या सेवेस सादर केलें आहे. अर्थात्, या विषयासंबंधानें या पुस्तकांत सूक्ष्म व तात्त्विक विवेचन नसून, नीतिमत्तेसंबंधानें स्थूल व सामान्य विचार ग्रथित केले आहेत.

प्रतिपाद्य विषयाच्या पुष्टिकरणार्थ ज्यांच्या ग्रंथांतून दाखले व उतारे घेतले आहेत त्या ग्रंथकारांचा नामनिर्देश ठिकठिकाणीं बहुतकरून केलाच आहे व या दाखल्यांचा व उताऱ्यांचा मला फार उपयोग झाला याबद्दल मी त्या सर्व ग्रंथकारांचा अत्यंत आभारी आहें. तसेंच, भगवद्गीता हा ग्रंथ मुख्यत्वेंकरून नीतिपर असल्यामुळें, या अमोलिक ग्रंथामधून ठिकठिकाणीं श्लोकांचीं अवतरणें घेतलीं आहेत; व त्या अवतरणांचें प्राकृत भाषांतर गीतारहस्यकार

गुरुवर्य टिळक यांनीं केलेलें बहुतकरून दिलें गेलें आहे त्याबद्दल मी त्यांचा अत्यंत ऋणी आहें.

हल्लींचे दिवस पुस्तक छापण्यास अत्यंत प्रतिकूल* असतांना देखील रा० रा० बळवंत गणेश दाभोळकर यांनीं मनावर घेऊन हें पुस्तक छापून प्रसिद्ध केलें याबद्दल त्यांचे आभार मानावे तितके थोडेच आहेत.

सोलापूर, ता० १९ जुलै १९१८ के० ल० किल्लेदार.

* ह्या पुस्तकाचा कागद पूर्वीं ५॥ रु. रीम मिळत असे; तो हल्लीं १९ रु. रीम आहे. प्रिंटिंग–बाइंडिंग महाग आहे. आणि एकंदरीनें महागाईच्या परिणामीं गिऱ्हाईक मिळण्याचीहि महागाई आहे. ब० ग० दा०

# अनुक्रमणिका

| प्रकरण | पृष्ठ |
| --- | --- |
| १. आवश्यकता व महत्त्व | १ |
| २. बाल्यावस्था आणि गृहशिक्षण | १९ |
| ३. शील आणि शिक्षण | ३७ |
| ४. शील आणि संसार | ५७ |
| ५. शील आणि सत्कृत्य | ७७ |
| ६. आत्मनिरीक्षण | ८९ |
| ७. आत्मसंयमन | १०१ |
| ८. शील आणि श्रद्धा | ११५ |
| ९. समाजनिर्बंध | १२९ |
| १०. कांहीं शंकांचा खुलासा | १३९–१४९ |

# शील आणि नीतिमत्ता

## प्रकरण १ लें

### आवश्यकता व महत्त्व

मना वासना दुष्ट कामा नये रे । मना सर्वथा पापबुद्धी नको रे ॥
मना सर्वथा नीति सोडूं नको हो । मना अंतरीं सारवीचार राहो ॥१

—रामदास

व्यक्ति असो किंवा कुटुंब असो, समाज असो अथवा राष्ट्र असो, या सर्वांचें कल्याण व सुख हीं मुख्यत्वेंकरून त्यांच्या शीलावर व नीतिमत्तेवर अवलंबून असतात. शील आणि नीतिमत्ता हीं कल्याण व सुख यांचें माहेरघर आहेत व अनीति ही दुःख व आपत्ति यांचें वसतिस्थान आहे. नीतिमत्तेपासून कल्याणप्राप्ति होते व अनीतीपासून आपत्ति निष्पन्न होते हा सिद्धांत, सर्वत्र व सर्वकालीं सत्य व अबाधित आहे. व्यक्ति, कुटुंब, समाज अथवा राष्ट्र यांचे शीलाचा व नीतिमत्तेचा ऱ्हास सुरू झाला म्हणजे त्यांच्या नाशास आरंभ झालाच म्हणून समजावें. कोणत्याही इमारतीची बळकटी तिच्या पायाच्या व खांबांच्या मजबुतीवर अवलंबून असते. शील आणि नीतिमत्ता ही राष्ट्ररूपी इमारतीचा पाया व खांबच आहेत; हीं ज्या मानानें कमी-अधिक उज्ज्वल असतील त्या मानानें राष्ट्राची मजबुती कमीजास्त असेल. इमारत बाहेरून कितीही टोलेजंग व सुंदर

दिसली तरी तिचे खांब कुजावयास लागले म्हणजे त्या इमारतीस ढांसळण्यास काय उशीर आहे ! त्याप्रमाणेंच नीतिमत्तेचा व शीलाचा ऱ्हास होऊं लागला म्हणजे समाज कमकुवत होऊन त्याचा नाश हा झालाच पाहिजे ! विस्तवांत बोट घातलें म्हणजे तें भाजलेंच पाहिजे; वांकडें व भलतीकडेच पाऊल पडलें म्हणजे शरीरास इजा झालीच पाहिजे; त्याचप्रमाणें, अनीतीचें आचरण सुरू झालें म्हणजे नुकसान हें पुढें वाढून ठेवलेलेंच आहे. दोन आणि दोन चार हा सिद्धांत जसा गणितशास्त्रांत खरा आहे, त्याप्रमाणेंच वरील सिद्धांत नीतिशास्त्रामध्यें खरा आहे. शरीरांतील रक्त दूषित झालें म्हणजे शरीरास नानाप्रकारचे रोग ग्रासून टाकतात व अखेर शरीर नाश पावतें; त्याचप्रमाणें, व्यक्ति, कुटुंब, समाज अथवा राष्ट्र यांचें जीवन-रुधिर जी नीतिमत्ता ती बिघडून अनीतीच्या रोगानें पछाडलें म्हणजे त्यांची सुस्थिति व स्थिरता नष्ट होऊन तीं धुळीस मिळतात.

मनुष्याची योग्यता सर्व प्राणिकोटींत श्रेष्ठ आहे याचें कारण त्याची बऱ्यावाईटाबद्दलची जाणीव अथवा तारतम्यबुद्धि हें होय. बरेंवाईट कृत्य व त्याचे परिणाम यांची जाणीव असल्यामुळें, वाईट कृत्याबद्दलची व त्याचे दुष्परिणामाबद्दलची सर्व जबाबदारी मनुष्यावर येऊन पडते.

आहार निद्रा भय मैथुनंच । सामान्यमेतत् पशुभिर्नराणाम् ॥
धर्मो हि तेषामधिको विशेषो। धर्मेण हीनाः पशुभिः समानाः ॥१

म्हणजे—आहार, निद्रा, भय, राग वगैरे शारीरिक व मानसिक विकारांचा पगडा जसा इतर प्राण्यांवर आहे तसा तो मनुष्यावरही आहे; परंतु मनुष्यास परमेश्वरानें तारतम्यबुद्धि विशेष दिली आहे त्यामुळें त्यास बऱ्यावाइटाचा व धर्म्याधर्म्याचा विचार करण्याचें सामर्थ्य प्राप्त झालें आहे; तसें तें इतर प्राण्यांमध्यें नाहीं. इतर

प्राण्यांमध्यें विशेष तारतम्यबुद्धि नसल्यामुळें, तात्कालिक शारीरिक गरजा अथवा मानसिक इच्छा तृप्त करण्याशिवाय त्यांचें कर्तव्य फारसें राहात नाहीं. खाणें, पिणें व तें मिळविण्याकरितां नैसर्गिक प्रवृत्यनुसार एकाद्या मार्गाचें अवलंबन करणें एवढेंच काय तें मनुष्येतर प्राण्यांचें कर्तव्य असतें. त्यांचें जीवित अगदी साधें व अकृत्रिम असतें. परंतु मनुष्याची गोष्ट तशी नाहीं. त्याची सुखवृद्धि करण्याची लालसा अति प्रबळ असल्यामुळें त्याचे व्यापार साधे व अकृत्रिम नसून ते कृत्रिम व अतिशय गुंतागुंतीचे झाले आहेत. आपल्या बुद्धिसामर्थ्यामुळें, मनुष्य अधिक सुख मिळविण्याचे खटपटींत रहातो व अधिक सुखाचीं साधनें उत्पन्न करीत असतो. दुसरी गोष्ट अशी कीं, मनुष्य हा समाजांत राहणारा प्राणी आहे. समाजांत राहून संघशक्तीच्या व आपल्या बुद्धिमत्तेच्या जोरावर, मनुष्यानें आपला अंमल सर्वत्र प्रस्थापित करून आपली जीवितयात्रा निष्कंटक व सुखकर अशी करून सोडिली आहे. तात्पर्य, मनुष्याचें तारतम्यज्ञान, त्याची सुखलालसा, त्याचें बुद्धिवैभव व संघशक्ति यामुळें इतर प्राण्यांप्रमाणें निवळ नैसर्गिक व साध्या व्यापारांमध्येंच न घुटमळतां, त्यानें कृत्रिम व सुखकर व्यापार उत्पन्न केले आहेत.

तारतम्यज्ञान, सुखलालसा, बुद्धिवैभव व संघशक्ति या सर्व गोष्टींमुळें मनुष्यानें आपल्या सुखाची वृद्धि केली आहे हें खरें; तथापि, त्याबरोबरच त्याच्यावर जबाबदारीही उत्पन्न झाली आहे. जितकी सोय तितकी गैरसोय असावयाची हा सृष्टीचा नियमच आहे. कृत्रिम जीविताबरोबरच तदनुषंगिक कर्तव्यें व जबाबदारीही उत्पन्न झाली. समाजांत राहिल्यामुळें सर्व सुखांचा उपभोग मनुष्यास घ्यावयास सांपडतो ही गोष्ट खरी; तथापि, त्याबरोबरच समाज व त्यांतील निरनिराळ्या व्यक्ति यांच्यासंबंधानें कर्तव्यही उत्पन्न होतें.

समाजामध्यें प्रत्येक मनुष्याचे निरनिराळ्या व्यक्तींशीं संबंध उत्पन्न झाल्यामुळें, त्यांच्याशीं कोणत्या प्रकारची वागणूक असावी याबद्दल विचार करणें जरूर आहे. आपल्या सुखाबरोबर दुसऱ्याच्याही सुखाचा विचार करणें जरूर असून सर्वांचेंच कल्याण कोणत्या मार्गानें होईल याबद्दल विचार करावयास पाहिजे. आईबाप, बहीणभाऊ, सोयरेधायरे, इष्टमित्र, समाज व राष्ट्र यांच्याबद्दल कर्तव्यांची ओळख करून घेऊन तदनुसार प्रत्येकानें वर्तन करण्याचा प्रयत्न केला पाहिजे. प्रत्येक मनुष्य हा स्वतंत्र प्राणी नसून त्याचें स्वातंत्र्य व स्वैरवर्तन यांस समाजांतील इतर व्यक्तींच्या संबंधांमुळें व तत्संबंधी कर्तव्यामुळें आळा घालणें जरूर असून, सार्वत्रिक कल्याणाची अभिवृद्धि होईल, अशी प्रत्येकाची वर्तणूक पाहिजे. वैयक्तिक, कौटुंबिक, सामाजिक व राष्ट्रीय कर्तव्य काय आहे, यांची पूर्णपणें ओळख करून घेऊन तदनुसार वागणूक ठेवणें, हें प्रत्येक मनुष्याचें कर्तव्य आहे. हरएक प्रसंगीं योग्य वर्तन ठेवून प्रत्येकानें आपली स्वतःची व सार्वत्रिक उन्नति व कल्याण करण्यासाठीं सतत खटपट केली पाहिजे. मनुष्यप्राणी सकृद्दर्शनीं जितका स्वतंत्र दिसतो तितका तो खास नाहीं. वैयक्तिक, कौटुंबिक, सामाजिक, राष्ट्रीय वगैरे कर्तव्यरज्जूंनीं त्यास जखडून टाकिलें आहे. कर्तव्याची योग्य बजावणी करूनच त्यानें या रज्जूंतून आपली मोकळीक करून घेतली पाहिजे. वर लिहिल्याप्रमाणें स्वतःचें व सार्वत्रिक कल्याण ज्या वागणुकीमुळें होतें त्या वागणुकीसच नीतीची वागणूक अथवा नीतिमत्ता म्हणावयाचें; व या श्रेष्ठ नीतिमत्तेची सतत व योग्य जोपासना करून तिची वाढ करणें, म्हणजे आपल्या शीलाची उन्नति करणें होय.

प्रत्येक सुव्यवस्थित समाजामध्यें, हल्लीं नीतिसिद्धांत ठरून गेले आहेत, व त्यांची जाणीव व ओळखही प्रत्येक समंजस मनुष्यास

असतेही. नीतीची वागणूक कोणती व अनीतीची वागणूक कोणती याची सामान्य कल्पना समंजस मनुष्यास असते; त्यामध्यें फारसा घोंटाळा नसतो; तथापि, प्रत्येक प्रसंगीं नीतिनियमांचा योग्य प्रतिपाल करून आपल्या नीतीची व शीलाची उन्नति करणें हें प्रत्येकाचें अत्यंत पवित्र असें कर्तव्य आहे.

उद्धरेदात्मनाऽत्मानं । नात्मानमवसादयेत् ॥

—भगवद्गीता

म्हणजे–प्रत्येकानें योग्य कर्तव्य करून आपली उन्नति करून घ्यावी; दुष्कृत्यें करून अधोगतीस जाऊं नये. मनामध्यें अनीतीच्या कल्पनांचा उठाव होऊं न देतां, नीतिनियमांचा योग्य प्रतिपाल प्रत्येक व्यक्तीनें केला पाहिजे. अनीतीला वश होऊन नीतिनियमांचा योग्य प्रतिपाल न होईल, तर अतिशय घोंटाळा उत्पन्न होऊन, समाजांत सार्वत्रिक अवनति होत जाऊन अखेर त्याची स्थिरता व सुस्थिति नष्ट होईल. पृथ्वीवरील सर्व स्थावरजंगम वस्तु गुरुत्वाकर्षणशक्तीमुळें, पृथ्वीस चिकटून आहेत, व त्यामुळें त्या वस्तूंमध्यें स्थिरता आहे; त्याचप्रमाणें नीतिनियमांचें योग्य प्रतिपालन झालें, तर जगाची सुस्थिति व स्थिरता कायम राहील. पृथ्वींतील गुरुत्वाकर्षणशक्ति नाहींशी झाली, म्हणजे सर्व चराचर वस्तु सैरावैरा इतस्ततः धांवत सुटतील, व अखेर कोठें तरी आदळून नाश पावतील; त्याचप्रमाणें, नीतिमत्तेचा योग्य प्रतिपाल झाला नाहीं, तर सर्वत्र बखेडा उत्पन्न होऊन मानवसमाज खालावत जाऊन अखेर नष्ट होईल ! अफाट समुद्रांतील गलबतामध्यें होकायंत्र नसलें म्हणजे त्याची दिशाभूल होऊन, तें भलत्याच मार्गानें जाईल व खडकावर आपटून त्याचा नाश होईल; त्याप्रमाणें, ज्या समाजामध्यें नीतिनियमांचें उल्लंघन होऊन अनीति वाढेल, तो समाज खा-

लावत जाऊन, त्यांत घोंटाळा व बखेडा उत्पन्न होऊन, अखेर नाश पावेल !

लौकिक संपत्तीपेक्षां नैतिक संपत्तीची श्रेष्ठता अधिक आहे. व्यक्तीस, कुटुंबास, समाजास अथवा राष्ट्रास द्रव्याची जरूर नेहमीं असतेच.

प्रपंचीं पाहिजे सुवर्ण । परमार्थीं पंचीकरण ॥

—रामदास

ही उक्ती यथार्थ आहे; इतकेंच नव्हे, तर द्रव्याभावामुळें, केव्हां केव्हां मनुष्याच्या नीतिमत्तेस धक्का बसून तो अनीतीचे मार्गासही प्रवृत्त होतो; तथापि, द्रव्य हें मनुष्याचें साध्य नाहीं; तें साधन आहे. मनुष्याचा योगक्षेम चालून त्याच्या कर्तव्याच्या व उन्नतीच्या मार्गामध्यें अडथळा न येतां, मार्ग द्रव्यामुळें सुकर व्हावा, याकरितां द्रव्याची जरूर आहे. वेदांमध्यें ऋषि प्रार्थना करितात कीं, हे देवा, आमचे चतुष्पाद प्राणी सुरक्षित ठेव; आमच्या यज्ञयागादि क्रिया निर्विघ्नपणें चालाव्या, कोणत्याही प्रकारचें विघ्न येऊं नये, याकरितां, आमचें धन जें गोधन त्याचा बचाव कर. यावरून वेदकालीन ऋषि द्रव्यास कर्तव्याचें व उन्नतीचें साधन म्हणून समजत असत असें स्पष्ट दिसतें. असो; शिवाय, लक्ष्मी ही चंचल आहे; ती आज आहे उद्यां नाहीं अशी तिची स्थिति आहे! जी अस्थिर व पराधीन वस्तु आहे तिची किंमत अर्थात् कमीच असणार ! म्हणूनच थोर पुरुष, संपत्ति येवो अथवा विपत्ति येवो, आपलें शील व नीतीचा मार्ग कधींही सोडीत नाहींत.

उदेति सविता ताम्रः । ताम्रएवास्तमेति च ॥
संपत्तौ च विपत्तौ च । महतामेकरूपता ॥ १

" सूर्य उगवतांना व मावळतांना तांबडाच असतो; संपत्ति येवो अथवा विपत्ति येवो, थोर पुरुषांचे वृत्तीमध्यें मुळींच फरक पडत

नाहीं " हें वचन अगदीं यथार्थ आहे. तसेंच, प्रसिद्ध कवि भर्तृहरि यानें आपले नीतिशतकांत नीतिमान् पुरुषांची थोरवी यथार्थ वर्णिली आहे. तो म्हणतो,

निन्दन्तु नीतिनिपुणा यदि वा स्तुवन्तु ।
लक्ष्मीः समाविशतु गच्छतु वा यथेष्टम् ॥
अद्यैव वा मरणमस्तु युगान्तरे वा ।
न्याय्यात्पथः प्रविचलन्ति पदं न धीराः ॥ १

" लोक निंदा करोत अथवा स्तुति करोत; लक्ष्मी येवो अथवा जावो; मृत्यु आज येवो अगर युगान्तरानें येवो; धैर्यवान् पुरुष नीतीचे मार्गापासून पाऊलभर सुद्धां ढळत नाहींत! " या श्लोकांत नीतिमत्तेची किंमत किती बरोबर अजमाविली आहे ! कोणत्याही स्थितींत, नीतिमार्गापासून बिलकुल च्युत होतां कामा नये, इतकी कडक ताकीद कवीनें आपणां सर्वांस केली आहे ! बरोबरच आहे; नैतिक संपत्ति हीच खरी व श्रेष्ठ संपत्ति; हीच मिळविण्याकरितां मनुष्यानें अविश्रांत श्रम केले पाहिजेत; यांतच मनुष्याचें मनुष्यत्व आहे; याप्रमाणें, नीतिमत्तेचें महत्त्व ओळखूनच मथळ्यांत लिहिलेल्या श्लोकामध्यें श्रीसमर्थ रामदासस्वामींनीं आपल्या प्रासादिक वाणीनें केव्हांही नीति सोडतां कामा नये असा मनास उपदेश केला आहे. तात्पर्य, नीतिमत्तेबद्दलचें उच्च ध्येय पुढें ठेवून, त्या ध्येयास पोंचण्याची खटपट करीत आपली संसारयात्रा मनुष्यानें चालविली पाहिजे.

नैतिक संपत्ति गौण मानून भौतिक संपत्ति हेंच मुख्य ध्येय आहे असें समजून मनुष्य वागणूक ठेवील, तर फारच घोंटाळा उत्पन्न होईल ! व नैतिक ऱ्हास होऊन नुकसान होईल ! साध्य साधनांचा विपर्यास झाला म्हणजे घोंटाळा व नुकसान होणारच ! शरीराचा जड भाग हा त्यांतील सूक्ष्म कल्पनामय भा-

गापेक्षां कमी दर्जाचा आहे, व जड भागाचें कोड पुरविणारी भौतिक संपत्ति, ही सूक्ष्म कल्पनामय भागाची अधिनियन्त्री जी नैतिक संपत्ति, तिच्यापेक्षां कमी दर्जाची असणार हें उघड आहे ! लौकिक संपत्ति हेंच ध्येय पुढें ठेवून, नैतिकधनास गौण स्थान दिलें, म्हणजे मनुष्य कोणतें पापाचरण करण्यास प्रवृत्त होणार नाहीं !

लोभश्चेदगुणेन किम् ।

—भर्तृहरि

" लोभ असल्यावर दुसरा दुर्गुण कोणता पाहिजे ! " लोभाच्या तावडींत सांपडून माणसांनीं अनन्वित कृत्यें काय कमी केलीं आहेत ! सर्व पेशवाईत सौंदर्याविषयीं नांवाजलेली, परंतु, जिचें अंतःकरण काळ्याकुट्ट विषानें भरलेलें होतें; राघोबादादास राज्यप्राप्ति व्हावी म्हणून ज्या बाईनें एवढा मोठा व्यूह रचला, व आपल्या सख्ख्या पुतण्याचा दुष्ट मारेकऱ्यांकडून जीव घेतला, त्या आनंदीबाईला राक्षसी कोण नाहीं म्हणणार ! राज्यलोभामुळें कोण घोर कृत्य हें ! राज्यलोभामुळेंच, कैकेयीचें अंतःकरण दगडासारखें घट्ट व निर्घृण बनलें नाहीं काय ! भरतास राज्यप्राप्ति व्हावी यासाठीं तिनें श्रीरामचंद्रास खडतर अरण्यवास पत्करावयास लावला कीं नाहीं ! प्रसिद्ध आंग्ल कवि शेक्सपिअर याचे ' हॅम्लेट ' नाटकांतील राजानें राज्यलोभामुळें आपल्या सख्ख्या भावाचा कसा खून केला, याबद्दलचें उत्तम चित्र कवीनें रेखाटलें आहे. इंग्लंडचा राजा जॉन यानें राज्यलोभामुळें, आपला सख्खा पुतण्या आर्थर यास किल्ल्यांत कोंडून ठेवून, अखेर दुष्ट व निर्दय मारेकऱ्यांकडून त्याचा जीव घेतला ! असो; पवित्र अशा सर्व नीतिनियमांस एकीकडे गुंडाळून ठेवून केवळ भौतिक संपत्तीकडेच दृष्टि दिली म्हणजे अनन्वित व मनुष्यत्वास काळिमा आणणारीं कृत्यें करण्यास मनुष्य तयार होईल यांत नवल तें काय ! परंतु, आपल्या अतुल नैतिक

तेजानें चमकणारा तारा शिवाजी महाराज, यांनीं आपला तेजसंपन्न व परमपूज्य गुरु रामदासस्वामी, यांना आपलें राज्य व दौलत देण्यास तयार व्हावें व स्वामींनींही महाराजांस राज्य व दौलत तत्क्षणींच परत देण्यास तयार व्हावें, हा प्रकार पाहिला म्हणजे, या गुरुशिष्यांपैकीं कोणाचें अधिक कौतुक व आश्चर्य करावें, हें कळेनासें होतें ! नैतिक धनार्जन हेंच ज्याचें ध्येय आहे, त्या पुरुषश्रेष्ठाच्या हातून श्रेष्ठ कृत्यें व्हावींत यांत नवल तें कसचें !

प्रसिद्ध इंग्रज ग्रंथकार स्माइल्ससाहेब यानें 'Character' ( सद्वर्तन ) नांवाचा सुंदर ग्रंथ लिहिला आहे त्यांत तो म्हणतो,

" Learning commands admiration, but character commands respect. "

म्हणजे, " विद्वान् मनुष्य आपल्या विद्वत्तेनें सर्वांस थक्क करून सोडील, परंतु, शीलसंपन्न पुरुष आपल्या नीतिमत्तेमुळें, लोकांमध्यें आदर उत्पन्न करतो. " विद्वत्तेचें तेज विजेसारखें मधून मधून चमकत राहतें, परंतु, नैतिक तेज हें शीतल चंद्रप्रकाशाप्रमाणें एकसारखें सर्वांना आनंद व सुख देत राहतें ! अंगांत विद्वत्ता असून त्या विद्वत्तेस नीतिमत्तेची जोड मिळाली, म्हणजे दुधांत साखर घातल्याप्रमाणेंच होणार आहे; परंतु, विद्वान् मनुष्यास नीतिमत्तेची जोड नसेल, तर ती विद्वत्ता केरांत गेल्यासारखी निष्फळ होणार आहे; तसल्या विद्वत्तेपासून मानवीसुखाची वृद्धि काय होणार आहे ? मेंदूच्या वाढीबरोबर अंतःकरणाची वाढ होणें जरूर आहे. श्रेष्ठ विद्वत्ता व श्रेष्ठ नीतिमत्ता एकवटून त्यांचा मिलाफ झाला तरच त्यापासून विशेष फायदा होण्याचा संभव आहे. शरीरांतील रक्त काळजांत जाऊन तेथें शुद्ध होऊन, नंतर तें सर्व ठिकाणीं जाऊन मेंदूस पोंचतें. काळजांतील शुद्ध व स्वच्छ अशा रक्तानें मेंदू पोसला गेला नाहीं, तर तो कमकुवत व निःशक्त होऊन जाईल; नि-

रोगी व निकोप राहणार नाहीं. त्याचप्रमाणें, अंतःकरणांतून द्रवणारा सद्गुणांचा मधुर रस बुद्धीमध्यें पसरला नाहीं, तर ती बुद्धि नीरस व रूक्ष राहून तिचा कांहींच उपयोग होणार नाहीं ! प्रसिद्ध इंग्रज तत्त्ववेत्ता लार्ड बेकनसाहेब याचें असें मत आहे कीं, कोणत्याही विद्येचा अथवा कलेचा उपयोग मानवजातीचे सुखाची व कल्याणाची वृद्धि करण्याकडे होईल, तरच, त्या विद्येची अथवा कलेची कांहीं किंमत आहे; नाहीं तर, त्या विद्येचा अथवा कलेचा काय उपयोग आहे ? उघडच आहे; करंड्यांत घालून ठेवलेली कस्तुरी कितीही सुवासिक असली, तरी जोंपर्यंत करंडा उघडून लोकांना तिचा परिमल मिळत नाहीं, तोंपर्यंत, ती असली काय किंवा नसली काय सारखीच आहे. तात्पर्य, बुद्धीचे विकासाबरोबर अंतःकरणाचा विकास झाला, तरच त्या बुद्धिमत्तेपासून उपयोग होणार आहे.

नीतिमान् पुरुषाचें वजन व त्याची कदर फार मोठी असते. श्रेष्ठ नीतिमत्तेचा प्रभावच असा आहे ! लोहचुंबकमणि लोखंडास आपल्याकडे खेंचून आणतो, त्याप्रमाणें नीतिमान् पुरुष दुसऱ्याचें अंतःकरण आपल्याकडे खेंचून घेतात. त्यांचेमध्यें आकर्षणशक्ति असते. त्यांचे ठिकाणीं अशी विलक्षण शक्ति असते कीं, त्यामुळें इतरांच्या अंतःकरणवृत्ति तल्लिन होऊन, त्यांचे मागें धांव घेतात ! नीतिमत्तेचें सामर्थ्यच तसें असतें; म्हणून, श्रेष्ठ नीतिमत्तेच्या माणसांच्या हातूनच मोठमोठीं कार्यें होतात. किंबहुना मोठमोठीं कार्यें नीतिश्रेष्ठ माणसांशिवाय होतच नाहींत. शिवाजी महाराज, आल्फ्रेड दि ग्रेट, जॉर्ज वॉशिंग्टन वगैरे श्रेष्ठ पुरुषांचीं चरित्रें वाचलीं, म्हणजे वरील विधानाच्या सत्यतेचा प्रत्यय येईल.

शिवाजी महाराजांची श्रेष्ठ नीतिमत्ता प्रसिद्धच आहे. एके वेळीं कल्याणचा सुभेदार मुलाणा अहंमद याचेकडून मोठा खजीना वि-

जापूर दरबारीं जात होता. तो खजीना लुटून महाराजांनीं राजगडावर नेऊन ठेवला. हा खजीना लुटल्यामुळें, कल्याणच्या मुलाण्याशीं महाराजांचें उघड वैर उपस्थित झालें; तेव्हां महाराजांनीं आबाजी सोनदेव यास त्याच्यावर पाठविलें. त्यानें जाऊन कल्याणवर छापा घालून तें सर केलें व मुलाणास कैद केलें; हें वर्तमान ऐकून, आनंद होऊन, महाराज जातीनें कल्याणास गेले. मुलाणास कैद केलें होतें त्यास सोडवून, महाराजांनीं त्याचा बहुमान केला व त्यास आदरपूर्वक विजापुरास रवाना केलें. पराजित झालेल्या शत्रूशीं किती थोरपणाचें वर्तन हें! याचेंच नांव श्रेष्ठ शील व नीति! असो; पुढील हकीकत महाराजांच्या उज्ज्वल नीतिमत्तेची उत्तम साक्ष पटविणारी आहे. आबाजीपंतानें लढाईच्या गर्दींत सदर मुलाणाची सून पकडून ठेविली होती. महाराज कल्याणास आल्यावर त्यांच्यापाशीं आबाजीनें असा अर्ज केला कीं, या लवाजम्यांत एक अति लावण्यसंपन्न तरुण स्त्री सांपडली आहे; ती महाराजांच्या सेवेस योग्य वाटल्यावरून ठेवून दिली आहे. हें ऐकून, महाराजांनीं त्यास आज्ञा केली कीं, ती सुंदर स्त्री सभेस घेऊन या. अशी आज्ञा होतांच, त्या कारभाऱ्यानें तिला चांगली नटवून सजवून सभेस आणिलें. तिला पाहून महाराज हंसले आणि म्हणाले कीं, या बाईच्या लावण्यासारखें आमच्या मातोश्रींचें लावण्य असतें तर आमचेंही रूप तिच्यासारखें झालें असतें. हें ऐकून सर्व लोकांस अचंबा वाटला. महाराजांच्या निग्रही वृत्तीचें सर्वांना मोठें नवल वाटलें. महाराज फार थोर पुरुष आहेत अशी सर्वांची खात्री झाली. नंतर महाराजांनीं त्या स्त्रीस वस्त्रालंकार देऊन मोठ्या इतमामानें तिचा सासरा विजापुरास गेला होता तिकडे पाठवून दिलें. काय थोर शील हें! असल्या श्रेष्ठ आचरणामुळें, महाराजांचें वजन व वचक वाढावा यांत काय आश्चर्य आहे! आणि असल्या नीति-

श्रेष्ठ पुरुषानें मोठमोठीं कार्यें हातीं घेऊन तीं तडीस न्यावींत यांत मुळींच आश्चर्य नाहीं. मोंगलांचे त्रासांतून महाराष्ट्रास मुक्त करणाऱ्या महात्म्याचें शील या प्रकारचें असावें यांत आश्चर्य तें काय आहे ? ज्या पुरुषानें आपल्या मनास पूर्ण ताब्यांत आणून ठेविलें, त्याला शत्रूंस ताब्यांत आणण्याचें काम कितीसें अवघड आहे ! ! अशाच प्रकारची हकीकत चिमाजीआप्पांनीं वसईचा किल्ला सर केला तेव्हां घडून आल्याचा इतिहासांत उल्लेख आहे. किल्ल्यास वेढा पडला असतां एका पोर्तुगीज सरदाराची बायको कांहीं शिपायांसह एका चोरदरवाज्यानें मचव्यांत बसून गोंव्यास चालली होती. तिला मराठ्यांच्या आरमारानें पकडून आप्पांकडे आणिलें; पण, आप्पांनीं तिचा बहुमान केला व पोषाख देऊन तिला परत किल्ल्याकडे पाठवून दिलें. आप्पांच्या ह्या उज्ज्वल नीतिमत्तेच्या प्रभावामुळें पोर्तुगीज लोकांचे मनावर अनुकूल परिणाम होऊन, आप्पांस अखेरीस यश आलें यांत नवल तें काय ? प्रसिद्ध जॉर्ज वाशिंग्टन हाही महानीतिसंपन्न पुरुष होऊन गेला. अमेरिकेच्या स्वातंत्र्याकरितां अठराव्या शतकांत जी लढाई चालू होती तिचें धुरीणत्व वाशिंग्टनकडेच होतें. त्याच्याच नेतृत्वाखालीं अडाणी व अशिक्षित अशा लोकांनीं विजयश्री संपादन केली. त्या लोकांस स्फूर्ति देणारा तोच नीतिश्रेष्ठ पुरुष होता म्हणून एवढा कार्यभाग झाला. लहान असतांना, माझें आवडतें बोरीचें झाड तूंच तोडिलें काय म्हणून बापानें प्रश्न विचारतां, होय बाबा, मींच तें तोडिलें असें निर्भयपणानें उत्तर देणाऱ्या सत्यनिष्ठ व धैर्यसंपन्न वाशिंग्टन याचे हातून वरीलप्रमाणें कृत्यें न व्हावींत तर तीं कोणाच्या हातून होणार बरें ? नीतिमत्तेचें सामर्थ्यच कांहीं विलक्षण आहे ! या सामर्थ्यापुढें व जोरापुढें शेंकडो हत्तींच्या जोराचा पाड काय आहे ? शिवाजी महाराज व जॉर्ज वाशिंग्टन यांच्यासारख्या नरश्रेष्ठांच्या नैतिक

प्रभावामुळें, हजारों लोकांनीं सत्कार्याकरितां आपले प्राण वेंचण्यास तयार व्हावें हें योग्यच आहे ! अंतःकरणास खेंचून ओढणाऱ्या जोरामुळें शरीर ओढलें जाईल यांत नवल तें कसलें ?

मागें सांगितलेंच आहे कीं, मनुष्यप्राणी स्वतंत्र नसून, त्याचा संबंध कुटुंबांतील व समाजांतील इतर व्यक्तींशीं असतो. शिवाय दुसरी गोष्ट अशी कीं, मनुष्य हा अनुकरण करणारा प्राणी आहे. मानवी-बुद्धि ही तीव्र असल्यामुळें, मनुष्याची अनुकरणशक्तिही मोठी असते. अशी स्थिति असल्यामुळें, प्रत्येक मनुष्याच्या बऱ्यावाईट कृत्याचा परिणाम हा निवळ त्याच्या पुरताच होत नसून, त्या परिणामांचें क्षेत्र विस्तृत होत जातें. कुटुंबांतील एक मनुष्य वाईट निघाला म्हणजे तो दहा माणसांनां बिघडविण्यास कारण होतो. आंब्याचे आढींत एक नासका आंबा असला तर तो वेळेला सबंध आढी नासून टाकतो. तसेंच, एक मनुष्य उत्तम नीतिसंपन्न बनला, म्हणजे तो सभोंवतालच्या दहा माणसांना आपल्या उदात्त वर्तणुकीनें सुधारतो. सत्कृत्याचे किरण व तेज बालार्काप्रमाणें फांकत जाऊन चोहोंकडे प्रकाश पाडतात, व उन्नतीचे मार्गास नेतात. जलाच्या संचयांत लाट उत्पन्न झाली, म्हणजे ती तेथेंच न थांबतां, सबंध जलसंचयास व्यापते; त्याप्रमाणें बऱ्यावाईट कृत्यांचे परिणाम संक्रमणशील व व्यापक असल्यामुळें, समाजांतील प्रत्येक व्यक्तीवर आपल्या बऱ्यावाईट कृत्याची फार मोठी जबाबदारी येऊन पडते. ही जबाबदारी प्रत्येक मनुष्यानें ओळखिली पाहिजे. माझा मी, मला दुसऱ्यांशीं काय करावयाचें आहे, असे शब्द कित्येक अजाण लोक वापरीत असतात; परंतु वस्तुस्थितीशीं त्यांचे म्हणण्याचा मेळ बसत नाहीं. आपल्या बऱ्यावाईट कृत्यापासून जें नफानुकसान होणार, तें आपल्यापुरतेंच खात्रीनें नाहीं, अशी मनास पक्की गांठ बांधून प्रत्येकानें सावधगिरीची वर्तणूक ठेविली पाहिजे.

बऱ्यावाईट कृत्याचे परिणाम केवळ कर्त्यापुरतेच होत नसून, ते अधिकाधिक क्षेत्र व्यापीत जातात; तसेंच, त्याचे परिणाम तत्कालीनच नसून, कमी-अधिक कालपर्यंत टिकतातही. यामुळें, त्याबद्दलची जबाबदारीही अर्थातच विशेष वाढत जाते, ही गोष्ट विसरतां कामा नये.

सतराव्या शतकांत, शिवाजी महाराजांनीं महाराष्ट्रांत जें नैतिक तेज उत्पन्न केलें, तें सर्व महाराष्ट्रभर पसरलें व महाराजांनंतर कित्येक वर्षेंपर्यंत तें तेज चमकत राहिलें, असें इतिहासावरून दिसून येईल.

राजाराम महाराज जिंजीला गेल्यावर, महाराष्ट्र मोंगलांना तेव्हांच बळी पडलें असतें, परंतु, राष्ट्रांत जें तेज उत्पन्न झालें होतें त्याच्या प्रखरतेमुळें, मोंगलांची डाळ मुळींच शिजली नाहीं. सुप्रसिद्ध प्रल्हाद निराजी सारखे कार्यक्षम, इमानी व राष्ट्रकल्याणतत्पर मुत्सद्दी व धनाजी जाधव व संताजी घोरपडे यांच्यासारखे राष्ट्रकार्याकरतां आपले प्राण वेंचणारे शिपाई बहाद्दर, यांनीं देव देव्हाऱ्यांत नसतां, मोंगलांस बिलकुल भीक न घालतां, राज्याचें संरक्षण केलें ! शिवाजी महाराजांनीं उत्पन्न केलेल्या प्रखर तेजाचाच हा परिणाम असें कोण नाहीं म्हणणार ! महाराजांनंतर बराच काल गेला तरी, त्यांनीं उत्पन्न केलेल्या तेजाची चमक कायम होती; म्हणूनच, तिच्या प्रकाशामुळें व प्रेरणेमुळें, या राष्ट्रसंकटास तोंड देण्याचें सामर्थ्य राष्ट्रांत राहिलें होतें ! सत्कृत्य ज्याप्रमाणें कमजास्त श्रेष्ठ दर्जाचें असेल, त्याप्रमाणें, त्याचें तेज कमजास्त कालपर्यंत चमकत राहून, सर्वांना प्रकाश देत राहतें ! संभाजी महाराजांचे कारकीर्दींत दुराचरणाचे मोठे काळेकुट्ट ढग नैतिक वातावरणामध्यें पसरले व त्यांनीं कांहीं कालपर्यंत अंधःकारही पाडला; तथापि, शिवाजी महाराजांनीं उत्पन्न केलेला तेजोरवि अति प्रखर

असल्यामुळें त्या सूर्यानें आपल्या अतुल तेजानें त्या ढगांस तेव्हांच हुसकटून लावून अंधःकार नाहींसा केला व पुन्हां पूर्ववत् आपल्या तेजानें तो तळपत राहिला !

शिवाजी महाराजांसारखा तेजसंपन्न तारा महाराष्ट्रांत उदय पावला, तो तरी अगदीं अकस्मात् उगवला असें कसें म्हणतां येईल? एवढी मोठी विभूति एकदम व अकस्मात् पैदा झाली, हें म्हणणें इतिहासाच्या तत्त्वांविरुद्ध होईल. महाराष्ट्रांतील नैतिक वातावरण पुष्कळ साधुसंतांच्या सत्कृत्यांनीं व सदुपदेशानें सतेज होत चाललेंच होतें; तेराव्या शतकांत ज्ञानदेव महाराजांचे काळांत, महाराष्ट्रांत जी एकदां धार्मिक व नैतिक पवित्र ज्योत पेटली, ती तशीच अखंड तेजानें पुढील तीनचारशें वर्षांत, चमकत राहिली ! या अवधींत, साधुपरंपरा उत्पन्न होऊन, पेटलेली ज्योत त्यांनीं आपल्या सद्वर्तनाच्या व सदुपदेशाच्या योगानें जास्तच सतेज केली, व या साधूंनीं महाराष्ट्र सतेज व सदाचारसंपन्न करून सोडिला ! महाराष्ट्रांत जर हें तेज चमकत राहिलें नसतें, तर, महाराजांमध्यें सुद्धां इतकें तेज कोठलें उत्पन्न होणार ! मूळ आडांतचं नाहीं तर पोहऱ्यांत कोठून येणार ! कारणाशिवाय कार्य कसें घडेल ?

सोळाव्या शतकांत यूरोपामध्यें जी धर्मक्रांति झाली, तिचाही इतिहास पाहिला म्हणजे वरील सिद्धांतांचें सत्यत्व दिसून येतें. सुप्रसिद्ध मार्टिन लूथरनें उपक्रम करून, जी धर्मज्योति उत्पन्न केली, ती पुढें बळावत जाऊन, हजारों लोकांस तिनें आपल्या प्रकाशानें उजेड पाडला व धर्माची शुद्धी करून लोकांस पवित्र केलें ! या धर्मक्रांतीनें किती मोठें क्षेत्र व्यापिलें, तिच्या ज्योतीची चमक किती सतेज होती व ती ज्योत किती दीर्घकालपर्यंत चमकत राहिली, हें इतिहासावरून दिसून येईल. तात्पर्य, बऱ्यावाईट कु-

त्यांचे परिणाम त्यांच्या महत्त्वाचे मानानें कमजास्त क्षेत्र व्यापून, कमजास्त कालपर्यंत टिकतात.

नीतिसंपन्न पुरुषास त्याच्या सदाचरणामुळें उत्कृष्ट समाधान व सुख यांचा लाभ होतो; व सदाचरणाचें क्षेत्र जितकें विस्तृत असेल, त्यामानानें समाधान व सुख यांचें क्षेत्रही वाढत जातें. उलट, दुराचरणी मनुष्याच्या दुराचरणाच्या इन्धनानें, त्याच्या हलक्या व नीच मनोवृत्ति पेटल्यामुळें, उत्पन्न झालेल्या ज्वालांनीं त्याच्या सर्वांगाचा दाहच होतो. पवित्र सत्कृत्याचा प्रकाश चंद्रप्रकाशाप्रमाणें आनंद देऊन, सदाचरणी मनुष्यास सुखरूप करूनच सोडतो ! सुप्रसिद्ध कवि शेक्सपीयर याच्या ' अथेल्लो ' नाटकांतील आयागोसारख्या दुराचरणी माणसाच्या मनाचें उद्घाटन केलें, तर असमाधान व दुःख, या इंगळ्यांनीं त्याचें मन व्यापलेलें आहे असेंच दिसणार ! दुष्ट मनोवृत्तींचें भारानें दडपून जाऊन, त्या अमलांत दुष्ट कृत्यें करणाऱ्या मनुष्यास, याशिवाय दुसरें काय फल मिळावयाचें आहे बरें ? मनुष्यांमधील परमेश्वरी अंश जी तारतम्यबुद्धि ती दुष्ट व दुराचरणी मनुष्यास त्याच्या दुष्कृत्यांबद्दल सतत डागण्या देत राहणारच !

इ० स० १८०९ सालीं ट्रॅफलगार येथें फ्रेंच आणि स्पॅनिश जहाजांचा पराभव करण्याकरतां ज्या शिपाईबहाद्दरानें अटोकाट प्रयत्न केले, ऐन दुर्धर प्रसंगींसुद्धां ज्यानें आपले लोकांस कर्तव्य करण्याविषयीं मोठ्या धैर्यानें प्रोत्साहन दिलें, " England expects every man to do his duty, प्रत्येकानें आपलें कर्तव्य केलें पाहिजे असें इंग्लंड देशाचें आग्रहाचें सांगणें आहे " असा ज्यानें बिकट प्रसंगींसुद्धां उदात्त उपदेश केला, त्या नेल्सननें, फ्रेंच आणि स्पॅनिश लोक यांचा पराभव करून, आपले राष्ट्राचा जयध्वज उभारला तेव्हां, त्यास अतुल सुख व समाधान प्राप्त होऊन,

मरणसमयींची आपत्ति सुद्धां त्या सुखाचे जोरावर त्यास सोसतां आली ! महाराष्ट्रांत स्वामिकार्यपरायण व शूर सरदार बाजी देशपांडे यानें विजापूरकरांच्या अफाट सैन्यास तोंड देऊन, व त्यास मोठ्या शौर्यानें थोपवून धरून, महाराज रांगणा किल्ल्यावर सुखरूप पोंचले असें ऐकल्याबरोबर, किती समाधानानें प्राण सोडला ! तात्पर्य, उच्च व श्रेष्ठ दर्जाच्या कृत्याच्या समाधानरूपी अमृतापुढें जडशरीराच्या मृत्यूचा काय पाड आहे !

---

# प्रकरण २ रें

## बाल्यावस्था आणि गृहशिक्षण

बालपणीं बालांची कोमलतरुतुल्य बुद्धि वांकेल ॥

पाण्याचें उगमस्थान जर निर्मळ व शुद्ध असेल, तर त्यांतून वाहणारा प्रवाह हा निर्मळ व शुद्ध असतो, व तें जर अशुद्ध व मलीन असेल, तर प्रवाहही अशुद्ध व मलीनच असतो; त्याचप्रमाणें, बाल्यावस्थेमध्यें मनुष्यास उत्कृष्ट नीतिशिक्षण मिळालें, व त्याचे मनावर उत्तम संस्कार घडले, तरच मोठेपणीं तो शीलसंपन्न व नीतिसंपन्न पुरुष होतो. मानवी आयुष्यांतील सर्व अवस्थांमध्यें, विशेषेंकरून बाल्यावस्थेंतच, मनुष्याचे मनावर बरेवाईट संस्कार होत असतात. सदाचरणाच्या अमृतरूप वृक्षाचें बीज बालपणींच पेरलें जातें; तसेंच, दुराचरणाच्या विषवृक्षाचें बीजही बाल्यावस्थेंतच पेरलें जातें. बाल्यामध्यें मनावर घडणाऱ्या संस्कारांवर जर मुख्यत्वेंकरून, मनुष्याचें शील अवलंबून आहे, तर लहान मुलांचे मनावर उत्कृष्ट संस्कार घडून त्यांचे कोंवळ्या मनास उत्कृष्ट वळण लागावें, यासाठीं, कुटुंबांतील प्रौढ माणसांनीं फारच खबरदारी घेतली पाहिजे. मुलांचें पालनपोषण करून त्यांचें संगोपन करणें, हें जसें आईबाप वगैरे कुटुंबांतील माणसांचें पवित्र कर्तव्य आहे, त्याचप्रमाणें, मुलांचें उत्कृष्ट शील बनेल अशी खबरदारी घेणें, हेंही त्यांचें अतिशय पवित्र कर्तव्य आहे. मुलांच्या शरीराच्या जोपासनेबरोबरच, त्यांच्या शीलाची जोपासना होऊन शरीराच्या सदृढतेबरोबरच शीलाचीही वाढ झाली पाहिजे.

मनुष्याचें बरेंवाईट शील बनतें तें मुख्यत्वेंकरून बाल्यावस्थे- मध्येंच बनत असतें; कारण, बाल्यावस्थेमध्यें मनुष्याची जिज्ञासा फार मोठी असते; जग आणि त्यांतील वस्तूंचें ज्ञान मिळविण्या- विषयीं बालांचें मन फार उत्सुक असतें; सभोंवतालच्या जगाशीं त्याचा अद्याप फारसा परिचय झालेला नसतो; प्रत्येक वस्तु नवीन व आश्चर्यकारक वाटून, तिजविषयीं ज्ञान मिळविण्याची उत्कंठा यांनीं युक्त अशा बालांच्या मनामध्यें ज्ञानाचे किरण फार झपाट्यानें प्र- वेश करितात. या अफाट संसारसागरांत लोटलेलें उत्कंठायुक्त असें बालांचें मन ज्ञानामृताचे घुटके भराभर घेत असतें. लहान बालकां- चे मनाची स्थिति स्वच्छ पाण्यासारखी असते. स्वच्छ पाण्यामध्यें कोणताही रंग मिसळला, म्हणजे तो रंग त्या पाण्यास चढतो; त्याचप्रमाणें, पूर्वग्रह-विरहित स्वच्छ व औत्सुक्यपूर्ण अशा बा- लांच्या मनावर झालेले संस्कार, बेमालूम दृढ व कायमचे उमटतात.

दुसरी गोष्ट अशी कीं, बाल्यावस्थेमध्यें मुलांची सारासारवि- चारशक्ति प्रौढ झालेली नसते. बरें-वाईट, खरें-खोटें, यांबद्दलचा निर्णय करण्याचें सामर्थ्य बालांमध्यें उत्पन्न झालेलें नसतें. विचार- शक्ति प्रौढ झाली नसल्यामुळें सभोंवतीं जें जें कांहीं पहावें, अथवा ऐकावें, त्या त्या गोष्टींचा ठसा मुलांचे मनावर उमटतो. सभोंव- तालच्या परिस्थितीची प्रतिमा मुलांचे मनावर जशीच्या तशी प्रति- बिंबित झालेली असते. सुविचार कोणते अथवा दुष्ट विचार कोणते, सद्वर्तन कोणतें व दुर्वर्तन कोणतें, याबद्दलची जाणीव व ओळख, अप्रौढ व अपरिपक्क बुद्धीच्या बालांस काय असणार आहे ? तीं सर्वस्वीं या बाबतींत सभोंवतालच्या परिस्थितीवरच अवलंबून अस- तात. सभोंवतालच्या स्थूल पदार्थांचें स्थूल ज्ञान होण्याइतकी लहा- नपणीं बुद्धीची शक्ति वाढत जाते हें खरें, परंतु, सारासारविचार जागृत होण्याइतका बुद्धीस पोक्तपणा व प्रौढपणा आलेला नसतो;

अशा स्थितींत, मुलांच्या शारीरिक जोपासनेबरोबर, त्यांची नैतिक जोपासना मातापितरादि वडील माणसांनींच केली पाहिजे.

दुसरी गोष्ट अशी कीं, मनुष्य हा अनुकरण करणारा प्राणी आहे; त्यांतूनही, बालपणीं बुद्धि प्रौढ झाली नसल्यामुळें, त्याची अनुकरण करण्याची प्रवृत्ति जोरदार असते.

यद्यदाचरति श्रेष्ठस्तत्तदेवेतरो जनः ॥
स यत्प्रमाणं कुरुते । लोकस्तदनुवर्तते ॥१

—भगवद्गीता

" श्रेष्ठ मनुष्य जसें आचरण करितो, तसेंच आचरण इतर माणसें करीत असतात; त्याचाच धडा इतर माणसें गिरवितात. " या भगवद्वचनाप्रमाणें, अज्ञजन सुज्ञांचें अनुकरण करितात, त्याच-प्रमाणें, लहान मुलेंही प्रौढ माणसांचें अनुकरण साहाजिकच करि-तात. बऱ्यावाइटाची जाणीव स्पष्ट होईपर्यंत, दुसऱ्याचें अनुकरण करण्याची प्रवृत्ति लहान मुलांस व्हावी हें साहजिकच आहे. तात्पर्य, मुलाची जिज्ञासा व उत्कंठा, त्याच्या बुद्धीची अपरिपक्वता व त्याची अनुकरणप्रवृत्ति, या सर्व कारणांमुळें, सभोंवतीं जी नैतिक परिस्थिति असते तिचें प्रतिबिंब त्याचे मनावर उमटत असतें. हवा शुद्ध व स्वच्छ असली, म्हणजे प्रकृति निरोगी राहते, त्याचप्रमाणें सभोंवतालचें नैतिकवातावरण शुद्ध असलें, म्हणजे मुलाचें शील चांगलें बनत जातें. हें सभोंवतालचें वातावरण म्हणजे मुख्यत्वेंक-रून गृहांतील वातावरण होय.

मनुष्याचे मनावरील बऱ्यावाईट संस्कारांचें आदिस्थान गृह हें आहे. मनुष्यामधील सद्गुणांचें अथवा दुर्गुणांचें बीज गृहामध्येंच पेरलें जातें. लहान रोपड्यांची प्रथम एक लहानशी बाग अथवा नर्सरी तयार करतात, व त्यांची नीट वाढ व्हावी, म्हणून तेथें

त्यांस खत व माती विशेष काळजीनें घालून, त्यांची जोपासना करतात, व रोपडीं नीट वाढीस लागून, थोडीं मोठीं झालीं, म्हणजे त्या बागेमधून काढून दुसरीकडे त्यांची लावणी करतात; त्याप्रमाणेंच, अफाट जगामध्यें व संसारामध्यें, स्वतंत्रतेनें वावरूं लागण्यापूर्वी, मुलांची योग्य जोपासना करून, त्यांची शारीरिक व नैतिक वाढ करण्याचें मुख्य ठिकाण गृह हें होय. लहान रोपड्यांस जसें वळण लावावें तसें लागतें; कुंभार घट घडवितो तेव्हां त्या घटास कोणताही आकार त्यास देतां येतो, तसेंच, लहान मुलांस गृहामध्यें जसें बरें-वाईट वळण लावावें तसें लागतें. रोपडें मोठें होऊन त्याचें झाड बनलें, म्हणजे त्यास लागलेलें वळण जात नाहीं, व मग त्याला निराळें वळण देण्याचें काम अवघड होतें; त्याप्रमाणें, गृहामध्यें मुलाचे मनावर बरेवाईट जे संस्कार घडतात, ते बळावत जाऊन, पुढें दृढ होतात, व मग त्या संस्कारांचें परिमार्जन करणें फारच दुर्घट काम होऊन बसतें. झाडांचीं मुळें खोल गेलीं, म्हणजे तें झाड उपटण्याचें काम फारच कठीण आहे; तें झाड हत्तीच्या सोंडेच्या आघातास सुद्धां मग दाद देत नाहीं; तसेंच, मुलांचे मनावर गृहामध्यें बरेवाईट संस्कार पक्के बिंबून गेले, म्हणजे ते वज्रलेपच होऊन बसतात. तात्पर्य, मनास बरेंवाईट कायमचें वळण लागण्यास मनुष्याच्या बाल्यावस्थेचा जो काल, तोच मुख्य काल होय; व बरेंवाईट कायमचें वळण लागण्याचें मुख्य ठिकाण म्हणजे गृह होय.

घरांतील ठिकठिकाची घाण काढून टाकून, त्यांतील हवा स्वच्छ ठेवणें, हें आरोग्यदृष्ट्या अवश्य आहे; घाण काढून टाकली नाहीं, तर, कुटुंबांतील माणसांच्या प्रकृतीस अपाय होईल; त्याप्रमाणेंच, गृहांतील नैतिकवातावरण शुद्ध ठेविलें पाहिजे; तें जर बिघडलें, तर नैतिकऱ्हास सुरू होऊन अनीतीचें प्राबल्य वाढत जाईल. गृहांतील अपरिपक्क बुद्धीच्या मुलांवर, या बिघडलेल्या नैतिकवाता-

वरणाचे फारच घातुक परिणाम होतात; कारण उघडच आहे; गृहांतील वडील माणसांचें साहजिक असलेलें मुलांवरील वजन, मुलांची त्यांच्याबद्दल असलेली आदरबुद्धि, त्यांचें मुलांवर असलेलें अतुल व निरपेक्ष प्रेम, मुलांची त्यांचेवर असलेली अलोट श्रद्धा व वडील माणसांशीं असलेला मुलांचा अखंड सहवास या सर्व गोष्टींमुळें, वडील माणसांप्रमाणें वर्तन करण्याची लहान मुलांस बलवत्तर प्रवृत्ति व्हावी ही अगदीं स्वाभाविक गोष्ट आहे. मुलांच्या वर्तनावर याप्रमाणें बलवत्तर परिणाम घडवून आणणारा इतका शक्तिसमुच्चय गृहाशिवाय दुसऱ्या कोणत्या ठिकाणीं सांपडणार आहे? गृहांतील हा प्रचंड जोर लहान मुलांचीं मनें आपल्याकडे खेंचून घेईल यांत नवल कसलें? मुलांचें कोंवळें मन या प्रचंड जोरानें दडपून जाऊन, तीं सर्वथैव वडील माणसांप्रमाणें बनलीं, तर त्यांत काय आश्चर्य आहे? कुंभारमाशी निराकार अशा कीटकाला सतत गोंगावण्यानें आपल्यासारखी माशी बनविते; त्याप्रमाणें, वडील माणसांच्या अखंड सहवासामुळें, मुलांचें मन तद्रूप होईल यांत काय संशय आहे? याच कारणामुळें, नीतीचें अथवा अनीतीचें बीजारोपण गृहांत होत असतें. मनुष्य बरा-वाईट निघणें हें गृहस्थितीवरच पुष्कळ अंशीं अवलंबून असतें. उत्तम नागरिक निपजणें हें उत्तम गृहस्थितीचें निदर्शक होय. दुष्ट व स्वार्थी लोकांमध्यें परपीडा करण्याची प्रवृत्ति बनते, तिचा ओनामाचा धडा गिरविण्यास घरांतच आरंभ झालेला असतो; व आपल्या सद्गुणरूपी सूर्याच्या तेजानें चमकणाऱ्या ग्रहांचें तेज घरांतच चमकत असतें; याप्रमाणें गृह हेंच सद्गुणांचें व दुर्गुणांचें आदिस्थान असल्यामुळें, तें अतिशय शुद्ध व निर्दोष असें ठेविलें पाहिजे.

प्रसिद्ध इंग्रज कवि व ग्रंथकार गोल्डस्मिथ साहेब म्हणतो कीं, गृह हें एक लहानसें राज्यच आहे. आईबाप वगैरे वडील मंडळी,

ही या राज्यांतील सत्ताधारी कामगार होत; व लहान मुलें हीं या राज्यांतील प्रजा होत. गृहांतील सत्ताधारी माणसांनीं आपल्यावर सर्वस्वीं अवलंबून असणाऱ्या आपल्या प्रजेचें कल्याण होईल, अशी खबरदारी घेऊन, आपल्या सत्तेची अम्मलबजावणी केली पाहिजे. त्यांनीं आपली वर्तणूक शुद्ध व उदात्त ठेवून, लहान मुलांचे कोंवळे मनावर तिचा उत्कृष्ट ठसा उमटविला पाहिजे. गृहांत ज्या सदसद्-वृत्तींचें बीजारोपण होतें, त्या पुढें अनुकूल संस्कारांनीं विकसित होत असतात. गृहांतील हें अतिशय महत्त्वाचें वृत्तिविकासाचें काम मातापितरादि मंडळीच्या आचरणावर अवलंबून असतें.

मुलांचें उत्कृष्ट शील बनविणें हें घरांतील मातापितरादि वडील माणसांचें फार पवित्र व श्रेष्ठ काम आहे खरें, परंतु मुलांचें संघटन आईशीं विशेष असल्यामुळें, या पवित्र कामाचा बोजा आईवरच विशेष येऊन पडतो; हें पवित्र कार्य बायकांना करावयाचें असल्या-मुळें, समाजामध्यें त्यांची योग्यता फार मोठी आहे. या मानवी शरीरांत बुद्धि हें विचारशक्तीचें मुख्य स्थान आहे, व अंतःकरण हें मनोवृत्तींचें मुख्य ठिकाण आहे. त्याचप्रमाणें, समाजामध्यें बुद्धीची उन्नति करून विचारशक्तीची वाढ करणें हें काम विशे-षतः पुरुषांचें आहे, व अंतःकरणवृत्ति उन्नत करून त्यांचा विकास करणें हें काम विशेषतः बायकांचें आहे. म्हणून, या समाजरूपी शरीरांतील अवयवांनीं आपापलीं कामें उत्तम रीतीनें बजावलीं, म्हणजे समाजाची उन्नति होऊन त्याचें कल्याण होणार आहे.

मुलांचें मन आपल्याकडे विशेष जोरानें खेंचून घेऊन आपल्या-सारखी मुलाची वृत्ति बनविण्याचें काम, माता ही सर्वांपेक्षां विशेष जोरानें करीत असते. आपल्याकडे खेंचून धरून, मुलाचे मनावर बरेवाईट संस्कार घडवून आणण्याचे कामीं मातेइतका कोणाचाच जोर होत नाहीं. मुलांच्या नैतिक वृत्तींवर मातेच्या आचरणाचा

फारच महत्त्वाचा परिणाम होत असतो; किंबहुना, मुलांचें नैतिक-जीवित मातेच्याच स्वाधीन असतें असें म्हटल्यास अतिशयोक्ति होणार नाहीं; व तें तसें स्वाधीन असणें हें मनुष्यस्वभाव व परमेश्वरनिर्मितसृष्टीची घटना, यांस अनुसरूनच आहे. गर्भसंभव-कालापासून मूल मातेच्या उदरीं राहून तिच्याच उदरांत तिच्याच अन्नरसानें वाढत असतें. मूल मातेशीं तदाकार बनलेलें असून, त्याचा पिंड मातेच्या देहांतच वाढत असतो. दोन जीवांचा इतका निकट संबंध दुसरीकडे कोठें सांपडणार! परमेश्वराच्या अतर्क्य लीला चोहोंकडे भरून गेल्या आहेत; त्यांमध्यें ही मातामुलांची निकट अवस्था व दृढसंबंध विशेष चमत्काराची गोष्ट आहे! मातेच्या उदरीं वाढून मूल जन्मास आलें, म्हणजे तें मूल मातेच्या प्राणापासून उत्पन्न झालेला जणूं काय दुसरा प्राणच होय! मग त्या मुलावर मातेचें निस्सीम प्रेम असावें हें साहजिकच आहे. जगामध्यें मातृप्रेमाची बरोबरी खरोखरच कोणतें प्रेम करूं शकेल? या मातेच्या निर्लेपप्रेमग्रंथीमध्यें परमेश्वरी अंश असतो असें म्हटल्यास खरोखर अतिशयोक्ति होणार नाहीं. असो; तेव्हां मातेच्या या निरपेक्ष व दैविक प्रेमामुळें, लहान मुलाचें मन तिजकडे ओढलें जावें यांत काय आश्चर्य आहे? व मातेच्या प्रेमरस स्रवणाऱ्या मधुर शब्दांचा व प्रेमळ वर्तनाचा परिणाम लहान मुलांचे मनावर विलक्षण व्हावा यांत नवल तें कसलें? मातृमुखानें निघालेला प्रेमळ व मधुर असा एक शब्द, दशसहस्र उपदेशकांच्या बोधप्रचुर व्याख्यांनाहून अधिक महत्त्वाचा आहे, असें एक वचन आहे तें अगदीं यथार्थ आहे. थोर व नामांकित अशा सत्पुरुषांचीं चरित्रें वाचलीं असतां, वरील विधानाची सत्यता सहज दिसून येईल. अखिल महाराष्ट्रांस आपल्या जगन्मान्य सत्कृत्यांनीं, ज्या पुण्यश्लोक पुरुषानें ऋणी करून सोडिलें आहे, त्या शिवाजी महाराजांस सत्कृत्याच्या ओना-

माचा धडा प्रथम परमसाध्वी माता जिजाबाई इनेंच शिकविला, असें इतिहासावरून दिसून येईल. महाराजांसारख्या थोर विभूति होऊन जातात त्यांच्यामध्यें प्रकृतिसिद्ध परमेश्वरनिर्मित अलौकिक गुण असतात; तथापि, त्यांची योग्य जोपासना होऊन विकास होण्यास अनुकूल परिस्थिति पाहिजेच आहे. शिवाजी महाराजांच्या मनांत सद्बोधामृताचें सिंचन जिजाबाई नेहमीं करी. महाराष्ट्रामध्यें गोब्राह्मणांस त्राहि त्राहि करून सोडणाऱ्या यवनांसंबंधानें महाराजांचे मनांत ती साध्वी योग्य द्वेष उत्पन्न करी. यवनांच्या निष्ठुर व अमंगल कृत्यांनीं त्रस्त व दीन झालेल्या महाराष्ट्राच्या दैन्याचें चित्र उत्कृष्ट तऱ्हेनें रेखाटून, ती महाबुद्धिमती जिजाबाई महाराजांच्या मनांत योग्य उद्वेग व क्रोध उत्पन्न करी. आधींच महाराज स्वभावतः तेजःसंपन्न पुरुष, त्यांत महासाध्वी माता जिजाबाई इचा तेजउद्दीपक उपदेश! मग काय विचारावें? दुधांत साखरच पडली! तात्पर्य, जिजाबाईसारखी परम सात्त्विक, भाविक, स्वाभिमानी व स्वोत्कर्षप्रिय माता शिवाजीमहाराजांसारख्या परम मातृभक्त व अत्यंत बुद्धिमान् पुरुषास सुदैवानें प्राप्त होऊन, तिच्या अति प्रेमळ बोधाचा ठसा त्यांच्या चित्तावर उत्कृष्ट उठला, म्हणून त्यांच्या हातून सर्व जगास थक्क करून सोडणारे पराक्रम घडले.

माता दुर्गुणी असली, तर ती दुर्गुणाचें बाळकडू मुलास लहानपणींच पाजतें. मग तें मूल पुढें दुराचरणी निघावें यांत काय आश्चर्य आहे? तथापि, सुव्यवस्थित समाजामध्यें दुर्गुणी माता क्वचितच असतात; व आपल्या मुलास जाणूनबुजून कुमार्गास नेणाऱ्या माता फारच कमी. आपलें मूल दुराचरणी निवून, त्याच्या बदनामीचा डंका चोहोंकडे वाजावा, अशी इच्छा मातांची असत नाहीं. मुलानें सद्गुणी होऊन सदाचरणानें आपला व आपल्या कुलाचा लौकिक आणि इभ्रत वाढवावी, अशीच इच्छा प्रत्येक सुज्ञ माता-

पितरांस असणें हें स्वाभाविक आहे. तथापि, बरेच वेळां, विशेषतः मातांच्या अजाणपणामुळें व अदूरदृष्टीमुळें, त्यांची वर्तणूक मुलांच्या नुकसानीस कारण होते. मुलांचें नुकसान व्हावें अशी त्यांची इच्छा खरोखर नसते; परंतु आपल्या विवक्षित वर्तनाचा लहान मुलांचे मनावर काय परिणाम होईल, याचा अजमास बुद्धिमांद्यामुळें त्यांना लागत नाहीं, व त्यामुळें अखेर मुलांचें नुकसान होतें! मुलानें एकादें गैरवाजवी कृत्य केलें म्हणजे त्याबद्दल फारशी नापसंती न दाखवितां, तें कृत्य उघडकीस येऊं नये, व त्याबद्दल विशेष गवगवा होऊं नये, म्हणून त्या कृत्यावर पांघरूण घालणेची संवय पुष्कळ मातांना असते, असें बरेच वेळां दिसून येतें. घरांतील पुरुषमंडळीच्या कानावर गोष्ट गेल्यास, त्याबद्दल आपल्या मुलाची खरडपट्टी निघेल ती टळावी, अशी बुद्धि अंधवात्सल्यामुळें उत्पन्न होते, व मग छपवाछपवीचा प्रकार सुरू होतो! परंतु असल्या छपवाछवीच्या प्रकारामुळें, मुलांना फाजील सवलत मिळून, त्यापासून अनिष्ट परिणाम होतात, हें या मातांच्या लक्षांत येत नाहीं! लहानपणीं मुलें स्वाभाविकपणें नादिष्ट असून, त्यांच्यामध्यें नादिष्टपणाचे प्रकार पुष्कळ असतात, याबद्दल पुष्कळांना अनुभव असेल; या नादिष्टपणाचे प्रकारास वेळींच आळा घालणें जरूर असतें; परंतु, वर सांगितल्याप्रमाणें, मातांच्या अंध-प्रेमामुळें, तो नादिष्टपणाचा प्रकार चव्हाट्यावर न येतां, तसाच छपला जातो, व हा अनिष्ट प्रकार वाढत जाऊन, तो अखेर मुलांस अपायकारक होतो. जरी रोग हलका असला, तरी तो रोगच; तो अंगांत मुरणें बरें नाहीं. वेळींच उपाय करून त्याचें मूळ अंगांतून काढून टाकण्याविषयीं खबरदारी घेतली पाहिजे; नाहींतर तो बळा-वतो. व्यवहारांत असे अनेक प्रसंग येतात कीं, मुलांच्या नादिष्ट-पणाच्या व गैरवाजवी वर्तनामुळें, त्यांची वेळींच थोडीबहुत कान-उघाडणी करणें जरूर असतें; डोळेझांक करून चालत नाहीं. अशी

स्थिति आहे, तरी छपवाछपवीच्या प्रकारामुळें, मुलांची कानउघाडणी करण्यास संधि मिळत नाहीं, व तशी संधि कदाचित् मिळालीच, तर मातेचा थोडाबहुत आधार व पाठिंबा आहे असें मुलास वाटत असल्यामुळें, मूल त्या क्षुल्लक खरडपट्टीस फारशी भीक घालीत नाहीं ! हा प्रकार अनिष्ट आहे. मातेच्या स्वाभाविक प्रेमास वेळेनुसार थोड्याशा कडकपणाची जोड असणें जरूर आहे. साखरेंत मिसळलेली क्विनाईनची गोळी ज्वर कमी करते. आम्रफलाच्या रसाचें माधुर्य थोड्याशा मिठाच्या मिश्रणानें अधिकच वाढतें. त्याचप्रमाणें, प्रेम आणि दूरदृष्टि यांचा मिलाफ झाला, तरच विशेष फायदा होणार आहे. आईबापांच्या फाजील लाडांमुळें व अनिष्ट डोळेझांकीमुळें, काय थोडीं मुलें बिघडतात? ‘ हरि आणि त्रिंबक ’ हा ग्रंथ वाचल्यास, फाजील लाड व डोळेझांक यांमुळें मुलें कशीं बिघडतात, हें दिसून येईल.

कुटुंबांतील मंडळींशीं प्रेमानें वागण्यास लहान मुलांस शिकविलें पाहिजे. मातापितरादि वडील माणसांवरील भक्तीचें तसेंच बंधुप्रीतीचें महत्त्व लहान मुलांच्या कोंवळ्या मनावर बिंबविलें पाहिजे. मुलांचे अंतःकरणास, ममतेनें वागण्याची कायमची संवय व वळण लागेल, अशी सतत खटपट केली पाहिजे. परमेश्वरानें घरांतील आप्तमाणसांचा परस्परांशीं निकट नैसर्गिक संबंध जुळवून आणला आहे, व एका रक्तमांसाचे पिंड बनल्यामुळें, त्यांचा जणूं काय एकजीव झालेला आहे. अशी स्थिति असल्यामुळें, त्यांचें परस्परांवरील प्रेम वृद्धिंगत होत गेलें, तरच परमेश्वराच्या हेतूस व इच्छेस अनुरूप वागणूक केल्याचें श्रेय मिळेल. मातापितरादि वडीलधाऱ्या माणसांच्या तंत्रानें वागलें असतां, आपलें सर्वस्वीं कल्याण होणार आहे, अशी दृढ भावना व श्रद्धा मुलांचे मनांमध्यें उत्पन्न करून, तदनुसार वर्तणूक करण्याची शिस्त त्यांना लावून दिली पाहिजे. या मातृ-

भक्तीमध्यें व पितृभक्तीमध्यें सर्व प्रकारच्या भक्तीचें व प्रेमाचें बीज आहे. राष्ट्रप्रेम, स्वामिभक्ति, परमेश्वरभक्ति वगैरे प्रकारच्या उच्च मनोवृत्तींचे धडे प्रथम घरांतच गिरवावे लागतात. जो आईबापांस मोजीत नाहीं, तो दुसऱ्यास काय मोजणार आहे ? ज्याचें अंतःकरण मातृप्रेमानें व पितृप्रेमानें भरून जात नाहीं, त्याचें अंतःकरणामध्यें परमेश्वरभक्तीची लाट कधीं तरी उत्पन्न होईल काय? भक्तीच्या व प्रेमाच्या उच्च भावनेचे संस्कार घरांतच जर उत्पन्न झाले नाहींत, तर ते पुढें केव्हां व कोठें उत्पन्न होणार? देशाचे कल्याणाकरितां वेळेनुसार आपले प्राणसुद्धां वेंचण्यास तयार होणें हें उत्कृष्ट नागरिकांचें लक्षण होय; परंतु, अंतःकरणांत उज्ज्वल प्रेम उत्पन्न झाल्याशिवाय, ही श्रेष्ठ भावना कोठून उत्पन्न होणार ? इतक्या श्रेष्ठ दर्जाची प्रेमवृत्ति एकदम कशी उत्पन्न होईल बरें? अशा प्रकारच्या उन्नतस्वरूपाच्या भक्तीचें बाळकडूं घरांतच पाजावें लागतें. श्रेष्ठ व नामांकित नररत्नें होऊन गेलीं, त्यांच्यामधील उज्ज्वल भक्तीचा अंकुर प्रथमतः गृहांतच उद्भवलेला होता असें म्हणण्यास हरकत नाहीं. शिवाजी महाराजांची मातृभक्ति प्रसिद्धच आहे. साध्वी जिजाबाईचा शब्द अत्यंत वंद्य व अनुल्लंघनीय अशी महाराजांचे मनाची पूर्ण भावना असे. महाराज कोणत्याही महत्त्वाचे कामास आरंभ करीत, तेव्हां प्रथम आपल्या परमपूज्य मातोश्रीचा आशीर्वाद घेत असत. ज्या पुरुषामध्यें इतकें उज्ज्वल प्रेम, इतकी उत्कट भक्ति आहे, त्यास यशप्राप्ति व्हावी यांत काय आश्चर्य आहे? भक्तीचा व प्रेमाचा मोड, गृहांत, एकदां मनामध्यें उगवला, म्हणजे नैतिक उन्नतीचा भक्कम पायाच घातला असें होणार आहे. लहान बालकाचें मन लहानपणीं नीरस व प्रेमरहित राहिलें, म्हणजे कोणत्याही सत्कृत्यास आवश्यक अशी प्रेमप्रचुर मनोवृत्ति, त्याच्यामध्यें पुढें कशी उत्पन्न होणार ? गृहांतील आप्त व जिव्हाळ्याच्या

माणसांवर ज्याचें प्रेम नाहीं, ज्याचें अंतःकरण त्यांच्याबद्दल कळवळत नाहीं, ज्याला त्यांच्या दुःस्थितीबरोबर पीडा होत नाहीं, त्याच्या हातून दुसऱ्याचें अथवा समाजाचें कल्याण काय होणार आहे ? आप्तजनांसंबंधानें मनामध्यें आदर नसून, जे लोक सार्वजनिक कल्याण साधण्याचा बहाणा करितात, त्यांच्यामध्यें कितपत खरेपणा आहे, हें कळणें अवघड आहे. तात्पर्य, निष्कलंक, शुद्ध व उज्ज्वल अशा प्रेमांकुराचा प्रादुर्भाव घरांतच व्हावा लागतो; त्याच प्रेमांकुराचा कालानें वृक्ष बनतो, व आपल्या छायेनें लोकांच्या तापाचें शमन करतो.

"Charity begins at home"

" भूतदयेचा उगम घरामध्यें होतो " अशी इंग्रजींत म्हण आहे ती यथार्थ आहे.

गृहामध्यें मुलांचे अंतःकरणावर प्रेमाचे उदात्त संस्कार होऊं लागले, म्हणजे त्यांची नैतिकउन्नति होण्यास काय उशीर आहे? मानवी अंतःकरणाची स्थिति अशी आहे कीं, एकदां त्यावर उत्कृष्ट संस्कार होऊं लागले, म्हणजे त्याची पीछेहाट होत नाहीं; उन्नतिच होत जाते; कारण, अंतःकरण पवित्र व उदात्त अशा प्रेमानें व्याप्त होऊं लागलें, म्हणजे त्या अंतःकरणांत अनीतिप्रवर्तक विकारांचें प्राबल्य कसें होईल ? जेथें खरेंखुरें प्रेम आहे, तेथें द्वेषासारख्या दुर्विकारांस थारा कोठून मिळणार ? लहानपणीं बहीणभावंडांनीं गुण्यागोविंदानें एकमेकांशीं वागून आपला परस्परांवरील प्रेमाचा अंकुर वाढूं दिला, तर त्यांचेमध्यें प्रौढपणीं भांडणतंटे उत्पन्न होण्यास कोठून अवसर मिळेल? पण, समाजामध्यें या बाबतींत कित्येक वेळां फारच शोचनीय स्थिति दिसून येते! सख्खे बंधु एकमेकांचे केव्हां केव्हां कट्टे दुष्मान होऊन बसतात! एकास पाहिल्यावर दुसऱ्यास खाऊं कां गिळूं, असें होऊन जातें! केव्हां केव्हां तर

एकमेकांचा नाश करण्यास सुद्धां ते उद्युक्त होतात! एका हाडामांसाच्या मानवी पिंडांनीं मनुष्यजातीस काळिमा आणणारीं कृत्यें करण्यास तयार व्हावें, यापेक्षां शोचनीय व हानिकारक स्थिति दुसरी क्वचितच असेल! 'काका, काका,' म्हणून जीवाकरितां टाहो फोडणाऱ्या आपल्या सख्ख्या राजबिंड्या पुतण्याला, दुष्ट व मांगहृदयी मारेकऱ्यांच्या खुशाल स्वाधीन करण्याची खंती पेशवा राघोबादादा यास कशी वाटली नाहीं बरें? सगळ्या पेशवाईस काळोखी आणणारें व मानवीबुद्धीचा अपमान करणारें असलें कृत्य, राघोबादादास कसें करवलें? याचें कारण बंधुद्रोह व भाऊबंदकी याशिवाय दुसरें काय असणार! लहानपणीं अंतःकरणांत बंधुबंधूंमध्यें परस्पर-प्रेमाचा झरा उत्पन्न झाला असता, तर असला अंगावर शहारे आणणारा प्रसंग ओढवला असता काय? कारण, ज्या अंतःकरणांत शुद्ध व पवित्र प्रेम उत्पन्न झालें, तेथें या प्रकारचीं नीच कृत्यें करण्याची प्रवृत्ति कशी उत्पन्न होईल? ज्या अंतःकरणांत पवित्र प्रेम नाहीं, त्यामध्येंच नानाप्रकारच्या पापवासना व स्वार्थप्रेरित विचार आपला शिरकाव करितात! मानवी अंतःकरणाची सत्ता शुद्ध व पवित्र अशा प्रेमाच्या ताब्यांत असल्यास, बंडखोर स्वार्थाची काय मात्रा चालणार आहे? परंतु जें अंतःकरण नीरस व प्रेमरहित आहे, त्यांत स्वार्थाचें वर्चस्व होऊन, त्याचें पर्यवसान बंधुद्रोहामध्यें व्हावें यांत काय आश्चर्य आहे? अशी स्थिति असल्यामुळें, घरांतील मातापितरादि वडील माणसांनीं मुलाची स्वाभाविक प्रवृत्ति कशी आहे याचें नीट पर्यालोचन करून, ती दोषयुक्त असेल, तर वेळींच त्यामधील दोष काढून, अंतःकरणांत बंधुप्रीतीचा झरा उत्पन्न करण्याची खटपट केली पाहिजे. घरांतील वडील माणसांनीं डोळ्यांत तेल घालून, मुलांच्या वर्तणुकीवर सक्त नजर ठेविली पाहिजे. स्वार्थबुद्धि ही स्वाभाविकपणें प्रत्येक मुलाच्या स्व-

भावांत थोडीबहुत असावयाचीच. या स्वाभाविक स्वार्थबुद्धीला मर्यादशीर आळा घालून, परस्परांवरील मुलांचें प्रेम दिवसानुदिवस वृद्धिंगत होईल, अशी काळजी सदैव बाळगून, केव्हां ममतेनें, केव्हां कोपयुक्त मुद्रेनें, केव्हां कानउघाडणी करून, वेळेनुसार शिक्षेनें, मुलांस सदैव वाटेवर ठेवण्याची वडील मंडळींनीं खटपट केली पाहिजे. या महत्त्वाच्या कामामध्यें थोडीसुद्धां हयगय होतां कामा नये. स्वार्थरूपी सापाच्या पिलाचा लहान मुलांचे मनामध्यें थोडा का शिरकाव झाला, कीं त्याचा मोठा विषारी सर्प हां हां म्हणतां झालाच असें समजावें.

घरांतील मंडळीची प्रत्यक्ष वर्तणूक पाहून, लहान मुलांचे मनावर नीतिदृष्टया बरेवाईट परिणाम फार जलद व कायमचे होत असतात, हें कुटुंबांतील प्रौढ माणसांनीं लक्षांत ठेविलें पाहिजे. शंभर वेळां मुलांस तोंडानें सदुपदेश करण्यापेक्षां, एक वेळ त्यांस प्रत्यक्ष सद्वर्तन पाहावयास सांपडलें, तर त्या सद्वर्तनाचा मुलांचे मनावर विशेष अनुकूल परिणाम घडतो.

" Example is better than precept. "

" उपदेशापेक्षां प्रत्यक्ष उदाहरण चांगलें " अशी इंग्रजींत म्हण आहे, ती अगदीं बरोबर आहे. कोरड्या शब्दांची किंमत लहान मुलेंसुद्धां तेव्हांच अजमावतात! बहीणभावंडांनीं एकमेकांशीं न भांडतां प्रेमानें वागावें, म्हणून उपदेश करावयाचा; व इकडे कुटुंबांतील प्रौढ माणसांनीं आपापसांत भांडण-तंटा करावयाचा; अशी स्थिति आपण घरामध्यें पुष्कळ वेळां पाहात नाहीं काय? या भांडणाच्या प्रत्यक्ष व ढळढळीत धड्यापुढें नुसत्या कोरड्या उपदेशाचा काय परिणाम होणार आहे? तसला उपदेश कुचकामाचा होऊन जातो. सासवासुनांचे, जावाजावांचे व भावाभावांचे तंट्यांपासून लहान मुलें काय शिकतील बरें? भांडणापासून कसें भांडावें हाच हानिकारक

धडा मुलें शिकणार ! तसेंच कुटुंबांतील प्रौढ माणसांनीं मुलांस नेहमीं ममतेनें व निःपक्षपातानें वागविलें पाहिजे; कारण, पक्षपातानें मुलांचीं मनें मत्सरयुक्त होऊन परस्परांचें परस्परांवरील प्रेम उडून जातें. मुलांमध्यें परस्पर मत्सर वाढूं लागला म्हणजे त्याची झळ वडील माणसांपर्यंत केव्हां केव्हां जाऊन पोंचते; व अखेर कुटुंबांतील प्रेम लोपून ऐक्यभाव नष्ट होतो ! सारांश घरांतील प्रौढ माणसांचें प्रत्यक्ष वर्तन हें चोख, उदार, निःपक्षपाताचें, स्वार्थरहित, शुद्ध व सरळ असें असावें लागतें; त्यांत थोडा का फरक पडत गेला म्हणजे त्या वर्तणुकीचा लहान मुलांचे मनावर फार अनिष्ट परिणाम होतो! समदृष्टि व प्रेम नष्ट होऊन, त्यांची नैतिक अवनति तेव्हांच सुरू होते. घर हें शांति, प्रेम व समता यांचें वसतिस्थान असावयास पाहिजे. वातावरणामध्यें प्राणवायु व इतर वायु यांचें योग्य प्रमाण आहे, म्हणून वातावरणाची शुद्धि व स्वच्छता कायम राहून, तें सुखकारक होतें; परंतु वायूंचें प्रमाण बिघडलें म्हणजे हवा बिघडून तिच्यामध्यें जिवास घातुक असें विष उत्पन्न होऊन, तें अपायकारक होतें; त्याप्रमाणेंच, घरांतील नैतिकवातावरणांत जोंपर्यंत प्रेम व समता यांचें साम्राज्य आहे, तोंपर्यंत, नैतिकशुद्धि कायम राहते; परंतु प्रेम व समता यांचें प्रमाण बिघडलें, म्हणजे नीतिमत्तेचा व शीलाचा सार्वत्रिक ऱ्हास सुरू होतो.

घरांतील प्रौढ माणसांच्या वर्तनाकडे व विशेषेंकरून आईबाप यांचे वर्तनाकडे मुलांचें विशेष लक्ष असतें, व त्यांचा कित्ता साहजिकच तीं गिरवीत असतात; याकरितां आई व बाप यांची परस्परांशीं व इतरांशीं फार व्यवस्थित रीतीची वागणूक असावी लागते. पति व पत्नी यांचें परस्परांविषयीं वर्तन प्रेमाचें, आदराचें व मर्यादेचें असेंच असलें पाहिजे. प्रसिद्ध कवि भवभूति यानें आपल्या

' उत्तररामचरितम् ' या नाटकामध्यें पतिपत्नीच्या परस्परसंबंधाचें रहस्य फारच मार्मिकपणानें वर्णिलें आहे. कवि म्हणतो,

अद्वैतं सुखदुःखयोरनुगुणं सर्वास्ववस्थासु या ।
विश्रामो हृदयस्य यत्र जरसा यस्मिन्नहार्यो रसः ॥
कालेनावरणात्ययात् परिणते यत्स्नेहसारे स्थितम् ।
भद्रं प्रेम सुमानुषस्य कथमप्येकं हि तत् प्राप्यते ॥ १

" एकाचें जें सुख तेंच दुसऱ्याचें सुख व एकाचें दुःख तेंच दुसऱ्याचें दुःख; कोणत्याही स्थितीमध्यें व अवस्थेमध्यें परस्परांवरील ममत्व केव्हांही कमी न होतां, दिवसानुदिवस दृढ होत जातें; ज्यामुळें चित्तास नेहमीं विश्रांति व आनंद मिळतो, अशा प्रकारच्या प्रेमानें बद्ध झालेलें दंपत्य खरोखरींच फार भाग्यवान् होय." श्लोकांत वर्णन केल्याप्रमाणें, स्त्रीपुरुषांच्या पवित्र अशा संबंधास अनुरूप, अशीच परस्परांची वागणूक पाहिजे. स्त्री व पुरुष यांची सांगड परमेश्वरानें अतर्क्य चातुर्यानें घातलेली आहे. या परमेश्वरनिर्मित सांगडीच्या पावित्र्यास अनुसरून पतिपत्नीचें वर्तन असेल तर लहान मुलेंही त्याप्रमाणेंच वागतील व त्यांच्या साहजिक अनुकरणप्रवृत्तीमुळें मातापितरांचे उत्कृष्ट गुण त्यांच्यामध्येंही उतरतील; परंतु केव्हां केव्हां अजाणपणामुळें व गैरसमजामुळें पतिपत्नींचें परस्परांशीं अनुदारपणाचें वर्तन असल्याचें दृष्टीस पडतें. आईबापांचें या प्रकारचें वर्तन मुलांच्या दृष्टीस पडलें म्हणजे त्यांच्या कोंवळ्या मनावर नीतिदृष्ट्या घातुक व अनिष्ट परिणाम होतात. आईबापांच्या अंतःकरणांतील प्रेमाचा झरा बंद होऊन अंतःकरण कोरडें ठणठणीत पडलें म्हणजे मुलांच्या अंतःकरणांत तरी प्रेमपाझर कोठून उत्पन्न होणार ?

परमेश्वरानें अपत्यरूपी मौल्यवान् ठेवा आईबापांचे स्वाधीन केला आहे. हयगय व हेळसांड बिलकुल न करतां त्यांनीं त्या ठेव्याची

फार काळजीपूर्वक जपणूक केली पाहिजे. घरांतील मातापितरादि प्रौढ मंडळींनीं आपल्या सद्बोधानें व सद्वर्तनानें मुलांच्या शीलाची व नीतिमत्तेची योग्य वाढ केली पाहिजे. प्रौढ माणसांच्या गैर वर्तनामुळें केवळ त्यांचेंच नुकसान होतें असें नव्हे; तर यापेक्षां विशेष अनिष्ट गोष्ट ही कीं, त्यामुळें ल्हान मुलांचे मनावर दुष्परिणाम होऊन तीं बिघडतात, व एकंदर समाजाची अवनति होत जाते. दूरदृष्टि ठेवून घरांतील वडील माणसांनीं प्रत्येक प्रसंगीं अतिशय सावधगिरीचें वर्तन केलें, तर समाजाची नैतिक उन्नति केल्याचें त्यांस श्रेय मिळून सर्वांचेंच कल्याण होईल; व परमेश्वराच्या मनोदयानुरूप उत्कृष्ट कर्तव्य बजावल्याचें महत्पुण्य त्यांचे पदरीं पडेल.

# प्रकरण ३ रें

## शील आणि शिक्षण

बाल्यावस्थेमध्यें मनुष्याची विचारशक्ति जागृत होऊन प्रगल्भ झालेली नसते; अशावेळीं मुलाचें शील बनविण्याचें काम मातापितरादि मंडळीकडेच असतें, असें मागील प्रकरणांत सांगितलें आहे. नीतिशिक्षणाच्या बाबतींत बाल्यावस्थेचा काल हा मनुष्याच्या आयुष्यांतील फार महत्त्वाचा काल आहे; परंतु, मनुष्याच्या शीलघटनेची पूर्तता या बाल्यावस्थेच्या कालामध्यें होते असें नाहीं. नैतिक-उन्नतीच्या उच्च पायरीस जाऊन पोंचण्यास दीर्घ काल लागतो. सृष्टींतील जड पदार्थांच्या गुणधर्मांचें ज्ञान मिळविण्याचें काम फार दुर्घट आहे; सृष्टींतील चमत्कारांचें एक कोडें उकलावें, तों, दुसरें कोडें दत्त म्हणून पुढें उभेंच! कोडीं उकलतां उकलतां मानवी आयुष्यही पुरेसें होत नाहीं.

शास्त्रें फार अपार जीवित तुझें अत्यल्प कीं मानवा।

ही कवीची उक्ति अगदीं अन्वर्थक आहे. परमेश्वरनिर्मित सृष्टींतील चमत्कारांचें उद्घाटन करून, त्यांचें यथार्थ ज्ञान मिळविणें, हें काम मानवी बुद्धीस फार कठीण आहे; त्याचप्रमाणें, अंतःसृष्टीचें अथवा सूक्ष्म कल्पनामय जगाचें यथार्थ ज्ञान मिळवून, तदनुसार वर्तणूक ठेवणें, हें काम फारच बिकट आहे. अशी स्थिति असल्यामुळें, नैतिक-उन्नतीच्या श्रेष्ठ पायरीस एकदम अनायासानें कसें जातां येईल? गृहामध्यें बाल्यावस्थेंत मनावर झालेले संस्कार बरोबर घेऊन, मनुष्य प्रौढावस्थेमध्यें शिरतो, तेव्हां त्याची विचारशक्ति जागृत होऊन प्रगल्भ होऊं लागते. दुसऱ्यांनीं भरवणेची जरूरी

पुढें नाहींशी होते. पहिल्या मुक्कामाची सर्व नैतिक अन्नसामुग्री घे-ऊन, आतां यापुढील मार्ग आक्रमावयाचा आहे. बालक मातेनें घातलेलें दूध गटागटा पीत असतें; त्यास त्या दुधाच्या गोडीची समजूत पटून तें पीत नसतें; त्याप्रमाणेंच, बाल्यावस्थेमध्यें मुलाचे मनावर बरेवाईट संस्कार, आपोआप, त्याला नकळत घडत असतात. विचारशक्ति निद्रित अवस्थेमध्यें असल्यामुळें, डोळ्यांनीं जें पाहावें, किंवा कानांनीं जें ऐकावें, त्याची प्रतिमा लहान मुलांचे मनावर प्रतिबिंबित झालेली असते. या अवस्थेच्या पुढील अवस्थे-मध्यें मुलाच्या जागृत झालेल्या विचारांस योग्य वळण लावण्याचें काम करावयाचें असतें. हें काम त्याच्या शक्त्यनुसार, त्याला योग्य शिक्षण देऊन, करावयाचें असतें. तात्पर्य, बाल्यावस्था संपून मनुष्य प्रौढावस्थेमध्यें शिरला म्हणजे त्याच्या शिक्षणास आरंभ होतो. मु-लाच्या जागृत झालेल्या बुद्धीचा विकास करण्याचें काम प्रौढपणीं करावयाचें असतें. फुलाची कळी सूर्याच्या किरणांनीं उमलते, तद्वतच बुद्धीचा व अंतःकरणाचा विकास शिक्षणाच्या योगानें होतो. उत्तम कारागीर आपल्या कौशल्यानें पाषाणाची उत्कृष्ट मूर्ति बनवितो; पाषाणांतील फाजील तुकडे काढून टाकून, त्यांतूनच सुंदर पुतळा तयार करतो; त्याचप्रमाणें, मानवी बुद्धींतील व अंतःकरणांतील दोष काढून टाकून, बुद्धि व अंतःकरण शुद्ध, निर्दोष व निष्कलंक बन-विण्याचें पवित्र काम शिक्षणाचें आहे.

शिक्षणाचा मनुष्याच्या नीतिमत्तेशीं कसा संबंध पोंचतो, व त्याच्या शीलावर काय परिणाम होतो, याबद्दल आतां विचार क-रावयाचा आहे.

स्थूलमानानें विचार केल्यास, शिक्षण हें मुख्यत्वेंकरून दोन प्र-कारचें आहे. शरीरांतील मुख्य भाग दोन आहेत अशी कल्पना केली, तर त्या त्या भागाची उपयुक्तता वाढविणारें शिक्षणही दोन

प्रकारचें आहे. हे मुख्य भाग शरीर व मन होत; तेव्हां या भागांची नीट वाढ करून त्यांची उपयुक्तता वाढविणारें शिक्षण दोन प्रकारचें आहे. एक शारीरिक शिक्षण; व दुसरें मानसिक शिक्षण. तसेंच मनुष्याच्या मनाचे स्थूलरीतीनें बुद्धि व अंतःकरण हे दोन भाग आहेत अशी कल्पना करतां येईल; तेव्हां बुद्धीची वाढ करून तिला उन्नत करणारें शिक्षण हें बुद्धिविषयक शिक्षण होय; व अंतःकरणवृत्तींचा विकास करून त्यांची उन्नति करणारें शिक्षण हें नैतिकशिक्षण होय. याप्रमाणें शारीरिकशिक्षण, बौद्धिकशिक्षण, व नैतिकशिक्षण असे शिक्षणाचे तीन प्रकार झाले.

आतां प्रथमतः शारीरिक शिक्षणाचा विचार करूं.

शरीरमाद्यं खलु धर्मसाधनम् ।

" शरीर हें कर्तव्याचें साधन आहे. " ही विख्यात कवि कालिदास याची उक्ति यथार्थ आहे. तसेंच,

" Sound mind in a sound body "

" निकोप शरीरांतील मनही निकोपच असतें " अशी इंग्रजींत म्हण आहे ती योग्य आहे. व्यवहारांतही आपल्या नेहमीं पाहण्यांत येतें कीं, अशक्त व कमकुवत माणसें चिडखोर, जिकीरखोर, अस्थिर व भित्रीं अशीं असतात. याचें कारण उघड आहे; शरीराचा मनावर परिणाम होतच असतो. शरीर निकोप व सदृढ असलें, म्हणजे मनही निर्भय, आनंदी, कार्योत्सुक, जोरकस व स्थिर असतें; व शरीर रोगट व अशक्त असेल, तर मनही नेभळें व कमकुवत बनतें. याकरितां, समाजाची अथवा राष्ट्राची नैतिक उन्नति करावयाची असेल, व समाज व राष्ट्र कार्यक्षम होईल अशी तजवीज करावयाची असेल, तर कर्तव्यसाधनाचें एक महत्त्वाचें अंग जें शरीर, तें सदृढ व निरोगी असेंच ठेविलें पाहिजे.

लहानपणापासून मुलांच्या शरीराची उत्तम जोपासना करून, शरीर निरोगी व सदृढ ठेवण्याचा प्रयत्न झाला पाहिजे. व्यायाम व कसरत मुलांकडून करविली पाहिजे; शरीराची पूर्ण वाढ होऊन तें सदृढ होण्यास, व्यायामाची व कसरतीची अत्यंत जरूरी आहे.

विभक्तघनगात्रत्वं । व्यायामादुपजायते ॥

—वाग्भट

" व्यायामाच्या योगानें शरीरांतील निरनिराळे अवयव विभक्त व दृढ होतात, " असें वैद्यशास्त्राचें मत आहे. शरीर निकोप व सदृढ होण्यास, जशी व्यायामाची जरूरी आहे त्याचप्रमाणें, पथ्य-कर, पौष्टिक व सात्त्विक अन्नाचीहि जरूरी आहे.

या शारीरिकशिक्षणाचे बाबतींत बहुतकरून सर्वत्र बरीच अनास्था दिसून येते. शारीरिकशिक्षण हें शिक्षणाचें महत्त्वाचें अंग आहे, ही गोष्ट पुष्कळ वेळां व्यवहारांत विसरलेली दिसते. मुलगा परीक्षेंत भराभर उत्तीर्ण होऊं लागला, म्हणजे आईबापांस आनंद होणें स्वाभाविक आहे; परंतु, त्याबरोबरच मुलाच्या शारीरिक-शिक्षणाकडे काणाडोळा करणें, ही अत्यंत अनिष्ट गोष्ट आहे. या प्रकारची शरीराची अनास्था निवळ अक्षम्य होय! ही अनास्था मागेंपुढें मुलास अपायकारक झाल्याशिवाय राहात नाहीं. शरीर कमकुवत असलें, म्हणजे मनावर जसा दाब बसावा तसा बसत नाहीं; कोणत्याही बाबतींत मनाचा ठाम निश्चय चटकन् होत नाहीं. कमकुवतपणामुळें, निरनिराळ्या प्रकारच्या विचारलहरींनीं मन व्याप्त होतें व त्या लहरींचा प्रतिकार करणेची त्याची ताकद कमी होते; याप्रमाणें मनास सर्व प्रकारें शैथिल्य प्राप्त होतें, व मग सत्कार्य करण्यास त्यास जितकी स्थिरता व उमेद राहावी, तितकी राहत नाहीं. परंतु शरीर जर सदृढ असेल, तर मनास उमेद व ताकद राहून कोणतेंही सत्कृत्य तडीस नेण्याची त्यास धमक व

सामर्थ्य राहतें. ग्रीस देशामध्यें स्पार्टा नांवाचा प्रांत आहे. त्यामध्यें पूर्वीं लायकरगस या नांवाचा कायदेकानू करणारा एक विख्यात अंमलदार होऊन गेला. प्रजा सदृढ राहावी याकरितां तो निरनिराळे कडक कायदे व निर्बंध करी; व ते सक्तीनें अमलांत आणी. या कडक निर्बंधांची अंमलबजावणी बरेच दिवस चालू राहिल्यामुळें, स्पार्टांतील प्रजा फार सदृढ झाली; व पुढें स्पॉर्टन लोक किती पराक्रमी झाले, व स्पार्टांतील सैन्य मर्दुमकीबद्दल व शौर्याबद्दल कसें नांवारूपास चढलें, हें इतिहासावरून सर्वांस माहीतच आहे. लढाईत पाठ दाखवून मागें फिरूं नकोस; लढतां लढतां धारातीर्थीं वेळेनुसार पतन पावून, आपली व आपल्या कुलाची कीर्ति अजरामर कर; परंतु तोंड काळें करून घेऊन परत येऊं नकोस, याप्रमाणें स्पार्टामधील बायकासुद्धां लढाईस जातेवेळेस, आपल्या मुलांस उत्साहवर्धक व शौर्योत्तेजक उपदेश करीत असत ! बोलूनचालून बायका म्हणजे अतिशय मृदु अंतःकरणाच्या, व भित्र्या; परंतु, त्यासुद्धां शरीरसामर्थ्यामुळें, कशा निर्भय बनतात, शारीरिक जोमामुळें मन कसें जोरकस व कार्यक्षम होतें, याचें हें उत्कृष्ट उदाहरण आहे. कोणतेंही सत्कृत्य पार पाडण्यास जी सामुग्री लागते, तिची तयारी शरीर सदृढ असल्याशिवाय बरोबर होत नाहीं, असा सामान्य सिद्धांत आहे. एकाद्या पुरुषश्रेष्ठाच्या स्वाभाविक प्रवृत्ति नीतिदृष्ट्या फार श्रेष्ठ दर्जाच्या असल्या, म्हणजे ह्या पुरुषास शरीराचा कमकुवतपणा फारसा बाधक होणार नाहीं, ही गोष्ट खरी; तथापि, या अपवादानें सामान्य सिद्धांताचें सत्यत्व नष्ट होत नाहीं. तापलेल्या करंड्यांत शीतल चंद्रकांतमणि ठेवला, म्हणजे त्यास ह्या करंड्याची आंच थोडीबहुत तरी लागणारच; तसेंच कमकुवतपणामुळें क्षीण झालेल्या मस्तकामध्यें सत्कृत्यास जरूर लागणारी स्थिरता, थंडपणा, व शांति कोठून राहील ?

वर सांगितल्याप्रमाणें, दुसऱ्या प्रकारचें शिक्षण म्हणजे मानसिकशिक्षण होय; व त्याचे बौद्धिकशिक्षण व नैतिकशिक्षण, असे दोन प्रकार आहेत, हें वर सांगितलेंच आहे. शारीरिकशिक्षणाचा नैतिकवृत्तींशीं कसा संबंध पोंचतो, हें थोडक्यांत सांगितलें आहे; आतां, शिक्षणाचें दुसरें अंग जें मानसिकशिक्षण, त्यापैकीं बौद्धिकशिक्षणाचा नैतिकवृत्तींशीं कसा संबंध पोंचतो, याबद्दल विवेचन करावयाचें.

ज्या शिक्षणाच्या योगानें मनुष्याची बुद्धि तीक्ष्ण होऊन, विचारशक्ति वाढते; सत्यान्वेषण करण्याची विचारपद्धति व तिचे नियम, यांची पूर्णपणें ओळख होते; वस्तूंचा कार्यकारणभाव अजमाविण्याचें सामर्थ्य वाढतें; विचारांतील तर्कटपणा कमी होऊन, साधार विचार करण्याची संवय लागते, अशा सर्व शिक्षणाचा अंतर्भाव बुद्धिविषयक शिक्षणामध्यें होतो; तात्पर्य, निरनिराळ्या विषयांचें परिशीलन चालू असतांना, बुद्धि तरतरीत होऊन, विचारपद्धति ज्या शिक्षणाच्या योगानें शुद्ध व निर्दोष होते, तें बुद्धिविषयक शिक्षण होय.

कोणत्याही गोष्टीचा बिनचूक व सांगोपांग विचार करण्याची शक्ति व संवय, अशिक्षित मनुष्यापेक्षां सुशिक्षित मनुष्यामध्यें सामान्यतः जास्ती असते. अडाणी व अशिक्षित माणसाची दृष्टि आकुंचित असून, विचारशक्ति मंद असते. निराधार सिद्धांत तर्कटपणानें खुशाल ठोकून देण्याचे भरीस, सुशिक्षित मनुष्य सहसा पडावयाचा नाहीं. सत्यशोधनाची योग्य सामुग्री जमवून, त्यावरून सरळ व जितका बिनचूक सिद्धांत निष्पन्न होईल, तितकाच तो काढीत असतो. याप्रमाणें विचार करण्याची संवय लागल्यामुळें, सुशिक्षित मनुष्याचें बुद्धिसामर्थ्य वाढत जातें. कोणत्याही विषयाचें व्यवस्थित व सोपपत्तिक ज्ञान जसजसें होत जाईल, तसतशी सुशि-

क्षित मनुष्याची, त्या विषयामध्येंच गति होत जाते इतकेंच नव्हे, तर त्याचे बुद्धीचा विकास होऊन, तिचें सामर्थ्य वाढत जातें.

सुशिक्षित मनुष्याच्या बुद्धीस वर लिहिल्याप्रमाणें वळण लागल्यामुळें, माणसांमाणसांमध्यें परस्पर वागणूक कशी असावी, सद्गुण म्हणजे काय, दुर्गुण कोणते, अनीतीच्या वर्तणुकीमुळें कसें नुकसान होतें, वगैरे नीतिशास्त्रांतील सामान्य सिद्धांतांचें रहस्य, सुशिक्षित मनुष्यास बरोबर समजतें, व त्यामुळें सामान्यतः त्याच्या विचारांत व आचारांत हितावह असे फरक पडत जातात. प्रत्येक सुव्यवस्थित समाजामध्यें नीतिविषयक सिद्धांत प्रचलित असतात, व त्यांची जाणीव त्या समाजांत वाढणाऱ्या प्रबुद्ध माणसांस असतेच; समाजांतील प्रचलित नीतिविषयक कल्पनांमध्येंच प्रत्येक मनुष्य वाढत असल्यामुळें, त्याच्या मनावर त्यांचा परिणाम होतच असतो; तथापि, शिक्षणाच्या योगानें या प्रचलित कल्पनांचें योग्य आकलन करण्याची ताकद येते, व त्यांचें पूर्ण रहस्य व महत्त्व कळत जातें. तात्पर्य, सदाचार कोणता व दुराचार कोणता, कर्तव्य कोणतें व तें नीटरीतीनें बजावण्यास कोणकोणत्या सद्गुणांची अपेक्षा असते, वगैरे गोष्टींची स्पष्ट व बिनचूक जाणीव झाल्यामुळें, सुशिक्षित मनुष्याचे अंतःकरणावर अनुकूल संस्कार घडतात, व त्यामुळें, त्याचे अंतःकरणाचा विकास होण्यास मदत होते.

बुद्धीच्या संस्कृतीचा परिणाम वर लिहिल्याप्रमाणें अंतःकरणवृत्तीवर घडत असतो, ही गोष्ट खरी आहे, तथापि, सुशिक्षित माणसासमुद्धां कळतें पण वळत नाहीं, असें पुष्कळ वेळां आपण पाहतों. सामान्य शिक्षणाच्या योगानें, नैतिकसिद्धांतांची तात्त्विक व स्पष्ट जाणीव, सुशिक्षित मनुष्यास होते ही गोष्ट खरी आहे, तथापि तेवढ्यानें इष्ट कार्य होतें, असा अर्थ नाहीं.

बुद्धिविषयक शिक्षणाबरोबर नीतिशिक्षणाची जोड पाहिजेच

आहे. बुद्धीच्या विकासाबरोबर सद्वृत्तींचाही विकास व्हावयास पाहिजे. यासाठीं, शिक्षणक्रमांत नीतिशिक्षणाची व्यवस्था जरूर व्हावयास पाहिजे. या मानवी अंतःकरणाच्या वृत्तिविकासाचें काम सतत सुरू ठेविलें पाहिजे. अंतःकरणावर सद्बोधामृताचें सिंचन नेहमीं करीत राहिलें पाहिजे. सदाचरणापासून कल्याणप्राप्ति होते, व दुराचरणामुळें, अनर्थ व आपत्ति ओढवते, याबद्दलचे धडे नेहमीं विद्यार्थ्यांना शिकवून,त्यांतील सिद्धांत त्यांचे मनावर उत्तम रीतीनें ठसविले पाहिजेत. क्षुद्र, नीच व हानिकारक अशा कृत्यांचा निषेध करून, उच्च व श्रेष्ठ दर्जाच्या कृत्यांचा पाढा, विद्यार्थ्यांपुढें सतत वाचला पाहिजे. एक वेळ बुद्धीचा विकास करणें हें काम इतकें कठीण नसेल; परंतु नैतिकवृत्तींची योग्य जोपासना करून, त्यांची उन्नति करणें, हें कार्य फार कठीण आहे; हें काम कठीण असल्यामुळें, तें होईल तितकें साध्य करून घेण्यासाठीं, सतत व दीर्घ प्रयत्न झाले पाहिजेत; याकरितां शिक्षणक्रमांत, नैतिकशिक्षणाचा प्रवेश जरूर झाला पाहिजे. सोनार हातोड्यानें सतत ठोकून, ज्याप्रमाणें सुवर्णाचा दागिना बनवितो, त्याप्रमाणें, अंतःकरणावर सद्बोधाचा कायम ठसा उमटवून, हें मानवी अंतःकरण शुद्ध व सुंदर बनविलें पाहिजे. त्याची अशुद्धता काढून टाकून, त्याचें स्वरूप मनोहर व रमणीय असें केलें पाहिजे. कुंभारमाशी आळीभोंवतीं सतत गोंगावून, त्या आळीची माशी बनविते, त्याप्रमाणें, अव्याहत सद्बोधानें, अंतःकरणवृत्ति उन्नत केल्या पाहिजेत.

परमेश्वराच्या अतर्क्य चातुर्यानें व लीलेनें निर्मिलेलें हें मानवी अंतःकरण, म्हणजे सद्गुणांची व दुर्गुणांची एक मूस आहे. सद्गुण व दुर्गुण हे बीजस्वरूपामध्यें या मुशींत असतात; ही मूस शुद्धीकरितां, शिक्षणसंस्काररूपी अग्नीमध्यें ठेवून, दुर्गुणांचें बीज आटवून टाकलें पाहिजे, म्हणजे सद्गुणांचें बीज सतेज व शुद्ध होईल.

अंतःकरणांतील शुद्ध व पवित्र सद्गुणांची ज्योति, दुर्गुणांच्या धूमानें लेपाटून जाऊन, निस्तेज झालेली असते; हा धूर नाहींसा करून सद्गुणांची ज्योति सतेज करून, अंतःकरणवृत्ति उन्नत केल्या पाहिजेत. प्रसिद्ध तत्त्ववेत्ता बेकनसाहेब म्हणतो,

"Knowledge Proceeds from wonder."

"आश्चर्यापासून ज्ञाननिष्पत्ति होते." कोणत्याही गोष्टीविषयीं प्रथमतः आश्चर्य वाटलें, म्हणजे त्या गोष्टीचें ज्ञान मिळविण्याची मनुष्याच्या मनाची साहजिकच प्रवृत्ति होते. ही जशी बुद्धीची गोष्ट आहे, तशीच अंतःकरणाचीही आहे. अंतःकरण सुद्धां आश्चर्यचकित झालें, व त्याचेवर आश्चर्याचे संस्कार होत गेले, म्हणजे तें विकास पावत जातें. सद्गुणांबद्दलची आश्चर्यवृत्ति अंतःकरणामध्यें वाढूं लागली, म्हणजे अंतःकरणांतील सद्गुणांची ज्योति, अधिक सतेज होत जाते. सद्गुणांबद्दल आश्चर्यचकित झालेलें अंतःकरण जसें उन्नत होतें, त्याचप्रमाणें दुर्गुणांबद्दलच्या खंतीमुळें अंतःकरणांत दुर्गुणांबद्दल वीट उत्पन्न होतो. तात्पर्य, सद्गुणांबद्दलचे आश्चर्याचे संस्कार, व दुर्गुणांबद्दलचे खंतीचे संस्कार अंतःकरणावर होत गेले, म्हणजे अंतःकरणांतील सद्वृत्तींचा विकास होत जातो, परंतु, हे आश्चर्याचे व खंतीचे संस्कार शिक्षणाच्या योगानेंच अंतःकरणामध्यें उत्पन्न करावे लागतात. इलिझाबेथ राणीचे कारकीर्दींत, स्पॅनिश लोकांबरोबर झटफेन येथें लढाई झाली, त्यांत प्रसिद्ध सर फिलिप सिडने हा लढाईंत रणांगणावर विव्हल होऊन पडला, व श्रमांमुळें ताहानेनें फार व्याकूळ झाला; इतक्यांत कोणीं पाण्याचा पेला त्याचेपुढें केला; परंतु आपल्यापेक्षां दुसरा एक शिपाई जखमेमुळें तृषेनें जास्त व्याकूळ झाला आहे असें पाहून त्यानें त्याचेपुढें तो पेला करून म्हटलें कीं,

"Thy need is greater than mine."

" मजपेक्षां तुला पाण्याची जरूरी जास्त आहे. " किती आश्चर्यकारक स्वार्थत्याग हा ! अशा स्वार्थत्यागाच्या हकीकतीनें अंतःकरणामध्यें आश्चर्याची लाट कां नाहीं उत्पन्न होणार ? व अशा आश्चर्यकारक गोष्टींनीं अंतःकरणवृत्ति थक्क होऊन उन्नत व्हाव्या, यांत काय नवल आहे ! अंतःकरणांतील मिटलेली सद्गुणांची कळी, अशाच आश्चर्यजनक संस्कारांनीं हळू हळू उमलली पाहिजे. राजाराममहाराजांचे कारकीर्दींत, मोंगलांचें अफाट सैन्य पन्हाळगडाजवळ येऊन धडकलें; महाराज गडामध्यें होते; या अफाट सैन्यास तोंड देण्यास महाराजांजवळ पुरेसें सैन्य नसल्यामुळें, पन्हाळा मोंगलांचे ताब्यांत जाऊन, महाराज मोंगलांचे ताब्यांत जाऊन, महाराज मोंगलांचे कैदेंत सांपडणार, अशी सर्वत्र भीति उत्पन्न झाली. तेव्हां, अशा बिकट प्रसंगीं, स्वामिकार्यतत्पर प्रल्हाद निराजी सारख्या उत्कृष्ट सल्लागाराच्या सल्ल्यानें, आपला व मराठी राज्याचा बचाव करण्यासाठीं, महाराजांनीं गड सोडून जिंजीस जाण्याचा संकल्प केला ! व बरोबर निवडक व विश्वासूक मंडळी घेऊन, महाराज निघाले. वाटेंत एके ठिकाणीं, धर्मशाळेंत मुशाफरांचा बाहणा करून, सर्वजणांनीं मुक्काम केला. महाराज या ठिकाणीं आहेत असा मोंगलांस संशय येऊन, ते दुसरे दिवशीं, धर्मशाळेस वेढा घालणार, अशी बातमी लागतांच, महाराज अगदीं थोड्या लोकांसह मध्यरात्रीं निघाले. सर्वांनीं एकदम निघावें, तर अधिकच संशय येणार; म्हणून कांहीं मंडळी धर्मशाळेंतच मागें राहिली. त्यांत प्रल्हाद निराजीही होता. महाराजांस पकडण्यासाठीं सकाळीं धर्मशाळेस मोंगल अमलदारांनीं वेढा दिला ! महाराजांबद्दलची बातमी काढून घेण्याकरतां धर्मशाळेंतील लोकांवर फारच जुलूम-जबरदस्ती सुरू झाली ! परंतु त्या स्वामिनिष्ठ बहादरानें छळास बिलकुल भीक न घालतां, तो निमूटपणें सहन केला, व महाराजां-

चा पत्ता यत्किंचितही लागूं दिला नाहीं ! काय उज्ज्वल स्वामिभक्ति ही ! आपल्या स्वामीच्या व मराठेशाहीच्या कल्याणाकरितां, त्या श्रेष्ठ नरवीरानें शरीराच्या हालअपेष्टांस बिलकुल जुमानलें नाहीं ! अशा प्रकारच्या प्रसंगांचें उत्कृष्ट चित्र रेखाटून विद्यार्थ्यांच्या मनावर स्वामिभक्तीचें उज्ज्वल स्वरूप उमटविलें, म्हणजे मन आश्चर्यभरित होऊन सद्वृत्तीचा उठाव कां नाहीं होणार ? मनांतील सद्गुणांच्या अंकुरांची, असल्या आश्चर्यकारक प्रसंगांची आठवण देऊनच वाढ करावी लागते. सद्वृत्तींचें उद्दीपन करणाऱ्या प्रसंगांचें चित्र मनावर उत्कृष्ट तऱ्हेनें रेखाटलें गेलें, म्हणजे मनामध्यें आश्चर्य व प्रसन्नता, यांचे उत्कृष्ट संस्कार उत्पन्न होऊन, तें उन्नत होते. पूर्वीं ग्रीस देशाची सत्ता कांहीं दिवस जुलमी लोकांच्या हातांत गेली होती; प्रसिद्ध तत्त्ववेत्ता व साधुपुरुष सॉक्रेटिस, हा अथेन्स शहरांतील लहान मुलांना वाईट शिक्षण देऊन, त्यांस बिघडवितो, अशी खोटी तोहमत त्याचेवर त्या लोकांनीं आणिली. सॉक्रेटिसानें आपल्या निरपराधीपणाबद्दल त्या लोकांची समजूत घालण्याचा प्रयत्न केला ! पण व्यर्थ ! तेव्हां त्याचा नाश करण्यास उद्युक्त झालेल्या त्या दुष्टांनीं त्यास देहान्त प्रायश्चित्त घेण्याची अती कडक शिक्षा सांगितली ! परतु, त्यामुळें तो महात्मा सॉक्रेटिस यत्किंचितही डगमगला नाहीं ! उलट ‘ आत्म्याचें अमरत्व ’ या उदात्त व गहन विषयावर आपल्या शिष्यांस उपदेशपर प्रवचन करीत, त्यानें त्यास दिलेल्या विषाचें धैर्यानें प्राशन केलें ! काय अलोट धैर्य हें ! असल्या अपूर्व प्रसंगाचें चित्र हृत्पटलावर उत्कृष्ट चिताऱ्यानें रेखाटलें, म्हणजे विद्यार्थ्यांचें हृदय सद्गदित होऊन, मनावर उन्नत संस्कार घडतील, यांत काय संशय आहे ? अंतःकरणांतील निद्रित अवस्थेंत असलेली धैर्यवृत्ति जागृत होऊन, असल्या हृद्यंगम श्रेष्ठ नीतिमत्तेच्यां प्रसंगांनीं, मनास उ-

न्नतीचें निःसंशय वळण लागेल. त्याचप्रमाणें, दुर्गुण व दुराचरण यांबद्दल अतिशय खंती व तिरस्कार उत्पन्न होईल, अशा प्रसंगांचें चित्र विद्यार्थ्यांच्या अंतःकरणामध्यें ठसविलें पाहिजे. अंतःकरणांतील ज्या नैसर्गिक वृत्तीला सद्गुणाबद्दल आदर वाटतो, त्याच वृत्तीला दुर्गुणाबद्दल तिरस्कार वाटतो. आपला सख्खा राजबिंडा पुतण्या प्रिन्स ऑर्थर, यास टॉवरमध्यें (अंधाऱ्या घुमटामध्यें) कोंडून ठेवून, अखेर मारेकऱ्यांकडून त्याचा प्राण घेणाऱ्या जॉन राजाचे हिडिस कृत्याचा हिडिसपणा दाखवून, असल्या नीच कृत्याबद्दल विद्यार्थ्यांच्या मनामध्यें उद्वेग उत्पन्न झाला पाहिजे; अंगावर शहारे आणणाऱ्या असल्या कृत्याचें स्वरूप व परिणाम मनावर स्पष्ट बिंबवून, या किळसवाण्या कृत्यामुळें, विद्यार्थ्यांचें मन उद्वेग, तिरस्कार व खंती, यांनीं व्यापून गेलें पाहिजे. आपल्या बापास उन्मत्तपणानें तुरुगांत लोटून, व आपल्या सख्ख्या भावांचा हक्क बाजूस सारून, अवरंगजेब बादशहानें बादशाही तक्त आपणच बळकाविलें, हें विश्रुतच आहे. अतिशय पवित्र कर्तव्य विसरून जाऊन, व लोभामुळें मनुष्यत्वास काळिमा आणणारीं कृत्यें करून, मनुष्य जनावरांच्या पंक्तीस जाऊन बसण्यास कसा लायक होतो, याबद्दलचें चित्र डोळ्यांपुढें उत्कृष्ट रीतीनें रेखाटून असल्या कृत्यांबद्दल विद्यार्थ्यांची तिरस्कारबुद्धि वाढविली पाहिजे. याप्रमाणें, मानवीस्वभावांतील अत्युच्च वृत्तींच्या उदात्त स्वरूपाची व किळसवाण्या कृत्याच्या काळ्याकुट्ट स्वरूपाची, विद्यार्थ्यांस नीट ओळख पटवून देऊन, त्यांच्या चित्तवृत्ति तल्लीन करून सोडल्या, म्हणजे अंतःकरणवृत्तींवर उत्कृष्ट संस्कार घडून त्या उन्नत होत जातात.

वर लिहिल्याप्रमाणें, विद्यार्थ्यांचे अंतःकरणांतील वृत्तिविकासाचें काम करून, त्यांची नैतिक उन्नति ज्या विषयांच्या योगानें करतां येईल, अशा विषयांचा शिक्षणक्रमांत जरूर अंतर्भाव झाला पाहिजे.

इतिहास, काव्य, चरित्रें, नीतिपर कादंबऱ्या व नाटकें, यांना शिक्षणक्रमांत महत्त्वाचें स्थळ दिलें पाहिजे.

व्यक्ति, समाज अथवा राष्ट्र यांची उन्नति अथवा अवनति कोणत्या कारणांमुळें होते; दुर्गुणांचें निर्दलन होऊन सद्गुणांचा उच्छ्रय झाल्याशिवाय व्यक्ति, समाज अथवा राष्ट्र, यांचा अभ्युदय होत नाहीं; पुढच्यास ठेंच आणि मागचा शहाणा, या न्यायानें मागील अनुभवावरून पुढील मार्ग कल्याणकारक व श्रेयस्कर कसा होईल, विवक्षितकाळीं विवक्षित राष्ट्राची अधोगति झाली, त्या-वेळीं त्या राष्ट्रांतील नैतिक तेज कसें लोपून गेलें होतें, वगैरे सिद्धांतांचें तात्त्विक ज्ञान इतिहासापासून प्राप्त होतें; म्हणून, या ऐतिहासिक ज्ञानाच्या ठेव्याची राष्ट्रास फार जरूरी असते. ज्या राष्ट्रास इतिहास नाहीं, त्या राष्ट्रास अंधारांत वावरल्यासारखें होणार आहे ! लहान मुलांस त्यांच्या कल्याणाचा मार्ग दाखविणारीं वडील माणसें होत, त्याचप्रमाणें, राष्ट्रास कल्याणकारक मार्ग कोणता, हें कळण्याचें साधन इतिहास होय. प्रसिद्ध एडमंड बर्क साहेब म्हणतो कीं, ज्या राष्ट्रास मागील इतिहास नाहीं, त्या राष्ट्रास पुढील इतिहास कोठून असणार ? इतिहासाच्या परिशीलनानें, नैतिकसिद्धांतांचें तात्त्विक ज्ञानप्राप्त होतें इतकेंच नव्हे, तर अंतःकरणवृत्तींचा विकास होण्यास फार मदत होते; कारण इतिहास हा राष्ट्रांतील सद्गुणसमुच्चयाचा आरसा आहे; या आरशांत थोर विभूति व त्यांच्या थोर गुणांची मालिका, यांचें बरोबर प्रतिबिंब उमटलेलें असतें. राष्ट्रांतील थोर पुरुष व त्यांचें श्रेष्ठ दर्जाचें नैतिकतेज, या आरशांत पहावयास मिळाल्यामुळें, अंतःकरणावर उत्कृष्ट संस्कार होऊन, त्याचा विकास होत जातो. आपल्याच पूर्वजांनीं पूर्वीं श्रेष्ठ दर्जाचें नैतिक तेज प्रकट केलें, याबद्दलचें स्पष्ट चित्र आपल्या डोळ्यांपुढें दिसेल, तर आपल्यामध्यें थोडीबहुत तरी

सद्गुणांची जाणीव नाहीं का होणार ? मनुष्याचें अंतःकरण म्हणजे दगडासारखा कांहीं कठीण पदार्थ नव्हे; तें संस्कारशील आहे.

नीतिदृष्टया, इतिहासाच्या उपयुक्ततेसंबंधानें महाराष्ट्रांतील प्रसिद्ध लेखक कै० विष्णुशास्त्री चिपळूणकर, यांनीं फार मार्मिक वर्णन केलें आहे. ते आपल्या निबंधमालेंत म्हणतात, "सज्जनांचा जय व दुर्जनांचा अपजय, असेंच जरी नेहमीं इतिहासांत आढळत नाहीं, तरी एकंदरींत परिणाम असाच दृष्टीस पडतो. शिवाय, दुसरें हेंही लक्षांत येतें कीं, भलेपणानें वागूनही जरी नेहमीं परिणाम लागतोच असें नाहीं, तरी पण दुष्टपणा केल्यानें तर तो नाहींच नाहीं लागत ! मनुष्याचें सर्वप्रकारें हित होणें तें केवळ याच मार्गानें व्हावयाचें; कुमार्गानें तें व्हावें, हें वस्तुगत्याच शक्य नव्हे. याप्रमाणेंच, मोठ्या प्रसंगींही ज्यांचें धैर्यबळ ढळत नाहीं, असे थोर पुरुष तर विपत्तींतही जें सुख पावतात, तें दुष्ट व कुत्सित मनांच्या लोकांस मोठ्या भाग्यशालीपणांतही लाधत नाहीं. सारांश, या संसाररूप महानाटकांत आजपर्यंत कोणकोणतीं पात्रें आपापली भूमिका आटपून, निष्क्रमण करतीं झालीं, हें चित्तावर चांगलें ठसलें असतां, चांगला मार्ग कोणता, वाईट कोणता, हें सुज्ञ मनुष्यास सहज निवडतां येतें. खरें सुख, खरें समाधान, खरी प्रतिष्ठा कशांत आहे, हेंही कळूं लागतें. सहस्रावधि मनुष्यांचा अनुभव थोडक्यांत त्यास आलासा होतो; त्यांच्या योगानें त्याची दृष्टि फांकते; आणि तो जर तसा समजुतीचा व दृढनिश्चयाचा असेल तर, लौकरच तो कोणाचा तरी कित्ता उचलून, खलाशीलोक ध्रुवाच्या ताऱ्यावरून जसें नौकेचें नियमन करितात, त्याप्रमाणें, तो त्या निवडलेल्या पुरुषाच्या चरित्रावर सारखी नजर ठेवून, तदनुरूप आपलें आयुष्यक्रमण करतो. याप्रमाणें इतिहासापासून सदुपदेश प्राप्त होतो; व

९५२८



म्हणूनच एका थोर ग्रंथकारानें "इतिहास हा प्रत्यक्ष उदाहरणें दाखवून केलेला बोध होय," असें यथार्थ म्हटलें आहे."

नीतिपर काव्यें, नीतिपर नाटकें, व नीतिपर कादंबऱ्या, यांच्या परिशीलनानेंही नीतिशिक्षणास बरीच मदत होते. उत्तम कवि व कादंबरीकार आपल्या प्रतिभासंपन्न बुद्धिवैभवाच्या योगानें नीतिमत्तेचें रहस्य व महत्त्व फार उत्कृष्ट रीतीनें समजावून देऊन, अंतःकरणवृत्ति तल्लीन करून सोडतात. सात्त्विक गुणांचा उच्छ्रय व दुर्गुणांचा धिःकार, याबद्दलचें चित्र कवि व कादंबरीकार उत्कृष्ट रीतीनें रेखाटतात, व आपल्या प्रतिभासंपन्न बुद्धीला यथास्थित वाव देऊन, त्या चित्राची रमणीयता व सौंदर्य वाढवितात, ह्यामुळें अंतःकरणावर उत्कृष्ट संस्कार घडून, त्याचा विकास होण्यास फार मदत होते. काव्यांतील एक दोन उदाहरणांवरून वरील गोष्टीचा खुलासा होईल. 'उत्तररामचरित' नाटकामध्यें, भवभूति म्हणतोः—

अन्वेष्टव्यो यदसि भुवने भूतनाथः शरण्यो ।
मामन्विष्यन्निह वृषलकं योजनानां शतानि ॥
क्रान्त्वा प्राप्तः स इह तपसां संप्रसादोऽन्यथाचेत् ।
क्वायोध्यायाः पुनरुपगमो दण्डकायां वने वः ॥१

" सर्व भूतांचा नाथ व रक्षणकर्ता, ज्याचा शोध सर्व जग करीत आहे, असा प्रभु रामचंद्र शेंकडो योजनें प्रवास करून, माझा शूद्राचा तपास करीत, या दण्डकारण्यामध्यें प्राप्त झाला आहे, हा माझ्या तपाचा परिणाम आहे; नाहीं तर, अयोध्या सोडून आमच्या दण्डकारण्यामध्यें कशास येईल ? "
या श्लोकांत कवीनें भक्तिरसाचें किती सुंदर वर्णन केलें आहे ! योग्य शब्दांची योजना करून, आपल्या प्रतिभेनें भक्तिरसाचा परिपोष कवीनें उत्कृष्ट साधला आहे. प्रभु रामचंद्राविषयीं शूद्रकाचा भक्तिभाव किती उच्च दर्जाचा, अकृत्रिम, प्रेमळ व उदात्त असा

दाखविला आहे ! नदीच्या चढत्या पाण्याप्रमाणें, शूद्रकाच्या भक्तिरसाला जणूं काय पूर आला आहे ! अशा प्रतिभासंपन्न व उत्कट भक्तिरसप्रचुर काव्यानें अंतःकरण भक्तिरसानें भरून जाऊन, तें उन्नत नाहीं का होणार !

शाकुंतल नाटकामध्यें कविकुलगुरु कालिदास म्हणतोः—

स्वसुखनिरभिलाषः खिद्यसे लोकहेतोः ।
प्रतिदिनमथवा ते वृत्तिरेवं विधैव ॥
अनुभवति हि मूर्ध्ना पादपस्तीव्रमुष्णम् ।
शमयति परितापं छायया संश्रितानाम् ॥ १

" आपल्या स्वतःचे सुखाची यत्किंचित् पर्वा न करतां, हे राजा, तूं लोककल्याणार्थ कष्ट सोशीत आहेस; अथवा तुझी ही वृत्ति, वृक्षाप्रमाणें नेहमींचीच आहे ! कारण, वृक्ष हे कडक उन्हाचा ताप आपल्या डोक्यावर घेतात, व आश्रयास आलेल्या लोकांचा उन्हाचा ताप आपल्या छायेनें शमवितात ! "

वरील श्लोकामध्यें कवीनें दुष्यंत राजाचें वर्णन केलें आहे. आपल्या सुखाची पर्वा न करतां, प्रजेच्या कल्याणासाठीं अहर्निश झटणें, हा राजधर्म आहे असा श्लोकाचा तात्पर्यार्थ आहे. वृक्षाची समर्पक उपमा देऊन, राजधर्माचें रहस्य कवीनें उत्कृष्ट रीतीनें सांगितलें आहे. काव्यरस व तत्त्वज्ञान यांचा मिलाफ कसा उत्तम रीतीचा साधला आहे ! अशा काव्यानें अंतःकरणावर उत्कृष्ट संस्कार व्हावेत, यांत काय संशय आहे ? असो; याप्रमाणें, काव्यांतील पुष्कळ दाखले देतां येतील. सारांश, विद्यार्थ्यांच्या अंतःकरणवृत्तीस उचंबळून सोडणाऱ्या काव्यांतील मनोवेधक प्रसंगांनीं, अंतःकरणावर उत्कृष्ट संस्कार घडून तें उन्नत होत जातें.

वर लिहिल्याप्रमाणें, उत्कृष्ट काव्य, नाटक अथवा कादंबरी, यांच्या योगानें विद्यार्थ्यांच्या अंतःकरणवृत्तींचा विकास होण्यास

फार मदत होते, ही गोष्ट खरी; परंतु, कित्येक कादंबऱ्या व नाटकें या गोष्टीकडे अक्षम्य दुर्लक्ष करीत असतात; उच्च मनोवृत्तींचें चित्र ज्या नाटकामध्यें अथवा कादंबरीमध्यें उत्तम रेखाटलें आहे, तें नाटक अथवा ती कादंबरी, विद्यार्थ्यांकडून पढविल्यास त्यांचे शीलावर सुपरिणाम होईल; परंतु, हलक्या मनोवृत्तींचा उच्छ्रय होईल, अशीं बीभत्स व शृंगारिक नाटकें व कादंबऱ्या विद्यार्थ्यांचे हातीं पडल्यास, त्यापासून विद्यार्थ्यांचे शीलावर अनिष्ट परिणाम होईल. मानवी प्रकृतींतील तामसवृत्तींचें निर्दलन होण्याऐवजीं, असल्या प्रकारच्या पुस्तकानें, त्यांचा परिपोषच होण्याचा संभव आहे; याकरितां उत्तम नीतिबोधानें भरलेलीं पुस्तकें विद्यार्थ्यांकडून पढवावीं हा उत्तम मार्ग; परंतु, नीतिदृष्ट्या हानिकारक पुस्तकें वाचण्यापेक्षां, कांहींच वाचूं नये हें पुष्कळ बरें. वाईट पुस्तकें हातांत देऊन, विद्यार्थ्यांचें शील व नीति बिघडविण्यापेक्षां, एक वेळ तो निरक्षर व ठोंब्या राहिलेला पुरवला !

गृहाच्या कक्षेंतून सुटून मूल थोडें हातानिराळें व प्रौढ झालें, म्हणजे तें अर्थात्, शिक्षकाच्या ताब्यांत जातें; व मुलाचे बुद्धीची उत्कृष्ट वाढ करून, त्याचें उत्तम शील व नीति बनविणें, हें दुहेरी पवित्र काम शिक्षकास करावयाचें असतें. तेव्हां, शिक्षणासारखें पवित्र काम दुसरें कोणतें असणार बरें ? हें शिक्षणाचें पावित्र्य ओळखूनच शिक्षकासंबंधानें अत्यंत पूज्यबुद्धि ठेवावी, असा वेदामध्यें उपदेश केला आहे.

मातृदेवो भव । पितृदेवो भव । आचार्यदेवोभव ।

" मातेचे ठिकाणीं परमेश्वरासारखी पूज्यबुद्धि ठेव; तसेंच, पित्याचे ठिकाणीं व तसेंच, शिक्षकाच्या ठिकाणीं परमेश्वरासारखी पूज्यबुद्धि ठेव. " असो; तेव्हां शिक्षणाचें पावित्र्यास व विद्यार्थ्यांच्या पूज्यबुद्धीस साजेसें, शिक्षणाचें पवित्र काम शिक्षकाचे

हातून झाल्यास, समाजाची एक उत्कृष्ट कामगिरी साधल्याचें श्रेय शिक्षकांच्या पदरीं पडेल.

या शिक्षणाचे प्रकरणामध्यें, शिक्षणपद्धतीसंबंधानें थोडेंबहुत विवेचन केल्यास, तें अप्रस्तुत होणार नाहीं. नीतीचे सामान्य सिद्धांत व त्याबद्दलचे पाठ, शिक्षकानें मुलांच्या मनावर चांगले बिंबविले पाहिजेत. सद्वृत्तींना जागृत करणारे असे पुष्कळ प्रसंग इतिहासांत, काव्यांत अथवा कादंबऱ्यांत असतात; त्या प्रसंगांचें हुबेहुब चित्र मुलांच्या मनावर उमटेल, व त्यांचें रहस्य त्यांस समजेल, अशा प्रकारची शिक्षणाची पद्धति पाहिजे. अंतःकरणवृत्ति उचंबळून येतील, अशा रीतीनें मनोवेधक प्रसंगांची समजूत घालून, विद्यार्थ्यांच्या हृत्पटलावर, त्या प्रसंगांचा बरोबर ठसा उमटविला पाहिजे. शिक्षणाचे बाबतींत नीरसपणाची पद्धत उपयोगी नाहीं. मुलांच्या अंतःकरणवृत्ति आपल्या मधुर व बोधप्रचुर वाणीनें शिक्षकानें जागृत केल्याशिवाय, त्यांचा विकास कसा होईल ? अंतःकरणवृत्तींस उन्नत करणारे मनोवेधक प्रसंगांची समजूत घालतेवेळीं, प्रसंगांच्या महत्त्वानुरूप आपल्या अंतःकरणाची वृत्ति ठेवून, मुलांचीं अंतःकरणें शिक्षकानें आपल्याकडे खेंचून घेतलीं पाहिजेत. विद्यार्थ्यांच्या अंतःकरणामध्यें सद्वृत्तींचा मधुर रस उत्पन्न झाला पाहिजे; त्यांचें अंतःकरण मधुररस स्रवणारें झालें, तरच त्यांना खरें नीतिशिक्षण मिळालें असें होईल. अंतःकरण पाषाणासारखें घट्ट व नीरस राहिलें, व त्यामध्यें सद्वृत्तींची लाट उत्पन्न होईना, तर तें शिक्षण फुकट होणार आहे !

कोणत्याही विषयाची समजूत घालतेवेळेस, मुलांचे स्वाभाविक दोष काय आहेत इकडेही शिक्षकानें अवश्य लक्ष पुरविलें पाहिजे. विषयाची अर्धवट समजूत झाली न झाली, तों पुढें पळण्याची संवय कित्येक विद्यार्थ्यांना असते. विषय पक्का समजून घेण्याइतकी

मनाची स्थिरता राहात नाहीं. अर्धेमुर्धे शिजलेल्या अन्नाचें सेवन केल्यास, तें शरीरास सुखावह होत नाहीं; तसेंच, अर्धवट समजलेल्या विषयापासून बुद्धीची वाढ होणें शक्य नाहीं. त्याप्रमाणेंच, बिनचूक विचार करण्याची संवय विद्यार्थ्यांना लागेल, अशी खबरदारी शिक्षकानें घेऊन, त्यांच्या ईश्वरनिर्मित तारतम्यबुद्धीची योग्य वाढ केली पाहिजे. विचारांतील घाई, चूक, असंबद्धता, गैरसमजूत, निराधार अनुमान वगैरे दोष चौकसबुद्धीनें पाहून, ते काढून टाकण्याविषयीं सतत खटपट झाली पाहिजे. हे दोष हळूहळू काढून टाकण्याची तजवीज झाली नाहीं, तर बुद्धीची वाढ न होता बुद्धिमांद्य उत्पन्न होऊन, तिची वाढ खुंटून जाईल. सारांश, ईश्वरनिर्मित तारतम्यबुद्धीचा योग्य विकास करून, बिनचूक, व्यवस्थित व साधार विचार करतां येईल, अशी संवय विद्यार्थ्यांना लावून, विषयाची नीट ओळख करून देणें, म्हणजे योग्य बुद्धिविषयक शिक्षण देणें होय. बुद्धिविषयक शिक्षणाचा शील व नीतिमत्ता यांवर थोडाबहुत परिणाम होत असतो, म्हणून विचारपद्धतींत शुद्धि होऊन, बिनचूक विचार करतां येणें, ही नैतिक शिक्षणाच्या दृष्टीनें श्रेयस्कर गोष्ट आहे.

मनुष्य विद्वान झाला, त्याची बुद्धि प्रगल्भ होऊन विचारसरणी शुद्ध व बिनचूक झाली, बऱ्यावाईटाची निवड करण्याचें बुद्धीस सामर्थ्य आलें, नीतिसिद्धांतांची स्पष्ट जाणीव होऊन त्यांचें बरोबर रहस्य कळून आलें; तथापि, तेवढ्यानें नीतिशिक्षणाची जरूरी बिलकुल कमी होत नाहीं. प्रसिद्ध ग्रंथकार डॉक्टर जॉनसन यानें एके ठिकाणीं म्हटलें आहे:—

"Men speak like angels and act like men."

"माणसें देवासारखें बोलतात, पण आचरण मनुष्यासारखेंच करितात." याप्रमाणें, शहाणपणाचें भाषण आपण नेहमीं बोलत

असतों, परंतु, त्याप्रमाणें आपली कृति नेहमीं वठते काय ? समंजस व शहाणासुर्ता माणूस, ज्याची बुद्धि प्रौढ झाली, जो विद्वान् म्हणून गणला गेला, त्याचें प्रत्यक्ष आचरण जसें असावें तसें नेहमीं असतें काय ? इतकेंच नव्हे तर, ज्यांचें आचरण त्यांच्या विद्वतेस शोभत नाहीं, असे पुरुष आपण थोडे का पाहतों ? या गोष्टीचा उलगडा इतकाच आहे कीं, बुद्धीच्या विकासाबरोबर अंतःकरणाचा विकास त्या मानानें अवश्य होतोच असें नाहीं. केवळ बुद्धिविषयक शिक्षणानें अंतःकरणवृत्तींचा विकास होऊन, त्या उन्नत होतातच असें नाहीं. स्थूलमानानें पाहतां, बुद्धि आणि अंतःकरण ह्या मनुष्यामध्यें दोन स्वतंत्र शक्ति आहेत. त्यांचा परस्परांशीं अन्योन्य संबंध आहे ही गोष्ट खरी, तथापि, या दोन्ही शक्तींची वाढ स्वतंत्ररीतीनें झालीच पाहिजे. मनुष्याची नीति वाढण्यास त्याच्या अंतःकरणावर उत्कृष्ट संस्कार घडून, तें उन्नत होत गेलें पाहिजे. नीतिशिक्षणाच्या योगानें अंतःकरणवृत्तींस पाझर फुटला पाहिजे; पाझर फुटून त्या वृत्ति द्रवरूप झाल्या पाहिजेत. सर्व बऱ्यावाईट कृत्यांस कारणीभूत होणारी शक्तिही अंतःकरणवृत्तींमध्येंच आहे, व या अंतःकरणवृत्ति ज्या मानानें संस्कृत होऊन उन्नत होत जातील, त्यामानानें, शीलाची व नीतिमत्तेची वाढ होऊन, मनुष्यास श्रेष्ठत्व प्राप्त होईल.

---

# प्रकरण ४ थें

# शील आणि संसार

एते सत्पुरुषाः परार्थघटकाः स्वार्थान्परित्यज्य ये ।
सामान्यास्तु परार्थमुद्यमभृतः स्वार्थाविरोधेन ये ॥
तेऽमी मानवराक्षसाः परहितं स्वार्थाय विघ्नन्ति ये ।
ये तु घ्नन्ति निरर्थकं परहितं ते के न जानीमहे ॥ १

—भर्तृहरि

बालपणापासून शारीरिक शिक्षण उत्कृष्ट तऱ्हेचें मिळून, शरीर सदृढ व जोमदार झालें; शरीराच्या सदृढतेमुळें, मन उत्साहसंपन्न, जोरदार, व कार्यक्षम झालें; शिक्षणाच्या योगानें बुद्धीचें मांद्य जाऊन, ती तीव्र व तरतरीत होऊन, विचारांत स्थिरता, सरळपणा व बिनचूकपणा आला; व नीतिशिक्षणाच्या योगानें, अंतःकरणावर उच्च व श्रेष्ठ संस्कार घडून, अंतःकरणवृत्तींचा विकास होऊं लागला; तथापि, इतक्याच सामुग्रीवर, अत्युच्च व श्रेष्ठ अशा नैतिक वातावरणामध्यें यथेच्छ वावरण्याची पात्रता मनुष्याच्या अंगीं आली, असें म्हणतां यावयाचें नाहीं. बालपणीं गृहामध्यें मनावर झालेले उत्कृष्ट संस्कार, व प्रौढपणीं मिळालेलें उत्तम शारीरिक व मानसिक शिक्षण, इतकी सामुग्री घेऊन, मनुष्यास पुढील मार्ग अद्याप बराच लांब आक्रमावयाचा आहे. नीतिपथाचे निरनिराळे टप्पे आहेत, त्यांचें धैर्यानें व नेटानें आक्रमण करून, अखेरच्या टप्प्यास पोंचून, मानवी जीविताचें श्रेष्ठ साफल्य करणें, हें काम बरेंचसें अवघड आहे; तथापि, या टप्प्यांपैकीं, प्रत्येक टप्प्याचा प्र-

वास व्यवस्थित रीतीनें व धैर्यानें केला, तर पुढील मार्ग सोपा होत जातो. बालपणीं गृहामध्यें बालाचे मनावर उत्कृष्ट संस्कार घडले, तरच, प्रौढपणीं शिक्षणाच्या योगानें अंत:करणवृत्तींचा विकास होत जातो; बालपणांतील उत्तम संस्कार व प्रौढपणीं मिळालेलें उत्तम शारीरिक व मानसिक शिक्षण, इतकी साधनसामुग्री घेऊन, मनुष्यास आतां अफाट संसारामध्यें शिरावयाचें आहे. पक्षी आपल्या पिलांस प्रथमतः चोंचीनें दाणापाणीं घालतो; व पिलें थोडीं मोठीं होऊन, त्यांना पंख फुटले, म्हणजे, त्यांस आपल्याबरोबर उडावयास नेतो; व त्यांना चांगले उडतां येऊं लागलें, म्हणजे तीं पिलें हवेंत खुशाल वाटेल तिकडे भराऱ्या मारूं लागतात; त्याप्रमाणेंच, बालपणची व प्रौढपणची संस्कारसामुग्री बरोबर घेतल्यामुळें, अफाट संसारामध्यें वावरण्यास मनुष्य लायक व योग्य होतो. नैतिक उन्नतीच्या श्रेष्ठ पायरीस पोंचण्यासाठीं बाल्यावस्था व प्रौढावस्था या दोन पायऱ्या व्यवस्थित रीतीनें ओलांडल्या गेल्या, म्हणजे तिसरी पायरी सांसारिक आयुष्यक्रमाची होय. बालपणीं बालाचे मनावर सभोंवतालच्या परिस्थितीचें प्रतिबिंब उमटतें; प्रौढपणीं विचारजागृति झाल्यामुळें, शिक्षणाच्या योगानें त्याचें मन सुविचार व श्रेष्ठ संस्कार यांनीं संपन्न करावयाचें असतें; व पुढें मनुष्य संसारांत शिरला, म्हणजे आपलें कर्तव्य बजावून, त्याला आपली उन्नति करावयाची असते. तात्पर्य, बाल्यावस्थेमध्यें संस्कार, प्रौढावस्थेमध्यें शिक्षण, व सांसारिक अवस्थेमध्यें कर्तव्य, यांच्यायोगानें मनुष्याच्या अंत:करणवृत्तींचा विकास होत असतो. मानवी आयुष्यांतील या तीन अवस्थांमध्यें, अंत:करणवृत्तींचा विकास करणारीं हीं मुख्य तीन साधनें होत. प्रौढावस्थेमध्यें मनुष्य कर्तव्यशून्य असतो असें नाहीं; परंतु या अवस्थेमध्यें त्याचें काम, मुख्यत्वेंकरून बौद्धिक व नैतिकशिक्षण संपादण्याचें असतें. त्याप्रमाणेंच, सांसारिक अवस्थेमध्यें,

मनुष्यास शिक्षणाचा लाभ होत नाहीं असें नाहीं; परंतु या अवस्थेमध्यें त्याचें काम मुख्यत्वेंकरून आपलें कर्तव्य बजावून, उन्नति करून घेणें हें असतें.

आपलें कर्तव्य बजावल्यामुळें, अंतःकरणाचा विकास होत जातो. अंबुज कमल सूर्याच्या किरणांनीं उमलतें, त्याप्रमाणें, सत्कृत्यानें अंतःकरणवृत्ति विकसित व प्रफुल्लित होतात; परंतु कर्तव्य हें सांसारिक अवस्थेचें रहस्य असून, संसारांत राहिल्यामुळेंच, मनुष्यास सत्कृत्यें करण्याची उत्कृष्ट संधि मिळते; तेव्हां, अंतःकरण उन्नत करण्याचें संसार हें उत्कृष्ट साधन आहे, असें उघड दिसतें. संसारांत राहिल्यामुळें, मनुष्याचे निरनिराळ्या व्यक्तींशीं संबंध उत्पन्न होतात, व त्यांमुळें, त्यास त्यांच्याबद्दलचें कर्तव्यकर्म योग्य रीतीनें बजावणें जरूर असतें. कर्तव्यनिष्ठा उत्पन्न होऊन, मनुष्य आपलें कर्तव्य योग्य रीतीनें बजावूं लागला, म्हणजे त्याच्या अंतःकरणवृत्ति उन्नत होत जातात. मानवी अंतःकरणामध्यें परमेश्वरनिर्मित सद्गुणांचें बीज असतें; तें बीज प्रापंचिक कर्तव्याच्या साधनानें वाढीस लागतें. योग्य प्रापंचिक कर्तव्याचें त्यास पाणी घालीत गेलें, तर त्या बीजास अंकुर फुटून, त्याचा हळूहळू उत्कृष्ट वृक्ष बनतो; प्रापंचिक कर्तव्याचें पाणी त्यास मिळालें नाहीं, तर तें करपून जावयास लागतें. एकाद्या मनुष्यास पुष्कळ वर्षें सतत अंधारकोठडीमध्यें कोंडून ठेवलें, तर त्याच्या डोळ्यांतील स्वाभाविक तेज नष्ट होऊन जातें; डोळ्यांतील हें स्वाभाविक तेज, सूर्यप्रकाशाच्या सतत-संबंधामुळेंच कायम राहतें; त्याचप्रमाणें, मानवीअंतःकरणांमधील सद्गुणांचें तेज, सांसारिक कर्तव्यामुळेंच वृद्धिंगत होत जातें. सर्व प्रापंचिक कर्तव्य सोडून, एकाद्या फटिंगाप्रमाणें मनुष्य राहूं लागला, तर जन्मभर अंधारकोठडींत कोंडलेल्या माणसाप्रमाणें, त्याचे अंतःकरणांतील सद्गुण कधींही विकास पावणार

नाहींत. शरीर सदृढ करण्यास व्यायामाची अत्यंत जरूरी आहे; बुद्धीची तीव्रता व सामर्थ्य वाढविण्यासाठीं, बुद्धिविषयक शिक्षण अवश्य आहे; त्याप्रमाणेंच, अंतःकरणांतील सद्वृत्तींचा विकास करण्यास, प्रापंचिक कर्तव्य हें उत्कृष्ट साधन आहे. संसार सोडून निर्जन वनांत एकादा मनुष्य राहील तर, त्याचें अंतःकरण नीरस होत जाऊन, अखेर त्यांतील सद्वृत्तींचा लोप होईल. मानवी शरीरांतील हस्तपादादि इंद्रियें, आपापलीं कामें नित्य करीत आहेत, म्हणूनच, त्यांचें सामर्थ्य कायम राहिलें आहे; तसेंच सांसारिक कर्तव्यामुळें, अंतःकरणावर उत्कृष्ट संस्कार घडतात, ह्यामुळें, अंतःकरणांतील सद्वृत्ति कायम राहतात इतकेंच नव्हे, तर हळूहळू उन्नत होत जातात.

सर्वसंगपरित्याग करून व अरण्यवास पतकरून, ईश्वराची भक्ति करूं इच्छिणारे लोक, सामान्यतः अजाण असतात असें दिसून येईल. सांसारिक कर्तव्यकर्मास पारखे होणाऱ्या लोकांच्या अंतःकरणामध्यें प्रेम आणि भक्ति यांचा पाझर कोठून उत्पन्न होणार ? प्रापंचिक कामास कंटाळलेल्या मनुष्याचे मनांत उद्वेग आणि कंटाळा यांशिवाय दुसरें काय सांपडणार? लहानशा विहीरींत ज्याला चांगलें पोहतां येत नाहीं, त्याला अफाट सागरामध्यें कसें पोहतां येईल ! घाबरून, गटंगळ्या खाऊन मध्येंच बुडण्याची पाळी येणार ! संसारांत नसल्यामुळें, सार्वत्रिक प्रेमाचा झरा ज्या अंतःकरणांत उत्पन्न होत नाहीं; उलट, उद्वेगानें ग्रस्त झाल्यामुळें, जें अंतःकरण संसाराचा त्याग करतें, तसलें नीरस अंतःकरण परमेश्वराच्या भक्तीनें काय द्रवणार आहे ! अशा स्थितींत, परमेश्वरप्राप्तीची इच्छा करणाऱ्या माणसाची अवस्था अफाट सागरामध्यें उडून पैल तीरास जाण्याची खटपट करणाऱ्या कावळ्यासारखीच व्हावयाची ! मध्येंच शक्तिहीन होऊन, खालीं पडून बुडण्याचीच पाळी याव-

याची ! परमेश्वरास आळवितां येईल, इतक्या श्रेष्ठ दर्जाच्या प्रेमाचा पाझर, संसारामध्यें असतांनाच अंतःकरणामध्यें उत्पन्न व्हावा लागतो. क्वचित् अपवाद असतील; पण, त्यामुळें सामान्य नियमास बाध येत नाहीं.

प्रसिद्ध स्वामी विवेकानंद यानीं एक गोष्ट लिहिली आहे. एक हटयोगी सर्वसंगपरित्याग करून, योगसाधनानें परमेश्वरप्राप्ति करून घ्यावी, म्हणून एका अरण्यांत जाऊन राहिला. दररोज पहांटे उठून, स्नानसंध्यादि नित्यकर्म आटपून, झाडाखालीं ओट्यावर कांहीं वेळ योगसाधन करून, मग जवळच्या गावांत जाऊन भिक्षा मागून आणावयाची, असा त्याचा नित्यक्रम असे. एके दिवशीं, नेहमींप्रमाणें स्नानसंध्या आटपून, योगसाधन करण्यासाठीं तो आपल्या नेहमींच्या ठिकाणीं बसला असतां, झाडावरील चिमण्यांच्या किलकिलाटामुळें, त्याचें साधन जमेना त्यामुळें रागानें तो फारच संतप्त झाला; व रागानें त्या चिमण्यांकडे पाहूं लागला, तेव्हां त्याच्या तपाच्या प्रभावानें उत्पन्न झालेल्या तेजानें चिमण्या जळून खाक झाल्या ! नंतर साधन करून, जवळच्या गांवांत तो एका घरीं भिक्षा मागण्यास गेला. त्यानें भिक्षा बरेच वेळां मागितली, परंतु कोणी लवकर घालीना; तेव्हां हा योगी रागावला; इतक्यांत, एक बाई भिक्षा घालण्यासाठीं आली; तेव्हां, योगी रागावला आहे असें पाहून, ती त्यास म्हणाली, अरे बाबा, मी झाडावरची चिमणी नाहीं; मला तुझा राग काय करणार आहे ! हें तिचें अर्थपूर्ण भाषण ऐकून, योगी आश्चर्यचकित झाला; व ही बाई महाज्ञानी असावी, अशी त्याची खात्री होऊन, त्यानें बाईस साष्टांगप्रणिपात करून, त्या रानांतील चिमण्यांची हकीकत कशी समजली म्हणून तिला विचारलें. बाईनें उत्तर केलें कीं, "तुझें तें तपबिप मला कांहीं माहीत नाहीं; मी आपलीं रोजचीं संसाराचीं कामें मन ला

वून करतें; व भ्रतार, सासू, सासरा वगैरे घरांतील वडील माणसांची सेवाचाकरी एकनिष्ठपणानें करतें; या माझ्या कर्तव्यनिष्ठेमुळें, मला सर्व कांहीं समजतें.

या संबंधांत, शिवाजी महाराजांस उद्देशून तुकारामबावांनीं केलेला उपदेश फार सरस आहे; त्याबद्दलची हकीकत रा० कृ० अ० केळूसकर यांचे ' छत्रपति शिवाजी महाराज ' यांचे चरित्रांत लिहिली आहे, ती अशीः—" एके समयीं तुकारामबावा लोहगांवास येऊन रात्रीस घरोघर कीर्तनें करीत आहेत असें ऐकून, महाराज त्यांपैकीं एक कीर्तन श्रवण करावयास एकदां आपल्या बरोबरच्या लोकांसह गेले. त्यांत तुकारामबुवांनीं वैराग्यवृत्तीचें महत्त्व व लक्षण वर्णन करून, विठ्ठलभक्तीचा सोपा मार्ग स्वीकारावा असा श्रोत्यांस बोध केला. ऐहिक वैभवाची व ऐश्वर्याची अस्थिरता, विषयसुखाची अनर्थावहता, व जीविताची क्षणभंगुरता श्रोतृवृंदांच्या मनांत पूर्णपणें ठसण्यासारखा त्यांचा तो बोध श्रवण करून, महाराजांच्या चित्तवृत्तींत विलक्षण पालट झाला. ते मूळचेच भाविक व सुवृत्त असल्यामुळें, तुकारामबावांचें तें बोधामृतप्रचुर वक्तृत्व श्रवण करून, त्यांचें चित्त तल्लीन झालें, आणि त्यांच्या उपदेशानुसार वर्तन केल्यास निःसंशय कैवल्यप्राप्ति होईल, अशी त्यांच्या प्रेमळ व ऋजु अंतःकरणाची तत्काळ खात्री झाली. कीर्तन आटोपल्यावर महाराज बावांचा निरोप घेऊन, आपल्या मुक्कामास गेले व तेथून उठून रानांत एकांतीं जाऊन बसले; व बावांच्या बोधाचें मनन करूं लागले. ही त्यांची वृत्ति पाहून बरोबरचे कारभारी त्यांच्याकडे जाऊन, ही अशी उपरति या वयांत आपणांस होणें उचित नव्हे, असा त्यांशीं बुद्धिवाद करूं लागले. हें त्यांचें बोलणें महाराजांनीं मुळीं मनास आणिलें नाहीं. कारभारी मंडळीस मोठी चिंता उत्पन्न झाली; आणि त्यांनीं ही सगळी हकीकत जिजाबाई

मातुश्रीस लिहून कळविली. तेव्हां ती लागलींच शिबिकेंत बसून लोहगांवास आली आणि पहिल्यानें तुकारामबावांच्या दर्शनास जाऊन तिनें त्यांना हात जोडून व पदर पसरून अशी विनंति केली कीं, " स्वामीमहाराज, माझा पुत्र शिवाजी आपलें कीर्तन ऐकून विरक्त झाला आहे, आणि संसाराचा त्याग करून वनांत जाऊन बसला आहे. त्यानें संपादिलेलें राज्य आतां कोण संभाळील बरें ? तें पुन्हां यवनांच्या हातीं जाऊन गरीब हिंदु प्रजेस त्या विधर्मीयांचा जाच पुनरपि सोसावा लागेल. तेव्हां ह्या गोष्टीकडे नजर पुरवून त्यास राज्यसाधनाचा उद्योग न सोडण्याविषयीं बोध करावा. " हें तिचें नम्रतेचें भाषण ऐकून तुकारामबावांनीं तिला आश्वासन दिलें आणि सांगितलें कीं, " शिवाजी महाराज नेहमींप्रमाणें आज रात्रीं कीर्तनास येतील, त्या वेळीं मी त्यांना दोन गोष्टी सांगून त्यांचें मन पुन्हां संसाराकडे लागेसें करितों. "

ह्याप्रमाणें व्यवस्था करून जिजाबाई रात्रीं बावांच्या कीर्तनास येऊन बसली. महाराजही नित्यनियमाप्रमाणें कीर्तनास आले. ह्या प्रसंगीं बावांनीं कर्मकांडाचें प्रयोजन काय आहे तें सांगून, ज्यानें त्यानें आपआपल्या धर्माप्रमाणें वर्तन करावें यांतच खरें श्रेय आहे, असें प्रतिपादन केलें. हरिभक्तीसाठीं संसाराचा त्याग करून वनांत जाऊन बसण्याचें कांहींएक कारण नाहीं. जनांत राहून आपला संसार नेकीनें व माणुसकीनें चालवून आपल्या बांधवांच्या सुखांत शक्त्यनुसार भर घालण्यास अहर्निश झटावें, यांत खरा मर्दपणा आहे. आपल्या सभोंवतालील जनांची सर्व प्रकारें वाईट स्थिति प्रतिक्षणीं दृष्टीस पडत असतां, अशा विपन्न जनांचा त्याग करून केवळ स्वमोक्षासाठीं गिरिकुहरांत जाऊन बसण्यांत मुळींच पुरुषार्थ नाहीं; आणि स्वजनकल्याणहेतूनें संसारांत राहावयाचें म्हटलें म्हणजे गृहस्थाश्रमासारखा दुसरा आश्रम मनुष्यास हितप्रद होणें

नाहीं. जगास कंटाळून, बायकामुलांचा त्याग करून व सर्वांगास राख फांसून जे विरक्त होतात, त्यांच्या हातून इंद्रियांचें दमन न होऊन ते पुन: पुन्हां मोहवश होतात, आणि जनाच्या अधिक्षेपास पात्र होतात. अशा विटंबना पावणाऱ्या मनुष्यास कोठेंच मान नाहीं, व तो खऱ्या मोक्षासही आंचवतो. तेव्हां तात्पर्य काय कीं, गृहस्थाश्रमाचा त्याग करून, गोसावी बनून इतस्तत: भ्रमण करीत राहण्यापेक्षां संसारांत राहून नीतीनें वागावें व परोपकार व हरि-भक्ति करण्यांत आयुष्य घालवावें, हें विशेष चांगलें. याप्रमाणें सर्व-साधारण असा बोध करून तुकारामबावांनीं राजाच्या कर्तव्यासंबं-धानें थोडेसें विवेचन केलें. त्यांत त्यांनीं असें दाखवून दिलें कीं, राजा जर सदाचारी व प्रजापालनदक्ष असला, तर त्याच्या हातून लोककल्याण पुष्कळ होण्यासारखें असतें. पुराणांतरीं वर्णिलेल्या अंबरीष, जनक, धर्म आदिकरून राजर्षींचीं उदाहरणें देऊन त्यांनीं असें सिद्ध केलें कीं, हरिभक्ति व सद्वर्तन साध्य करण्यासाठीं रा-जानें सुद्धां स्वराज्यत्याग करण्याची गरज नाहीं. हा असा अनेक दृष्टांत देऊन मोठ्या कळवळ्यानें केलेला सद्बोध महाराजांनीं ऐ-किला, तेव्हां त्यांची वृत्ति अगदीं तटस्थ होऊन गेली. बावांनीं के-लेला एकंदर बोध सत्य असून तदनुसार वागण्यांतच वास्तविक हित आहे, असा त्यांच्या बुद्धीचा निर्धार झाला; आणि मग तु-कारामबावांच्या व आपल्या मातोश्रीच्या चरणांवर मस्तक ठेवून, ते स्वथानीं परत गेले, व आपला स्वराज्यसंपादनाचा स्तुत्य क्रम त्यांनीं पुढें चालविला."

सारांश, सांसारिक कर्तव्य हें अंत:करणवृत्तींस उन्नत करण्याचें उत्कृष्ट साधन आहे.

या सांसारिक कृत्याचा आरंभ प्रथमत: घरांतच होत असतो. कौटुंबिक कर्तव्य आपण योग्य रीतीनें करूं लागलों, म्हणजे अंत:-

करणांतील प्रेमवृत्तींचा विकास होत जातो. ज्याला मुलेंबाळें, आप्तइष्ट, बंधु वगैरे कोणी स्वकीयजन नाहींत अशा फटिंग मनुष्याचें अंतःकरण प्रेमार्द्र होण्याचा संभव सामान्यतः फारच कमी. फटिंग मनुष्य बहुतकरून बेपरवा, नीरस व प्रेमशून्य बनतो; परंतु कौटुंबिक कर्तव्यामुळें, कौटुंबिक मनुष्याच्या अंतःकरणांतील प्रेमवृत्तींचा विकास होण्यास पुष्कळ वाव सांपडतो. प्रेममय कर्तव्यानें प्रेमाचा विकास होतो; प्रेमानेंच प्रेमवृद्धि होते.

वर लिहिल्याप्रमाणें, लहानशा कौटुंबिक प्रेममय कर्तव्यानें अंतःकरणवृत्तींचा विकास होत जातो; त्याचप्रमाणें, या कौटुंबिक संसाराबाहेरील अफाट संसारांत प्रेमबुद्धीनें उच्चतर कर्तव्य करणाऱ्या मनुष्यश्रेष्ठाच्या अंतःकरणवृत्तींचा विकास अधिकच होत जातो; कारण, प्रेममय कर्तव्याचें क्षेत्र जसजसें विस्तृत होत जातें, तसतसा प्रेमवृत्तींचा विकास अधिकाधिकच होत जातो; अखेर,

‘ वसुधैव कुटुंबकम् ’

“ सर्व जगच कुटुंब आहे ” ही श्रेष्ठ भावना मनांत धरून, जे सत्पुरुष आपलें कर्तव्य करीत असतात त्यांच्या अंतःकरणवृत्ति श्रेष्ठ दर्जाच्या होत जाव्यात यांत नवल तें काय ? आणि या कौटुंबिक संसाराबाहेरील उच्चतर अशा प्रेममय कर्तव्यासच परोपकाराचें कृत्य म्हणतात. परोपकाराचीं कृत्यें करण्याची संवय लागत चालली म्हणजे वृत्तिविकासाचें काम फार झपाट्यानें सुरू होतें; व अखेर या परोपकाराच्या कृत्यांमुळें, स्वार्थबुद्धीचा पूर्ण लोप होऊन, परोपकारबुद्धीचा पूर्ण उदय होतो. परोपकाराचा महिमाच असा आहे. या परोपकाररूपी यज्ञामध्यें स्वार्थाची आहुती देऊन, स्वार्थ पार जाळून टाकून, ज्या पुण्यश्लोक पुरुषांनीं अजरामर कीर्ति मिळविली आहे त्यांचा इतिहास वाचला म्हणजे अंतः-

करणवृत्ति अत्युच्च व श्रेष्ठ दर्जाच्या ज्या होतात त्या तशा परोपकाराच्या कृत्यांमुळें होतात असें दिसून येईल. परंतु, परोपकाराचीं कृत्यें करण्यास या संसाराशिवाय दुसरीकडे कोठें वाव सांपडणार आहे ?

परोपकारबुद्धीमुळें जे महात्मे दुसऱ्याचें हित साधण्याविषयीं सदैव तत्पर असतात, त्या पुरुषश्रेष्ठांच्या अंतःकरणांतील क्षुद्रवृत्ति नष्ट होऊन श्रेष्ठवृत्ति पूर्णपणें विकास पावतात. मथळ्यांतील श्लोकांत सांगितल्याप्रमाणें, आपल्या हिताहिताची परवा न करतां दुसऱ्याचें हित करण्याविषयीं तत्पर असतात तेच सत्पुरुष होत. इंग्लंडचा राजा आलफ्रेड दि ग्रेट, ग्रीसदेशांतील प्रसिद्ध महात्मा सॉक्रेटिस, शार्मण्य देशांतील सद्धर्मसंस्थापक मार्टिन लूथर, हिंदुस्थानांतील बौद्धधर्मसंस्थापक गौतम बुद्ध, अमेरिकेंतील सुप्रसिद्ध पुरुष जॉर्ज वार्शिंगटन व महाराष्ट्रांतील थोर विभूति शिवाजी महाराज वगैरे श्रेष्ठपुरुष याच कोटींतील होत. आईचें अंतःकरण आपल्या मुलाच्या कल्याणासाठीं तिळतिळ तुटतें, त्याप्रमाणें, ज्या राजाचें अंतःकरण प्रजेच्या सौख्याकरितां व कल्याणाकरितां तिळतिळ तुटत होतें; आपल्या सुखाची परवा न करतां प्रजेच्या सुखाकरितां जो श्रेष्ठ राजा अव्याहत व निरपेक्ष श्रम करी; ज्यानें आपल्या देशाचे उद्धाराकरतां पुष्कळ हाल-अपेष्टा सोसून परकीय डेन्स लोकांना इंग्लंडमधून मोठ्या पराक्रमानें पिटाळून लाविलें; व शहाणपणानें व निःस्वार्थबुद्धीनें राज्याची नीट व्यवस्था लाविली, त्या आलफ्रेड दि ग्रेट राजाच्या थोरवीचें किती वर्णन करावें बरें ! या अत्युच्च कर्तव्यनिष्ठेमुळें, अंतःकरणांतील सद्वृत्तींचा पूर्ण विकास व्हावा यांत काय आश्चर्य आहे ? सर्व मानवजातीचें पाप नष्ट करून टाकून, सर्वांना सन्मार्गास लावण्याच्या उदात्त हेतूनें प्रेरित होऊन, ज्या पुण्यश्लोक पुरुषानें, आईबाप, स्त्रीबालक, आप्तबंधु,

यांचा मोहपाश तोडून टाकला, व सर्व ऐश्वर्यावर व सुखावर पाणी सोडून मध्यरात्रीं सुंदर राजवाडा सोडून हिडिस अरण्यवास पत्करला, व ज्यानें आपल्या श्रेष्ठ उपदेशानें व शुद्ध आचरणानें हजारों लोकांस पवित्र केलें, त्या महात्म्या गौतमबुद्धाचें अंतःकरण किती थोर असावें बरें ? असल्या परमपवित्र व प्रेममय कर्तव्यानें अंतःकरणवृत्ति उन्नत झाल्या तर त्यांत नवल कसलें ?—गोब्राह्मणपरिपालन करण्याच्या सद्‌बुद्धीनें प्रेरित होऊन, आपला उदात्त हेतु साधण्याकारितां ज्यानें भगीरथ प्रयत्न केले, व सर्व आयुष्यभर आपल्या शरीराची, आपल्या सुखाची व आपल्या स्वार्थाची बिलकुल परवा न करतां, ज्या पुरुषश्रेष्ठानें आपलें तन, मन, धन लोककल्याणाला अर्पण केलें; तात्पर्य, परहितरूपी यज्ञामध्यें ज्या महात्म्यानें आपल्या प्राणांची आहुति दिली, त्या शिवाजीमहाराजांचें अंतःकरण किती श्रेष्ठ व थोर असावें बरें ! श्रेष्ठ कृत्यांनीं अंतःकरण श्रेष्ठ व उदात्त बनावें हें योग्यच आहे.

वर ज्या विभूतींचा उल्लेख केला आहे त्या विभूति इतस्ततः क्वचितच चमकतात; हे पुरुष व त्यांचीं कृत्यें अलौकिक कोटींतील होत यांत शंका नाहीं; तथापि, असल्या श्रेष्ठ माणसांनासुद्धां सांसारिक कृत्यें करूनच आपल्या चित्तवृत्तींचा विकास करावयाचा असतो; तात्पर्य, मनुष्य श्रेष्ठ असो वा कनिष्ठ असो, प्रत्येकानें आपापल्या मगदुराप्रमाणें व अधिकाराप्रमाणें, प्रापंचिक कृत्यें निरलसपणानें व निष्ठेनें करूनच अंतःकरणाची उन्नति करावयाची आहे. प्रापंचिक कृत्यें न करतां नैतिक उन्नति करूं इच्छिणें म्हणजे मनांत मांडे खाण्यासारखेंच निष्फल आहे; किंवा पायांशिवाय चालण्याची खटपट करण्यासारखेंच व्यर्थ आहे. सारांश, लहानमोठीं प्रापंचिक सत्कृत्यें केल्याशिवाय नैतिक उन्नति होणार नाहीं. मनुष्यानें आपली उन्नति करून घ्यावी याकरितांच परमेश्वरानें संसा-

राची योजना केली आहे; एरवीं, या अवाढव्य प्रपंचाचा सामान्य मनुष्य कितीसा फायदा करूं शकणार आहे? परंतु, या प्रपंचामुळें मनुष्याचा मात्र अतोनात फायदा व त्याची उन्नति होण्यास मदत होते; आपले उपकार जगावर कितीसे होणार आहेत, जगाचेच आपल्यावर फार उपकार आहेत, अशा अर्थाचें विधान प्रसिद्ध स्वामी विवेकानंद यांनीं एके ठिकाणीं केलें आहे तें अगदीं यथार्थ आहे. आंधळे, पांगळे, थोटे वगैरे निराश्रित लोकांना थोडीबहुत मदत केल्यानें किंवा एकादी लहानशी देणगी दिल्यानें त्यांचा कितीसा फायदा होणार आहे? त्यामुळें त्यांची कितीशी नड भागणार आहे? परंतु, या सत्कृत्यांमुळें, सत्कृत्य करणाऱ्या माणसाची अंतःकरणवृत्ति विकास पावते; तें सत्कृत्य त्याच्या उन्नतीचें मात्र साधन होतें.

सांसारिक कर्तव्य केल्यामुळें, मानवी अंतःकरणांतील प्रेमवृत्तींचा विकास होत जातो असें पूर्वीं सांगितलें आहे; या प्रेमवृत्तींचा विकास होऊं लागला, म्हणजे अंतःकरणांतील क्षुद्र स्वार्थ-प्रवृत्ति कमजोर होत जातात. मानवी अंतःकरणामध्यें सद्गुणांचें बीज आहे तसेंच स्वार्थाचेंही बीज आहे; अंतःकरणांत स्वार्थवृत्ति बिलकुल नसती तर मनुष्य देवांच्या पंक्तीला जाऊन बसला असता व सृष्टीची घटना पार बदलून गेली असती! सृष्टींतील सर्व व्यापार व घडामोड स्वार्थमूलक आहे असें म्हटल्यास अतिशयोक्ति होणार नाहीं. ही स्वार्थवृत्ति अंतःकरणांतून नष्ट झाली तर सर्व व्यापार व उद्योग बंद पडतील. स्वार्थप्रवृत्तीमुळें उद्योग सुरू होतो व उद्योगामुळें स्वार्थ साधतो अशी सृष्टींतील व्यवस्था आहे. या सृष्टीच्या घड्याळाच्या चक्रास कायमची गति देणारी कळ, स्वार्थबुद्धि हीच आहे; आणि ही स्वार्थबुद्धि म्हणजे प्रत्येकाचें स्वतःवरील प्रेम होय. हें स्वतःवरील प्रेम मर्यादित, निष्कलंक व शुद्ध असें असावयास

पाहिजे; परंतु ही स्वार्थबुद्धि बेमर्यादरीतीनें वाढूं लागली—शुद्ध व निष्कलंक अशा प्रेमाच्या ठिकाणीं दोषयुक्त स्वार्थ वाढूं लागला—म्हणजे मनुष्याचा नैतिकऱ्हास सुरू होतो. अंतःकरणांत शुद्ध प्रेमाचा अंकुर असतो, तो प्रथम स्वार्थरूपानें असला तरी, त्याची शुद्धता कायम राहून, तो हळूहळू वाढत गेला, तर पुढें त्याचा प्रेमवृक्ष बनतो, व मग त्याच्या छायेखालीं, शेंकडो माणसांना आ-आश्रय मिळून सुख होतें. याच निष्कलंक स्वार्थबुद्धीचें पर्यवसान अखेर श्रेष्ठ अशा परोपकारबुद्धीमध्यें होतें. या स्वार्थबुद्धीला परार्थाचें वळण लावण्यामध्येंच मनुष्याची उन्नति होते; परंतु या स्वार्थबुद्धीची शुद्धि नष्ट करून तिला बेमर्यादरीतीनें वाढूं दिली म्हणजे नीतिमत्तेचा ऱ्हास होतो. या निष्कलंक प्रेमाची वाढ होत गेली, म्हणजे उच्च प्रेम व परोपकारबुद्धि अंगांत बाणते व एकदां परोपकारबुद्धि अंगांत बाणली, म्हणजे स्वार्थाचें महत्त्व व मातब्बरी नाहींशी होते. अफाट अंतरिक्षांत भराऱ्या मारणाऱ्या पक्ष्याला पिंजऱ्यांत उड्या मारण्यापासून कधीं तरी सुख वाटेल काय? शुद्ध आत्मप्रेमाची ज्योति फांकून तिचा प्रकाश वाढत गेला, म्हणजे त्या प्रकाशांत आत्मस्वरूप पार लोपून जातें व अंतःकरण सार्वत्रिक प्रेमानें व्यापून जातें! सागरास नदी मिळाली म्हणजे नदीचें स्वरूप पार लोपून जातें! जंगलांत एका वृक्षाचे ढोलींत पक्ष्यांचें एक जोडपें व पिलें राहत असत. एकदां त्या वृक्षाच्या आश्रयाला प्रवासी आले. रात्रीं त्या प्रवाशांस फार थंडी वाजूं लागली. प्रवासी थंडीनें फार कांकडले आहेत असें पाहिल्याबरोबर पक्ष्याचें अंतःकरण फार दयार्द्र झालें. लगेंच घरटें सोडून पक्षी लांब उडून गेला, व एका गांवांत कांहीं मंडळी आगटी पेटवून शेकत बसली होती तेथें जाऊन, त्या आगटींतून एक बारीक शेकाटी उचलून चोंचीत धरून, त्यानें त्या प्रवाशांजवळ आणून टाकिली! लगेंच

प्रवाशांनीं चांगला शेक केला व आपलें गारठलेलें अंग शेकून थंडीपासून आपला बचाव केला. पुढें, त्या प्रवाशांस भूक लागली आहे असें त्या पक्ष्यास दिसून आलें. जवळपास तर त्यांना खाण्यास देण्यास कांहींच सांपडेना. आपल्या झाडाखालीं आश्रय करणारे पाहुणे क्षुधेनें फार पीडित झाले असून, त्यांची भूक शमविण्याचें आपल्याजवळ कांहींच साधन नसावें, यामुळें तो पक्षी फारच विव्हल जाहला ! पक्ष्यानें विचार केला कीं, खालीं पेटलेल्या आगटींत आपण उडी घालून आपल्या प्राणाची आहुती दिली तर आपल्या मांसावर एका पाहुण्याचें तरी नीट भोजन होईल ! याप्रमाणें विचार करून व आपला हा विचार मादीला व पिलांस कळवून, ताबडतोब त्या पक्ष्यानें आगटींत उडी घातली ! मादीनें व पिलांनीं विचार केला कीं, आपणही याच मार्गाचें अवलंबन केलें तर आपल्या मांसावर बाकीच्या पाहुण्यांचें भोजन होईल ! याप्रमाणें, परदुःख सहन न झाल्यामुळें, पक्षी, मादी व पिलें या सर्वांनीं आपल्या प्राणांची आहुती देण्यास सुद्धां मागेंपुढें पाहिलें नाहीं ! किती उज्ज्वल, शुद्ध व निष्कलंक प्रेम हें ! कोण स्वार्थत्याग हा ! दुसऱ्याचें दुःख तें आपलेंच दुःख, अशी ज्या अंतःकरणाची वृत्ति बनली आहे, किंबहुना परदुःखाबद्दल जें अंतःकरण कळवळतें तें अंतःकरण मूर्तिमंत करुणरसाचेंच बनलें आहे कीं काय असें वाटल्यास त्यांत काय नवल आहे ! परंतु, अंतःकरणांतील प्रेमवृत्तींचा याप्रमाणें विकास एकदम व आपोआप कसा होईल ? प्रेम प्रेमानें वाढत जातें; प्रेममय सत्कृत्यांच्या योगानेंच प्रेमवृत्ति विकास पावते; आणि हें प्रेममय सत्कृत्य करण्यास संसाराशिवाय दुसरें उत्कृष्ट ठिकाण कोणतें असणार ? संसारांत राहून सांसारिक कर्तव्य प्रेमबुद्धीनें करीत राहिलें तरच प्रेमवृत्तीची

वृद्धि होत जाऊन अखेर वर सांगितल्याप्रमाणें परार्थामध्यें स्वार्थ पार विरघळून जातो.

मनुष्य हा संस्कारशील व अनुकरणशील प्राणी आहे असें पूर्वीं सांगितलेंच आहे. सदाचारसंपन्न व सद्‌गुणी माणसांची गांठ पडण्याचे अनेक प्रसंग संसारांत येत असतात, त्यामुळें त्यांच्या सहवासानें, माणसांच्या अनुकरणप्रवृत्तीमुळें त्यांचेमधील सद्‌गुणांचा विकास होण्यास फार मदत होते. सद्‌गुणांचें चित्र प्रत्यक्ष डोळ्यांसमोर असल्यामुळें, अंतःकरणाचा विकास होऊन तें उन्नत होत जातें. सत्समागमाचा महिमाच असा आहे ! त्यापासून माणसाचें कोटकल्याण साधतें ! कवि भर्तृहरि म्हणतो,

जाड्यं धियो हरति सिंचति वाचि सत्यम् ।
मानोन्नतिं दिशति पापमपाकरोति ॥
चेतः प्रसादयति दिक्षु तनोति कीर्तिम् ।
सत्संगतिः कथय किं न करोति पुंसाम् ॥ १

“ ( सत्संगति ) बुद्धीचें मांद्य घालविते; वाणीमध्यें सत्याचें सिंचन करिते; श्रेष्ठपदाचा व उन्नतीचा मार्ग दाखविते; पाप नाहींसें करिते; चित्तामध्यें प्रसन्नता उत्पन्न करते; चोहोंकडे कीर्ति पसरविते; तेव्हां सत्संगति ही काय करणार नाहीं तें सांग ! ” खरोखर सत्संगतीपासून काय होणार नाहीं बरें ! काबाडकष्ट करून पोट भरणाऱ्या मावळे लोकांनीं शिवाजी महाराजांच्या सहवासांत राहून, त्या परम श्रेष्ठपुरुषाच्या सद्‌गुणांचें यथाशक्ति अनुकरण करून, मोठमोठे पराक्रम गाजवून, महाराष्ट्राच्या इतिहासांत आपलें नांव अजरामर करून ठेवलें नाहीं काय ? लोहास परिसाचा संसर्ग झाल्यावर त्याचें उत्कृष्ट सोनें बनावें ह्यांत नवल तरी कसलें ? सॉक्रेटिसाच्या सहवासांत प्लेटोसारखीं नररत्नें निपजावींत यांत काय आश्चर्य आहे ? प्लेटोच्या समागमामध्यें आरिस्टॉटलसारखा वि-

ख्यात पुरुष उत्पन्न व्हावा हें साहजिकच आहे ! शिवाजी महाराजांच्या उदात्त चारित्र्याचे उत्कृष्ट संस्कार मनावर घडून, तानाजी मालुसरे व बाजी देशपांडे या नरपुंगवांनीं राष्ट्रकार्याकरितां आपले प्राणसुद्धां खर्चीं घालावे यांत बिलकुल नवल नाहीं. असो; या संसाराच्या रंगभूमीवर नानाप्रकारचीं पात्रें येऊन आपापलीं उच्चनीच कामें करून जात असतात; श्रेष्ठ पात्रांचीं श्रेष्ठ कामें पाहून प्रेक्षकांच्या मनोवृत्ति आश्चर्यचकित होऊन उन्नत होतात ! तसेंच, नीच पात्रें आपल्या घाणेरड्या कृत्यांचा हिडिसपणा प्रेक्षकगणापुढें दाखवून प्रेक्षकांचे मनामध्यें दुष्कृत्याबद्दल खंती व उद्वेग उत्पन्न करितात, व या दुर्गुणांच्या खंतीमुळें, सद्गुणांचा विकास होण्यास पुष्कळ मदत होते. बालपणीं ज्याचे मनावर उत्कृष्ट संस्कार उमटले आहेत, व प्रौढपणीं ज्याला उत्कृष्ट शिक्षणाचा लाभ झाला आहे, तो मनुष्य पुढें संसारांत सद्गुण पाहून आश्चर्यचकित होतो व दुर्गुण पाहून उद्विग्न होतो; व साहजिक अनुकरणप्रवृत्तीमुळें सद्गुणांचें अनुकरण करून उन्नत होतो ! सांसारिक चारित्र्याचें हेंच रहस्य आहे.

संसारांत राहिल्यामुळें, मनुष्यास जरूर अशीं लहान मोठीं सांसारिक कृत्यें करावयाचीं असतात; आणि तीं कृत्यें शेवटास जाईपर्यंत मार्गांत अनेक वेळां अनेक अडचणी व संकटें येण्याचा संभव असतो; परंतु, अडचणी व संकटें यांस न जुमानतां निश्चयानें इष्ट कार्यभाग शेवटास न्यावयाचा असल्यामुळें, इष्टकार्य शेवटास नेण्याचे कामांत मनुष्यास आपला उत्साह व बल वाढवावें लागतें याप्रमाणें उत्साह व बल वाढवून, संकटांस आणि अडचणींस धैर्यानें तोंड दिलें म्हणजे अंतःकरण निर्भय होऊन, अंगीं कार्यक्षमता वाढत जाते व नैतिक उन्नति होते. खडतर काम नेटानें शेवटास नेणाऱ्या माणसास नैतिक शिक्षणाचा विशेष लाभ होतो. प्रतिप-

क्ष्याचे पाचपेंच सर्व ध्यानांत ठेवून त्याच्याशीं प्रत्यक्ष सामने करून तयार झालेल्या मल्लास शरीरविषयक शिक्षणाचा किती तरी फायदा होतो ! त्याचें शरीर कसून सदृढ व बळकट होतें. गणितशास्त्रांतील एकाद्या कूट व बिकट प्रश्नाचा उलगडा करण्यामध्यें जरी खटपट व परिश्रम करावे लागतात, तरी त्यामुळें, त्या शास्त्रांत, विद्यार्थ्यांची विशेष गति होत जाते.

" There is no royal road is learning "

" विद्या संपादन करण्याचा एकादा सोपा असा राजमार्ग नाहीं ' अशी इंग्रजींत एक म्हण आहे ती यथार्थ आहे. अडचणींचा उलगडा करण्याची खटपट केली तरच विद्या साध्य होते; अडचणी तशाच राहूं दिल्या, तर बुद्धीस शीण व परिश्रम न झाल्यामुळें, तिची वाढ होण्यास वाव सांपडत नाहीं. हीच गोष्ट नीतिशिक्षणासही लागू आहे. लढाईत प्रतिपक्ष्याशीं सामना देऊन, आपल्या बाहुबलानें प्रतिपक्षास लढाईत चीत करणाऱ्या लढवय्याचे अंगांत वीरश्रीचा संचार होतो; त्याचप्रमाणें, या संसाररूपी समरांगणांत अडचणींशीं व संकटांशीं झगडा करून त्यांचा पाडाव करून, आपली सरशी करण्याचे कामांत नैतिकसामर्थ्याची विशेष वाढ होत असते. संसारांत मनुष्याला संकटें गांठतात त्यांत तरी परमेश्वराचा हेतु असतो असें प्रसिद्ध इंग्रज ग्रंथकार गोल्डस्मिथ म्हणतो, तें बरोबर आहे. संकटांमुळें माणसाचें नैतिक बल कसोटीस लागून त्याची वाढ व्हावी यासाठीं मनुष्याचे मार्गामध्यें संकटें उत्पन्न होत असतात, असें सदरहू ग्रंथकार म्हणतो. दुखणें सहन केलें, म्हणजे शरीराचा सोशिकपणा वाढतो; त्याप्रमाणेंच, सांसारिक अडचणींमुळें मनुष्याची सहनशक्ति वाढून अंगीं कार्यक्षमता येते. मात्र संकटांशीं झगडण्याचा निश्चय पाहिजे.

चेंडू जितक्या जोरानें फेंकावा तितक्या जोरानें तो उशी घेतो; जसा आघात तसा प्रत्याघात; या न्यायानें, जशीं संकटें असतील त्या मानानें त्यांना तोंड देण्याचा निश्चयही पाहिजे, तरच नैतिक-सामर्थ्य वाढेल; निश्चय नसेल किंवा सैलावेल, तर मात्र अंगावर बाजू येऊन अंतःकरण कमकुवत होऊन नैतिक दुर्बलता येईल! यासाठींच, थोर पुरुष संकटें आलीं असतां त्यांस बिलकुल भीक घालीत नाहींत. याच थोर पुरुषांसंबंधानें भर्तृहरि म्हणतो,

विघ्नैः पुनःपुनरपि प्रतिहन्यमानाः ।
प्रारब्धमुत्तमजना न परित्यजन्ति ॥

" विघ्नांच्यामुळें वरचेवर अडथळा झाला, तरी एकदां आरंभ केलेलें कार्य उत्तम पुरुष कधींही सोडीत नाहींत. "

बालपणीं मनावर सुसंस्कार घडले नाहींत व प्रौढपणीं शिक्षणाच्या योगानें अंतःकरणवृत्तींचा विकास झाला नाहीं, तर या अफाट संसारामध्यें मनुष्याची निभावणी लागणें ही मोठी कठीण गोष्ट होऊन बसते. अफाट सागरांत झंझावातानें हेलकावणाऱ्या व डळमळणाऱ्या तारवाची जी स्थिति होते तीच स्थिति अशा मनुष्याची व्हावयाची! मनुष्याच्या तामसवृत्तींस उद्दीपित करून त्यास नीतीपासून च्युत करूं पाहणारे असे प्रसंग संसारांत किती तरी येत असतात! त्या प्रसंगांस धैर्यानें तोंड देण्याची पात्रता नीतिशिक्षणाच्या योगानें अंगांत आली नाहीं, तर शीलच्युति होण्यास काय उशीर आहे! याप्रमाणें नीतिभ्रष्ट होऊन अनीतीच्या पंकांत फसून नाश पावलेलीं माणसें काय कमी दृष्टीस पडतात? शीलाची उन्नति व्हावी याकरितां संसाराची योजना असून, तोच संसार मनुष्याच्या नाशास कारण होतो! चेंडू डोंगरावरून एकदां घसरावयास लागला म्हणजे तो फार झपाट्यानें खालीं येत

येत अखेर तळाशीं जाऊन पडतो; त्याप्रमाणें, बाल्यावस्थेमध्यें मनुष्याचे मनावर उत्तम संस्कार घडले नाहींत, व प्रौढावस्थेमध्यें नीतिशिक्षण मिळून त्याच्या अंतःकरणवृत्तींचा विकास झाला नाहीं, तर पुढील सांसारिक आयुष्यक्रमामध्यें त्याची शीलच्युति होण्याचा फार संभव असतो. सारांश, संसारांत राहून उत्तम आचरण ठेवून व सत्कार्य करून आपल्या शीलाची उन्नति करून मनुष्यानें आपल्या जीविताचें साफल्य करून घेतलें, तरच सांसारिक आयुष्यक्रमाचें चीज झालें असें होणार आहे.

---

# प्रकरण ५ वें

## शील आणि सत्कृत्य

संसारांत राहून सांसारिक कर्तव्यकर्म केल्यामुळें, अंतःकरणवृत्तींचा विकास होऊन नीतिमत्तेची वाढ होते; संसार ही नैतिकशिक्षणाची एक मोठी शाळा आहे, व या शाळेंत निश्चयानें व निष्ठेनें अभ्यास केल्यास, शीलाची उन्नति होत जाते, याविषयीं मागील प्रकरणांत विवेचन केलें आहे. सत्कृत्यांचा मनुष्याचे नीतिमत्तेवर उत्कृष्ट परिणाम होऊन, त्याच्या नैतिकसंपत्तीमध्यें कशी भर पडते, व दुष्कृत्यांमुळें तो नीतिभ्रष्ट कसा होत जातो, याविषयीं आतां विवेचन करावयाचें आहे.

शीतल व सुगंधयुक्त वायु आपल्या स्पर्शानें सर्वांस सुख व संतोष देतो; तसेंच, चंद्र आपल्या शीतल व आल्हाददायक किरणांनीं सर्वांस सुख व आनंद देतो; उन्हाचा कडक ताप सहन करून, वृक्ष आपल्या शीतल छायेच्या योगानें दुसऱ्यास सुख व आनंद देतात; त्याचप्रमाणें परोपकारासारखें सत्कृत्य करणारा मनुष्य आपल्या सत्कृत्यानें सर्वांना सुख देतो; परंतु, जडसृष्टींतील पदार्थांमध्यें व चैतन्यसृष्टींतील जीवांमध्यें एक मोठा फरक आहे, तो हा कीं, आपल्या सद्गुणांमुळें जडसृष्टींतील पदार्थ व चैतन्यकोटींतील जीव हे दुसऱ्यास सारखेच संतोषदायक होतात, हें खरें, तथापि, जडसृष्टींतील पदार्थांच्या सद्गुणांचा परिणाम त्या पदार्थांवर काय व्हावयाचा आहे ? वृक्ष आपल्या शीतल छायेनें दुसऱ्याचा संताप शमवून, त्यास सुख देतो खरा, परंतु, त्या छायेचा त्या वृक्षास काय उपयोग आहे ? तसेंच, सुगंधयुक्त वायूच्या सुगंधाचा

त्या वायूस काय उपयोग आहे ? त्याचप्रमाणें, शीतल व आल्हाददायक चंद्रप्रकाशाचा चंद्रास कांहीं उपयोग आहे काय ? कस्तुरीचा घमघमाट दुसऱ्याला; कस्तुरीला त्याचें काय? परंतु, चैतन्यसंपन्न जीवांची, विशेषतः तारतम्यबुद्धियुक्त मनुष्यांची, तशी स्थिति नसते. परोपकारादि सत्कृत्यांपासून इतरांस सुख होतेंच, परंतु त्याबरोबरच, परोपकाराचें कृत्य करणाऱ्या मनुष्यांसही त्यापासून संतोष होत असतो. आंधळे, पांगळे वगैरे अनाथ व निराश्रित लोकांना साहाय्य केल्यामुळें, त्यांना संतोष होतो खरा; परंतु साहाय्य करणाऱ्या मनुष्यास किती तरी समाधान होतें !

मानवी अंतःकरण हें संस्कारशील आहे; तें मातीच्या ढेंकळाप्रमाणें मठ्ठ नाहीं. सूर्यकिरणांचा प्रवेश शुद्ध व स्वच्छ अशा स्फटिकमण्यामध्यें होतो; तसेंच, सत्कृत्याचा प्रकाश कर्त्याचे अंतःकरणावर पडून, अंतःकरण निर्मळ होत जातें; अंतःकरणपटलावर सर्व बऱ्यावाईट कृत्यांचा ठसा अबाधितपणानें उमटत असतो. सत्कृत्याच्या स्वच्छ प्रकाशानें तेंही सतेज होत असतें, व काळ्याकुट्ट दुष्कृत्यानें त्यांतील तेज लोपत जाऊन, अखेर तेंही काळेंकुट्ट बनतें. सर्व बऱ्यावाईट कृत्यांचा हिशोब व जमाखर्च तें कृत्य करणाऱ्या माणसाच्या अंतःकरणांत बिनचूक लिहिला जातो; हुशार व वाकबगार कारकून सुद्धां एकादे वेळेस एकाद्या कलमाचा जमाखर्च चुकून विसरून जाईल; परंतु, अंतःकरणांत सर्व बऱ्यावाईट कृत्यांची नोंद बिनचूक होत असते. मानवी अंतःकरणाची घटना अपूर्व आहे ! या अंतःकरणावर सर्व बऱ्यावाईट कृत्यांचे संस्कार आपोआप घडत असतात, व त्या बऱ्यावाईट संस्कारांप्रमाणें मनुष्य उन्नत होत जातो अथवा त्यास अवनति प्राप्त होते.

सत्कृत्यांमुळें मनास श्रेष्ठ प्रकारचें समाधान प्राप्त होतें. उत्तम सुवासिक फुलांचा वरचेवर वास घेतला, म्हणजे त्यांतील सुगंधाचें

माधुर्य कमी होत नाहीं काय? गायनाचे सुस्वर केव्हां तरी ऐकावयास सांपडले, म्हणजे त्यांची गोडी विशेष वाटते; परंतु, मधुर आलाप वरचेवर कानीं पडूं लागले, म्हणजे त्यांचें माधुर्य कमी होत नाहीं काय? सारांश, या आधिभौतिक सुखाची गोष्ट नेहमीं अशीच आहे. गीतेंत म्हटलें आहे कीं,

विषयेंद्रियसंयोगाद्यत्तदग्रेऽमृतोपमम् ॥
परिणामे विषामिव तत्सुखं राजसं स्मृतम् ॥१

" इंद्रियें व त्यांचे विषय यांच्या संयोगापासून होणारें ( म्हणजे आधिभौतिक ) जें प्रथम अमृतासारखें व व परिणामीं विषासारखें असतें, तें सुख राजस म्हटलें आहे "

" Pleasures pall "

" सुखाचा वीट येतो " अशी इंग्रजींत एक म्हण आहे ती या आधिभौतिक सुखासंबंधाची होय. श्रेष्ठ दर्जाच्या सुखासंबंधानें गीतेंत म्हटलें आहे:—

तत्सुखं सात्विकं प्रोक्तं। आत्मबुद्धिप्रसादजम् ॥

" आपल्या बुद्धीच्या प्रसन्नतेपासून होणारें सुख सात्त्विक म्हटलें आहे. " परंतु, सत्कृत्यांपासून बुद्धि प्रसन्न होते, म्हणून सत्कत्यांपासून मिळणारे सुखाची गोडी कमी न होतां, उत्तरोत्तर वाढत जाते.

वर लिहिल्याप्रमाणें, सत्कृत्यांमुळें मनास श्रेष्ठ प्रकारच्या समाधानाचा लाभ होत गेला, म्हणजे अंतःकरणांतील क्षुद्र वृत्तींचें सामर्थ्य हळूहळू कमी होत जातें; व सत्कृत्य करण्याची प्रवृत्ति वृद्धिंगत होत जाते. शरीरांतील रुधिराभिसरणक्रिया व्यवस्थित चालू असली, म्हणजे शरीरामध्यें ताकद राहते व त्यामुळें कोणताही रोग उत्पन्न होत नाहीं; त्याचप्रमाणें, सत्कृत्यांमुळें मनास श्रेष्ठ

अशा समाधानाचा लाभ होत गेला, म्हणजे अंतःकरणामध्यें तामस वृत्तींचा प्रादुर्भाव होत नाहीं. गीतेंत म्हटलें आहेः—

प्रसादे सर्वदुःखानां । हानिरस्योपजायते ॥

" चित्त प्रसन्न असलें म्हणजे त्याच्या सर्व दुःखांचा नाश होतो." हें वचन अगदीं यथार्थ आहे. मानवी अंतःकरणाचा धर्मच असा आहे कीं, सत्कृत्यांपासून उत्पन्न होणाऱ्या श्रेष्ठ आनंदापासून त्यांतील श्रेष्ठ वृत्तींचा उच्छ्रय होत जातो. परमेश्वरानें आपल्या अतर्क्य चातुर्यानें व कृपाळूपणानें मनुष्यास ही अंतःकरणरूपी अपूर्व चीज, हा अपूर्व ठेवा दिलेला आहे ! या ठेव्याचे सामुग्रीवर मनुष्य मनांत आणील, तर तो वाटेल त्या उच्च दर्जास जाऊं शकेल! मात्र कृति तशी पाहिजे. " नर करनी करे तो नरका नारायण हो जाय " अशी हिंदुस्थानमध्यें एक म्हण आहे, ती यथार्थ आहे. सत्कृत्यांमुळें मनुष्याच्या अंतःकरणवृत्ति उन्नत होत जाऊन, अखेर तो देवाच्या पंक्तीस जाऊन बसण्यास योग्य होतो !

दुष्कृत्यांपासून खरें समाधान व शुद्ध समाधान व शुद्ध आनंद उत्पन्न होत नाहीं. दुष्कृत्यांपासून दुष्ट वासनांची तृप्ति होईल, परंतु, ही तृप्ति म्हणजे खरें समाधान नव्हे; या तृप्तीमुळें, वासनारूपी अग्नि अधिकच पेट घेतो, व या प्रज्वलित झालेल्या अग्नीमध्यें अंतःकरणांतील सद्वृत्तींची आहुति पडते ! नैसर्गिक सद्वृत्तींचे अंकुर, या पेट घेतलेल्या अग्नीनें पार करपून जातात ! सत्कृत्यांपासून उत्पन्न होणारा शुद्ध व श्रेष्ठ आनंद हा वेगळा व दुष्कृत्यांपासून उत्पन्न होणारी नीच व हलकी आनंदवृत्ति ही निराळी. अफूच्या सेवनामुळें बुद्धीस येणारी तात्कालिक तरतरी, व शरीर निकोप असल्यामुळें वाटणारा जोम, हे दोनी अनुभव सारख्या योग्यतेचे आहेत असें कोण म्हणेल ? अफूमुळें येणारी तर-

तरी ही खरी तरतरी नसून, त्यामुळें शरीरास थकवा येऊन, तें अधिकच निर्बल होत जातें. वाताच्या विकारामुळें, जे अचके येत असतात, ते शरीरांतील बल व जोम यांचे निदर्शक आहेत असें कोण म्हणेल ? दुष्कृत्यांमुळें अंतःकरणांतील नीच वृत्ति जागृत झाल्या, म्हणजे त्यांतील उच्च वृत्तींचा लोप झालाच पाहिजे. परमेश्वरनिर्मित मानवी अंतःकरणाची घटनाच अशी आहे कीं, त्यामध्यें दोन परस्परविरुद्ध वृत्तींचा उच्छ्रय एकाच वेळेस कधींही होत नाहीं; ज्या जमीनीमध्यें कांटे आहेत, त्या जमीनीमध्यें उत्तम धान्याचें बीं रुजेल काय ? पदार्थ एकाच वेळेस उष्ण व थंड कसा असूं शकेल ? तवा तापून लाल झाला, म्हणजे त्यावर टाकलेला पाण्याचा थेंब तेव्हांच जळून नाहींसा होतो; त्याप्रमाणेंच दुष्ट वृत्तींनीं ग्रासलेल्या मनामध्यें सद्वृत्तींचा प्रादुर्भाव होणें अशक्य आहे. सारांश, सत्कृत्यांपासून होणारा आनंद तोच खरा आनंद; व या आनंदाच्या योगानेंच अंतःकरणांतील सद्वृत्तींचा उच्छ्रय होऊन, उत्तरोत्तर सत्कृत्य करण्यास मनुष्य अधिकच प्रवृत्त होतो; व दुष्कृत्यांमुळें, मनास खरें समाधान होत नसून, दुष्कर्मास प्रवृत्त करणारी आसक्ति हीच वाढत जाते. सागरांतील बलाढ्य नक्रांच्या इतस्ततः संचारामुळें पाण्याची स्थिरता नष्ट होऊन, सर्वत्र खळबळ उडून जाते; त्याप्रमाणेंच, दुष्कृत्यांपासून उत्पन्न होणाऱ्या दुष्ट वासनेमुळें, अंतःकरणांतील शांति व स्थिरता पार नष्ट होऊन, सर्वत्र घोंटाळा माजून राहतो, व अनीतीचें वर्चस्व वाढत जातें.

मानवी अंतःकरण हें संस्कारशील आहे, असें पूर्वीं सांगितलेंच आहे. नीतिमत्तेचें पैलतीर गांठूं इच्छिणाऱ्या प्रवाशाला सुसंस्कार हेच साधनसामुग्री होत. नीतिमत्तेच्या अत्युच्च व उज्ज्वल शिखरास पोंचण्याचा सोपान-मार्ग हा सुसंस्कारांचाच बनविला पाहिजे. तसेंच वरचेवर अंतःकरणावर दुष्ट संस्कार घडत जातील, तर

अनीतीच्या पिशाचानें मनुष्यास घेरलेंच म्हणून समजावें. घड्याळांतील स्प्रिंगचा एकएक वेढा फिरविला म्हणजे ती घट्ट बसते, व घड्याळ व्यवस्थितरीतीनें चालतें; त्याप्रमाणेंच, संस्कार हे अंतःकरणचक्रास गति देणारे स्प्रिंगचे वेढेच होत; परंतु, अंतःकरणावर संस्कार घडत असतात. ते मुख्यत्वेंकरून बऱ्यावाईट कृत्यांमुळें घडतात, व हेच संस्कार बळावत जाऊन, मनुष्यास बरींवाईट कृत्यें करण्यास मनुष्यास प्रवृत्त करतात. कर्मामुळें संस्कार व संस्कारांमुळें कार्य अशी ही परंपरा आहे; याप्रमाणें, संस्कार व कर्म यांचा अन्योन्यसंबंध आहे. अशी जर स्थिति आहे, तर, सत्कृत्यें करून मन सुसंस्कारसंपन्न करण्याची आपण खटपट करावयास नको काय? सत्कृत्यापासून होणारें सुख व आनंद, यांचा अनुभव जसजसा येत जाईल, जसजसा मनुष्य या आनंदाची व सुखाची गोडी चाखील, तसतसा, त्या गोडीकरितां सत्कृत्य करण्यास तो अधिकच उद्युक्त होईल; मग त्यास दुष्कृत्यांबद्दल किळस व तिटकारा उत्पन्न व्हावा हें साहजिकच आहे. अमृताची गोडी लागली, म्हणजे पाणी कोणास गोड लागेल? सूर्यास सोडून काजव्याची अपेक्षा कोण करील? "घृत सोडुनि कोण करिल आ तेला?"

सत्कृत्यामुळें अंतःकरणाची उन्नति होते असें वर सांगितलें आहे, परंतु, ही अंतःकरणाची उन्नति साधण्यासाठीं वैयक्तिक, कौटुंबिक, सामाजिक, राष्ट्रीय वगैरे कर्तव्यकर्म प्रत्येक मनुष्यास करावयाचें असतें; व हें कर्तव्य प्रत्येकानें योग्य रीतीनें बजावण्याचा प्रयत्न करणें जरूर आहे. अंतःकरणाची उन्नति साधण्यासाठीं हें कर्तव्य कशा रीतीनें केलें पाहिजे याविषयीं गीतेंत सांगितलें आहेः—

मयि सर्वाणि कर्माणि । संन्यस्याध्यात्मचेतसा ॥
निराशीर्निर्ममो भूत्वा । युध्यस्व विगतज्वरः ॥ १

" माझ्या ठायीं अध्यात्मबुद्धीनें सर्व कर्मांचें अर्पण करून आणि

आशा व ममत्व सोडून तूं युद्ध कर. " आपण निवळ निमित्तमात्र आहोंत; कर्ता करविता परमेश्वर आहे; हा संसाराचा अवाढव्य पसारा त्यानेंच उत्पन्न केला आहे; त्यालाच शरण जाऊन व त्यास समर्पण करण्याचे बुद्धीनें आपलें पवित्र कर्तव्य आपण सदोदित करीत राहिलें पाहिजे, असा वरील श्लोकांतील प्रथम चरणाचा अर्थ आहे. कर्ता मी आहें अशी अहंकारबुद्धि उत्पन्न होऊन ती बळावत चालली म्हणजे सत्कृत्य नीट रीतीनें पार पडत नाहीं आणि त्यामुळें अंतःकरणावर सुसंस्कार घडत नाहींत; परमेश्वरार्पण बुद्धीनें काम केलें म्हणजे अंतःकरणांतील अहंकारबुद्धि नष्ट होऊन तें पवित्र व निष्कलंक राहतें व उन्नत होतें.

दुसरें असें कीं, सत्कृत्य करावयाचें तें अंतःकरणांतील फलासक्ति, ममत्व, वगैरे दुष्ट वृत्ति अंतःकरणांतून काढून टाकून, व चित्त स्थिर व शांत ठेवून, केलें पाहिजे, असा वरील श्लोकांतील दुसऱ्या चरणाचा अर्थ आहे. चित्तवृत्ति स्थिर व शांत होऊन कर्तव्य केलें, म्हणजे त्यापासून श्रेष्ठ आनंदाचा लाभ होऊन अंतःकरणाची उन्नति होते. अविकृत मनाच्या सुस्थितीशीं सत्कृत्यांच्या श्रेष्ठ संस्काराचा योग घडला, म्हणजे अंतःकरणवृत्तींचा विकास होत जातो. आरसा मलिन झाला, म्हणजे त्यामध्यें सूर्याचें प्रतिबिंब स्वच्छ कसें दिसेल ? उत्तम प्रकारचें पीक उत्पन्न होईल अशी पात्रता जमीनीमध्यें आहे, परंतु, तीमधील कांटेकुटे काढून ती चांगली साफसूफ केल्याशिवाय, तीमध्यें यावें तसें पीक कसें येईल ? ज्वर नसतांना पौष्टिक औषध देण्यापासून विशेष फायदा होतो; वस्त्रास रंग द्यावयाचे पूर्वीं तें वस्त्र प्रथम स्वच्छ व निर्मळ केलें, म्हणजे त्यावर चांगला रंग बसून तो खुलतो; त्याचप्रमाणें, अंतःकरणाची भूमिका अस्वच्छ झाली, म्हणजे सत्कृत्यांच्या सुसंस्कारांचा रंग त्यावर नीट खुलत नाहीं. सारांश, चित्तवृत्ति अस्थिर झाल्या म्हणजे

कर्तव्य नीट रीतीनें बजाविलें जात नाहीं; व त्यापासून उत्कृष्ट संस्कारही अंतःकरणावर घडत नाहींत. अंतःकरणाच्या दोषरहित स्थितीमध्यें कर्तव्य बजाविलें, म्हणजे त्यापासून उत्कृष्ट समाधान व शांति यांचा लाभ होऊन अंतःकरण उन्नत होतें.

तसेंच, अंतःकरणवृत्ति स्थिर व शांत राहिल्या नाहींत, तर कर्तव्य नीट रीतीनें शेवटास नेण्यास, ज्या गुणांची जरूरी आहे, ते गुण उत्पन्न होत नाहींत. अंतःकरण स्थिर ठेवून कर्तव्य केलें, म्हणजे धैर्य, उत्साह, निश्चय, वगैरे आवश्यक गुणांची वाढ होऊन, अंगांत अधिक कार्यक्षमता येत जाते. प्रकृति अस्वस्थ झाली म्हणजे प्रतिपक्ष्याशीं सामना ठोकण्यास कोणता पैलवान तयार होईल? त्याच्या अंगांत उत्साह राहणार नाहीं; तसेंच, अंतःकरण स्थिर असल्यावेळीं वृद्धिंगत होणारे सद्गुण, अंतःकरणाच्या अस्थिर स्थितीमध्यें कसे वाढतील ?

त्याचप्रमाणें, चित्तवृत्ति स्थिर ठेवून, मनुष्य कर्तव्य करूं लागला, म्हणजे त्याच्या अंतकरणामध्यें सत्कार्यप्रवर्तक अशा कायमच्या सद्बुद्धीची हळूहळू उपज होते; व या सद्बुद्धीमुळें कर्तव्यनिष्ठा वाढते. ही कर्तव्यनिष्ठा अंतःकरणांतील अति श्रेष्ठ वृत्ति होय. या कर्तव्यनिष्ठेची ज्योत जसजशी उज्ज्वल होत जाईल, तसतशी, सद्गुणांची अभिवृद्धि होऊन, मनुष्याची नैतिक उन्नति झपाट्यानें होत जाईल. कवि भर्तृहरि म्हणतोः—

मनस्वी कार्यार्थी गणयति न दुःखं न च सुखम् ।

"कार्य करण्यास तत्पर झालेला निश्चयी पुरुष आपल्या सुखदुःखाची मुळींच पर्वा करीत नाहीं." कर्तव्यनिष्ठा वाढत गेली, म्हणजे कार्याचे मार्गांत कसल्याही जबरदस्त अडचणी आल्या, तरी मनुष्य त्यांस जुमानीत नाहीं व आपल्या सुखदुःखाचीही यत्किंचित् सुद्धां परवा करीत नाहीं ! कर्तव्यनिष्ठा उत्पन्न झाल्यामुळें,

सत्कार्य शेवटास नेण्याचा ज्याचा ठाम संकल्प झाला, त्या श्रेष्ठ पुरुषास त्या कार्यापासून परावृत्त करण्यास कोण समर्थ होईल ! या सत्यसंकल्पाविषयीं कविश्रेष्ठ कालिदासानें एक सुंदर उपमालंकार साधला आहे. कुमारसंभवामध्यें तो म्हणतो,

क ईप्सितार्थस्थिरनिश्चयं मनः ।
पयश्च निम्नाभिमुखं प्रतीपयेत् ॥

" इष्ट कार्य साधण्याविषयीं निश्चित झालेलें मन, व खालीं वाहणारा पाण्याचा ओघ, कोण मागें फिरवील ? " बरोबरच आहे; कर्तव्यनिष्ठा ज्याचे अंगांत बाणत चालली, त्या पुरुषश्रेष्ठाचें तन, मन, धन, कर्तव्याकडे लागावें यांत नवल तें कसलें !

श्रेष्ठ पुरुषांचीं चरित्रें वाचलीं असतां, त्यांची कर्तव्यनिष्ठा उत्कट होती असें दिसून येईल. शिवाजीमहाराजांसंबंधानें एक हकीकत आहे. महाराज दिल्लीहून परत येतांना, प्रकृति बिघडल्यामुळें, एका गांवीं, कोणा ब्राह्मणाच्या घरीं राहिले. महाराज युक्ति लढवून दिल्लीहून निघून गेले, ही बातमी बादशहास समजतांच, महाराजांचा तपास करून, त्यांना पकडून परत आणण्यासाठीं, त्यानें चोहोंकडे लोक पाठविले. महाराजांचा ज्या गांवीं मुक्काम होता, तेथेंही ते लोक येऊन तपास करूं लागले. अवरंगजेब बादशहाचे धर्मवेडामुळें अगोदरच प्रजा त्रस्त झाली होती; तशांत, हे बादशाहाचे लोक गांवांत घुसून महाराजांची बातमी काढण्यासाठीं लोकांस फार त्रास देऊं लागले. त्यामुळें, लोक फारच त्रासून गेले. ही सर्व हकीकत, तो ब्राह्मण महाराजांस वरचेवर कळवीत असे; ज्या थोर गृहस्थास ही बातमी तो कळवीत असे, ते थोर गृहस्थ खुद्द महाराज होते, असें अर्थात् त्याला माहीत नव्हतें. दक्षिणेकडे कोणी शिवाजी आहे तो या त्रासांतून आमची केव्हां सुटका करील, कोण जाणें, असें तो ब्राह्मण महाराजांजवळ सहजासहजीं बोलूं

लागला! तेव्हां महाराजांची श्रेष्ठ कर्तव्यनिष्ठा जास्तच उद्दीपित होऊन, त्यांची चर्या पालटली! अंगीकृत कार्याविषयीं किती उज्ज्वल कर्तव्यनिष्ठा ही! कर्तव्यनिष्ठेचें झगझगीत तेज अतिशय वाढल्यामुळें, अंतःकरणामध्यें मावेनासें झालें, म्हणूनच, जणूंकाय, तें तेज महाराजांच्या चेहऱ्यावर चमकूं लागलें!

चित्तवृति स्थिर ठेवण्याचा प्रयत्न केल्यास हळूहळू सद्बुद्धीची उपज होऊन कर्तव्यनिष्ठा वाढते; व सत्कार्य हातून घडत जाऊन शीलाची उन्नति होत जाते असें वर सांगितलें आहे. परंतु, या चित्तवृत्ति स्थिर ठेवण्याचे कामांत वर श्लोकांत सांगिल्याप्रमाणें, आशा, ममत्व वगैरे क्षुद्रवृत्तींचा जबरदस्त अडथळा होत असतो; आणि त्यामुळें मनास चांचल्य प्राप्त होतें, व त्याची शांति ढळते; याकरितां, जहाजावरील कप्तान ज्याप्रमाणें दीपगृहांतील दिव्याकडे ( बीकन लाइटकडे ) एकनिष्ठपणानें लक्ष देऊन आपलें जहाज चालवितो, किंवा मत्स्यवेध करणारा कुशल धनुर्धारी त्या मस्याकडे लक्ष देऊन अचूक नेम मारितो, त्याप्रमाणें कोणत्याही क्षुद्रवृत्तींच्या योगानें मनाची हिसकाहिसकी होऊं न देतां, आपण आपल्या योग्य कार्याकडे नीट लक्ष दिलें पाहिजे. महाभारतांत एक गोष्ट आहे. जनकराजाकडे एकदां एक विद्यार्थी गेला व आपल्यास विद्यादान मिळावें म्हणून नम्रपणें त्यानें राजास विनंति केली; परंतु, मनाची एकाग्रता साधल्याशिवाय विद्याभ्यास चोख होत नाहीं असें त्या श्रेष्ठ गुरूस पक्कें माहीत असल्यामुळें, आपल्या शिष्याची या बाबतींत कितपत तयारी आहे हें प्रथम पाहावें असें त्यानें आपले मनांत ठरविलें. याकरितां, त्या राजानें एक सुंदर दिवाणखाना उत्कृष्ट शृंगारिला. त्यामध्यें नानाप्रकारच्या चित्ताकर्षक व सुबक अशा वस्तु ठेवून तो दिवाणखाना सुशोभित केला, व नंतर एके दिवशीं त्यामध्यें दरबार भरविला. दरबार भरला असतां, संगीत-

कलानिष्णात गवयांचे व कलावंतिणींचे ताफ्यांनीं आपलें सुस्वर गायन सुरू केलें व मनोहर वाद्यें सुरू झालीं ! असा सर्वत्र त्या दरबारामध्यें थाट सुरू झाला; तेव्हां राजानें शिष्यास बोलावलें व एक रुप्याचा पेला कांठोकांठ दुधानें भरून त्याच्या हातीं दिला व दिवाणखान्यासभोंवतीं तीन प्रदक्षिणा घालून येण्यास त्यास सांगितलें. याप्रमाणें सांगतेक्षणींच, त्या शिष्यानें तो पेला घेतला व गुरूच्या आज्ञेप्रमाणें दिवाणखान्यासभोंवतीं प्रदक्षिणा घातल्या, परंतु पेल्यातील एक थेंब सुद्धां त्यानें सांडला नाहीं ! कालिदास म्हणतोः—

> विकारहेतौ सति विक्रियन्ते ।
> येषां न चेतांसि त एव धीराः ॥

" मन विकृत होण्याचा प्रसंग असतांना, ज्यांच्या चित्तवृत्ति बिलकुल चळत नाहींत, तेच पुरुष धीराचे होत. " वचन अगदीं यथार्थ आहे. असो; याप्रमाणें आपल्या शिष्याची चित्तवृत्ति स्थिर व एकनिष्ठ आहे असें पाहून त्या गुरूस मोठा आनंद झाला व त्यानें त्यास उत्कृष्ट विद्यादान दिलें व त्यामुळें तो शिष्य परम ज्ञानी झाला ! सारांश, चित्तवृत्तींची चलबिचल होऊं न देतां, प्रत्येक प्रसंगीं त्या स्थिर ठेवून कर्तव्य करीत गेलें, म्हणजे कर्तव्यनिष्ठा उत्पन्न होऊन, मनुष्य उत्तरोत्तर सत्कृत्य करावयास लागतो व त्यामुळें श्रेष्ठ समाधान व संतोष यांचा त्यास लाभ होऊन तो उन्नत होतो.

# प्रकरण ६ वें

## आत्मनिरीक्षण

निर्दोष व स्थिर अंतःकरणामध्यें सद्बुद्धीची उपज होते, व सद्बुद्धीमुळें कर्तव्यनिष्ठा वाढत जाते; ही कर्तव्यनिष्ठा वाढूं लागली म्हणजे हातून सत्कृत्य घडत जातें, व सत्कृत्यामुळें अंतःकरणावर सुसंस्कार घडून नीति व शील यांची वृद्धि होते, असें मागील प्रकरणामध्यें सांगितलें आहे. अंतःकरण दोषांनीं कलुषित झालें म्हणजे या सद्बुद्धीचा लोप होतो. सत्कृत्याकडे प्रवृत्ति होत जाऊन शीलाची उन्नति होण्यासाठीं, या सद्बुद्धिरूपी स्वच्छ व निर्मल अशा गंगाजलाचा प्रवाह अंतःकरणामध्यें सतत वाहला पाहिजे. या अंतःकरणाचें पावित्र्य कडकडीत राहिलें पाहिजे. या पावित्र्यरूपी वृक्षाची वाढ होऊन त्यापासून उत्पन्न होणाऱ्या पवित्र व मधुर अशा सत्कृत्यरूपी फलांचा आस्वाद कसा घेतां येईल बरें ? या पावित्र्याची ज्योति सतेज कशी ठेवतां येईल ? या ज्योतीचें तेज अंतःकरणामध्यें सर्वत्र पसरून दुष्कृत्यप्रवर्तक दोषरूपी अंधःकाराचा नाश झाला पाहिजे. शरीरास जोंपर्यंत पीडा आहे तोंपर्यंत तें सदृढ कसें होईल ? झाडास लागलेली हुमणी जोंपर्यंत काढून टाकली नाहीं तोंपर्यंत त्या झाडाची वाढ कशी होईल ? जेथें दैत्यांचा अम्मल आहे तेथें देवांचें काय चालणार आहे ? जेथें अवदशा नांदत आहे तेथें लक्ष्मीचा रिघाव कसा होईल ? ज्या ठिकाणीं दुर्जनांचा सुळसुळाट आहे त्या ठिकाणीं सज्जनांस थारा कसा मिळेल ? विषारी सर्पाच्या तीव्र विषानें दग्ध झालेल्या वृक्षामध्यें सुरस कोठून मिळणार ? काविळीनें दूषित झालेल्या डोळ्यांची दृष्टि साफ कशी रा-

हणार ? सारांश, सद्‌गुणांचा उदय होऊन त्यांचा यथास्थित विकास होण्यास दुर्गुणांचा अंतःकरणांतून उच्छेद होणें जरूर आहे.

सद्‌गुणांचा उदय होऊन त्यांचा विकास होण्यास दुर्गुणांचा लोप झाला पाहिजे ही गोष्ट खरी, परंतु हें कार्य साधणार कसें ? मांजराच्या गळ्यांत घांट बांधावी कशी ? मांजरापासून उंदरांस पीडा होते ती होऊं नये म्हणून उपायाची योजना करण्यासाठीं उंदरांची सभा भरली. सभेमध्यें उपायाबद्दल पुष्कळ भवति न भवति झाली ! निरनिराळ्या उंदीरसभासदांनीं निरनिराळे ठोक उपाय सुचविले ! परंतु ते सर्व सभेस नापसंत झाले ! कांहीं उपाय सर्वानुमतें नापसंत तर कांहीं बहुमतानें नापसंत ठरल्यामुळें, उपायाची योजना चांगलीशी जमेना ! उंदीरसभासदांनीं आपल्या बुद्धिकौशल्याची पराकाष्ठा केली ! परंतु उपाय कांहीं सुचेना; इतक्यांत, एक चलाख आणि बुद्धिमान् उंदीरमामा बोलावयास उठले व म्हणाले कीं, “ मांजरापासून उंदरांस पीडा होऊं नये याबद्दल एकच उत्कृष्ट उपाय आहे तो असा कीं, मांजराच्या गळ्यांत घांट बांधावी. तसें केलें म्हणजे मांजर येऊं लागलें कीं घांट वाजेल व आपण सर्वजण सावध होऊन आपल्या बिळांत पळून जाऊं. ” ही खाशी युक्ति निघाली म्हणून सर्व सभासदांनीं टाळ्या पिटून गजर केला ! त्या कल्पक उंदीरमामाची जिकडे तिकडे प्रशंसा होऊं लागली ! इतक्यांत, एक पोक्त व अनुभविक उंदीर उठून बोलूं लागला ! “ मित्रहो, या आपल्या अत्यंत बुद्धिमान् उंदरानें फार नामी युक्ति काढली खरी, परंतु हा उपाय अमलांत कसा आणावयाचा ? मांजराच्या गळ्यांत घांट बांधावी, परंतु घांट बांधावी कोणीं ? ” याप्रमाणें त्या पोक्त उंदराचें भाषण ऐकून सर्व सभासद निराश होऊन गेले ! दुर्गुणांचें निर्दलन करून सद्गुणांचा उद्भय करण्याविषयीं उपाय-चिंतन करावयास आरंभ केला म्हणजे

वरील कल्पित गोष्टीची आठवण झाल्यावांचून राहात नाहीं. दोषांचें निर्मूलन केलें पाहिजे हा उपाय ठीक आहे; परंतु तो अमलांत कसा यावा ? उंदीरमामांनीं मांजराच्या गळ्यांत घांट बांधण्याइतकें हें काम अवघड नाहीं काय ? काम खरोखर सुकर नाहीं; उंदीर खाऊन गलेलठ्ठ झालेलें मांजर घांट बांधावयास आलेल्या उंदरावर झडप घालून त्यास तें तेव्हांच गट्ट करणार ! त्याचप्रमाणें, अंतःकरणांतील सद्गुणांच्या स्वाभाविक अंकुरांस गिळून टाकून पुष्ट झालेलें दोषरूपी मार्जार सद्गुणांची वाढ कशी होऊं देईल ?

अस्थिर व चंचल अशा चित्तास आंवरून धरून, त्यांतील दोषांचा उच्छेद करून, त्यामध्यें सद्गुणांची ज्योति उत्पन्न करणें म्हणजे वाऱ्याची मोट बांधण्याइतकें अवघड काम आहे. भगवद्गीतेमध्यें म्हटलें आहे:—

चंचलं हि मनः कृष्ण । प्रमाथिबलवद् दृढम् ॥
तस्याहं निग्रहं मन्ये । वायोरिव सुदुष्करम् ॥ १

" कारण हे कृष्णा, मन हें चंचल, दांडगें, बलिष्ठ व वळविण्यास कठीण आहे. वाऱ्याप्रमाणें म्हणजे वाऱ्याची मोट बांधण्याप्रमाणें याचा निग्रह करणें मला अत्यंत दुष्कर दिसतें. " हें वचन यथार्थ आहे. एकाद्या चित्रांत कांहीं उणेपणा असला तर कुशल चित्रकार आपल्या कलमानें तो उणेपणा तेव्हांच काढून टाकील; परंतु परमेश्वराच्या या सजीव चित्रांतील दोष दुरुस्त करण्याचें काम तितकें सोपें खास नाहीं ! चित्रांतील एक रंग पुसून दुसरा तेव्हांच देतां येईल, परंतु मानवी अंतःकरणांतील दोषांचा काळाकुट्ट रंग काढून त्यावर स्वच्छ पांढराफेक रंग चढविण्याचें काम मोठ्या मुष्किलीचें आहे. काम फार बिकट आहे ही गोष्ट खरी, परंतु तें कष्टसाध्य आहे; असाध्य कोटींतील नाहीं, असें श्रीकृष्णानीं अर्जुनास उत्तर दिलें आहे; तें असें:—

असंशयं महाबाहो । मनो दुर्निग्रहं चलम् ॥
अभ्यासेन तु कौन्तेय । वैराग्येण च गृह्यते ॥ १

—भगवद्गीता

" हे महाबाहो अर्जुना, मन हें चंचल असून त्याचा निग्रह करणें दुर्घट आहे, याबद्दल कांहींच शंका नाहीं; पण अभ्यासानें आणि वैराग्यानें तें स्वाधीन ठेवितां येतें. " अविश्रांत प्रयत्न केल्यास दोषांचा उच्छेद करण्याचें काम अशक्य नाहीं. पाण्याचे थेंब दगडावर सतत ठिबकावयास लागले तर तो दगड झिजेल; करणाराला अवघड काय आहे ? फ्रान्स देशांतील प्रसिद्ध नेपोलियन म्हणत असे कीं, मनुष्यास अशक्य असें कांहीं नाहीं. " अशक्य हा शब्द मूर्ख लोकांच्या कोशामध्येंच फक्त सांपडतो. " असो; तेव्हां अंतःकरणामधून दोषांचें उच्चाटन करण्यासाठीं त्यामधील दोष काय आहेत, त्यांचा प्रभाव काय आहे, व त्यांचा अम्मल कसा चालतो, याविषयीं प्रत्येकानें सूक्ष्म निरीक्षण करावयास पाहिजे. म्हणून प्रथमतः आत्मनिरीक्षण करणें अत्यंत जरूर आहे. हरप्रसंगीं आत्मनिरीक्षण करण्याची संवय लावून घेतली पाहिजे; कारण, ज्याला आपली चूक दिसत नाहीं तो ती काढून टाकून आपली सुधारणा कशी करणार ? दोषांची कल्पनाच बरोबर येत नाहीं तर ते काढून टाकण्याची खटपट कशी होईल ? संकटाची बरोबर कल्पना आल्याशिवाय तें टाळण्याचा उपाय कसा सुचेल ? रोगाचें निदान झाल्याशिवाय त्यावर उपाय कसा करावा ? यासाठीं आत्मनिरीक्षणाचा धडा प्रथमतः गिरविला पाहिजे. उन्नतीच्या सोपानमार्गांतील ही अत्यंत महत्त्वाची पायरी असून ती चढून जाण्याचा प्रयत्न जरूर व्हावयास पाहिजे.

" Know thyself "

" आपल्या स्वतःची नीट ओळख करून घे " असा ग्रीस

देशांतील विख्यात तत्त्ववेत्ता सॉक्रेटिस याचा उपदेश असे. खरें शहाणपण आत्मनिरीक्षणांत आहे अशी त्याची पक्की समजूत असे; व त्याप्रमाणें तो आपलें वर्तन नेहमीं ठेवीही. पूर्वीं ग्रीस देशांत आपोलोचे देवळांत जाऊन देवास प्रश्न विचारून देवांकडून भविष्य वर्तवून घेण्याची वहिवाट असे. देवापुढें एका तिकाटण्यावर एका कुमारिकेला बसवीत असत; व त्यावर ती बसल्यानंतर तिचेजवळ धूप जाळीत; मग तिला प्रश्न विचारीत व त्या धुराच्या अमलांत देवासमोर असतांना तिजकडून जें उत्तर येईल तें खरें, अशी लोकांची समजूत असे. या स्थितींत ती कुमारिका जें कांहीं बोलते तें आपोलो देवाच्या प्रेरणेनें बोलते अशी लोकांची भावना असे. आथेन्स शहरांतील सर्वांत अधिक शहाणा कोण आहे असा कुमारिकेला एकदां प्रश्न विचारण्यांत आला; हा प्रश्न विचारल्याबरोबर सर्वांत शहाणा सॉक्रेटिस आहे असें कुमारिकेनें उत्तर दिलें! सर्वांत शहाणा सॉक्रेटिस आहे असा देवानें जबाब दिला ही बातमी चोहोंकडे पसरली; तेव्हां ती सॉक्रेटिसालाही कळली; परंतु देवानें सर्वांत आपणाला शहाणा ठरविलें म्हणून तो बिलकुल फुगून बसला नाहीं! बरोबरच आहे; शहाणे लोक कधींही ताठून जात नाहींत. उलट, देवानें शहाणा कां म्हणावें याबद्दल तो विचार करूं लागला. हें देवानें दिलेलें शहाणपणाचें सर्टिफिकिट घेऊन तो ठिकठिकाणीं मिरवीत सुटला नाहीं! ही शहाणपणाची पताका घेऊन सर्वांकडून अजिंक्यपत्र घेण्याची अक्षम्य हांव धरून सर्वत्र धुडगूस घालण्यांत त्याला कांहीं अर्थ दिसला नाहीं! उथळ पाण्यालाच खळखळाट फार. सॉक्रेटिसासारख्या थोर पुरुषाला पोकळ घमेंडीचा स्पर्श कधीं तरी होईल काय? देव आपणालाच शहाणा कां म्हणाला याबद्दल त्यानें आपल्याशीं एकसारखा शोध चालविला! त्या वेळेस आथेन्स शहरांत जे जे लोक शहाणेसुर्ते म्हणून नाणा-

बले होते त्यांची गांठ घेऊन त्यांच्याशीं संभाषण करून त्यांच्या गुणदोषांचा तलास करण्याचा त्यानें उद्योग आरंभिला. आज एकाद्या कवीची गांठ ध्यावी तर उद्यां एकाद्या तत्त्ववेत्त्याची गांठ ध्यावी, याप्रमाणें आथेन्स शहरांतील प्रमुख कवि, तत्त्ववेत्ते, राजकारण-निष्णात वगैरे लोकांची गांठ घेऊन, त्यांच्याशीं संभाषण करून, त्यांच्या गुणदोषांचें त्यानें पूर्णपणें पर्यालोचन केलें. हा सर्व तपास करतांना त्याला असें आढळून आलें कीं, प्रत्येक मनुष्य स्वतःला शहाणा समजतो व दुसऱ्याला अजाण समजतो ! जिकडे पहावें तिकडे थोडा न फार ताठा भरलेला ! आपलें ज्ञान फार अल्प आहे अशी खरी भावना कोणाचीच नाहीं ! ही स्थिति जेव्हां त्याला दिसून आली तेव्हां देवानें आपल्यालाच शहाणा कां म्हणावें याचें कारण त्याला आढळून आलें. तो म्हणे कीं, आपण अज्ञ आहों व आपल्यामध्यें पुष्कळ दोष आहेत ही भावना कोणाचीच नाहीं ! परंतु मी अज्ञ असून माझ्यामध्यें अनेक दोष आहेत अशी माझी ठाम समजूत आहे; याच कारणामुळें देव मला शहाणा म्हणत असावा. याप्रमाणें देवाच्या उत्तराचा त्या महात्म्यानें उलगडा केला !

आत्मनिरीक्षण करून आपल्यामधील गुणदोषांचें योग्य व बिनचूक परीक्षण करणारे सॉक्रेटिसासारखे किती लोक सांपडतील बरें ? शहाणपणाबद्दल योग्य मान मिळाला तरी त्याबद्दल पूर्ण विचार करून आपल्याकडे लघुत्व घेणारे असे लोक कितीसे पहावयास सांपडतील ? स्वतःच्या गुणदोषांची इतक्या कडकरीतीनें तपासणी करून वर्तन करणारा सॉक्रेटिसासारखा मनुष्य अनीतीचें अवलंबन करण्यास कधीं तरी प्रवृत्त होईल काय ? नीतिमत्तेचा स्वर्गांतून जगामध्यें जो अवतार झाला तो सॉक्रेटिसानें केला अशी त्याच्या श्रेष्ठनीतिमत्तेमुळें सर्वत्र त्याची ख्याति व्हावी यांत काय आश्चर्य आहे ?

सागरामध्यें खोल बुडी मारून तळांतील वालुकायम गाळ काढिला म्हणजे त्यांत मोत्यें, शिंपा, गारगोट्या व शंख असें निरनिराळें द्रव्य सांपडतें; त्याचप्रमाणें मानवी अंतःकरणाचा ठाव घेण्याची सुरुवात केली म्हणजे कोठें धिटाई तर कोठें भ्याडपणा, कोठें दया तर कोठें निर्दयपणा, कोठें स्वार्थ तर कोठें परोपकार, याप्रमाणें निरनिराळे गुणदोष अंतःकरणामध्यें दृष्टीस पडतात. अंतःकरण हें गुणदोषांचें मिश्रण आहे; व स्वाभाविक गुणदोषांनुसार मनुष्याची वागणूक मुख्यत्वेंकरून होत असते. या प्रकृतिधर्माकडून मनुष्य जोरानें खेंचला गेल्यामुळें त्यांचा तो अंकित बनतो! या स्वाभाविक गुणदोषांचा अम्मल इतका जबरदस्त असतो कीं, त्यामुळें स्वाभाविक तारतम्यबुद्धीचे व्यापारही कित्येक वेळां नीटसे चालेनासे होतात. याप्रमाणें अंतःकरणामध्यें या स्वाभाविक गुणदोषांचें प्राबल्य असल्यामुळें, त्यांचें नीटपणें निरीक्षण करावयास नको काय?

आत्मनिरीक्षण करण्याचा निश्चय करून सतत प्रयत्न करीत असल्याशिवाय निरीक्षण करण्याची संवय लागणार नाहीं. निरीक्षण करण्याचा हेतु मनांत धरावा लागतो. एकादे वेळेस सहजासहजीं निरीक्षण करण्याचें मनांत आणून काम भागावयाचें नाहीं. अमुक गोष्ट हातून बावगी झाली, अमुक गोष्ट करण्यामध्यें फार झाली, असें म्हणण्याचे प्रसंग आपल्या आयुष्यक्रमामध्यें आपल्यावर काय थोडे येत असतात? परंतु असल्या प्रासंगिक विचारांनीं व्हावा तसा उपयोग होत नाहीं; कारण दोषांचें निरीक्षण करण्याचा कायमचा निश्चय झालेला नसतो. एकादी गोष्ट सहजासहजीं मनांत येणें निराळें, व तिच्याबद्दल विचार करण्याचा ठाम व कायमचा निश्चय करणें ही गोष्ट निराळी; परीक्षेस बसण्यासाठीं म्हणून पुस्तकाचें परिशीलन करणें निराळें, व सहजासहजीं पुस्तक वाचणें निराळें. परीक्षेची तयारी करण्याचें मनांत आणून अभ्यास केला

म्हणजे तो काळजीनें व व्यवस्थेनें होऊन पक्का होतो. पुस्तकामध्यें शंकेचीं व अडचणीचीं ठिकाणें कोणतीं आहेत, त्यांचें स्वरूप काय आहे व त्या शंकांचें व अडचणींचें निरसन कसें करतां येईल याबद्दलचा यथास्थित विचार होऊन जो अभ्यास होतो तोच चोख होतो. नुसत्या वरवर वाचनाच्या योगानें ज्ञानप्राप्ति कितीशी होणार आहे ? त्याप्रमाणेंच, शीलाची उन्नति करून घेण्याचा हेतु मनांत धरून दोषांचें निरीक्षण होऊं लागलें म्हणजे त्यांचे व्यापार व चेष्टा काय आहेत व त्यांपासून होणारें नुकसान कोणतें आहे या सर्व गोष्टींचा उलगडा मनामध्यें चांगला होतो. आत्मनिरीक्षण करण्याचा हेतु मनांत न धरतां सहजासहजीं त्यांचें निरीक्षण करण्याचा विचार मनांत आणणें म्हणजे आत्मनिरीक्षणाची खरी बुद्धि आहे असें होत नाहीं. आपला दोष दुसऱ्यानें सद्धेतूनें जरी दाखविला तरी लागलेंच त्याच्यावर गरम होऊन, त्याबद्दल त्यालाच दोष देऊन, आपण आपल्या दोषांचेंच समर्थन करण्याच्या नादास कित्येक वेळां लागतों कीं नाहीं ? याचा अनुभव प्रत्येकास थोडाबहुत आहेच; हें असें कां व्हावें बरें ? याचें कारण इतकेंच कीं, आपल्या दोषांचें निरीक्षण खऱ्या बुद्धीनें करण्याचा हेतु आपण मनांत धरलेला नसतो. हेतु मनांत धरला तर मग दुसऱ्यावर गरम होण्याचें कारणच राहात नाहीं. आत्मनिरीक्षणाविषयीं खरी इच्छा व हेतु असेल तर मनुष्य दुसऱ्याच्या म्हणण्याचा विचार करून पाहील; रागावणार नाहीं.

आत्मनिरीक्षण करून आपल्या दोषांचें यथास्थित पर्यालोचन करण्याचे कामांत अहंभावाचा मोठा अडथळा होत असतो; कारण, दोषांचें निरीक्षण करण्याची बुद्धि उत्पन्न झाली कीं अहंकारवृत्तीच्या मूळावरच घाव बसतो. ‘ आपल्या डोळयांतील मुसळ दिसत नाहीं, परंतु दुसऱ्याचे डोळ्यांतील कुसळ दिसतें ’ अशी म्हण आहे

ती यथार्थ आहे. आपले दोष आपल्यास दिसत नाहींत असा ने-हमींचाच अनुभव आहे. अहंभावाचा प्रभावच असा आहे कीं, मनुष्य दुसऱ्याची चूक काढण्याचे कामांत विशेष तरबेज असतो; परंतु त्याची चूक त्याला दिसत नाहीं ! अहंभावानें विकृत झालेल्या दृष्टीस चूक कशी दिसणार ? आपलें तें खरें अशी भावना थोड्या-बहुत प्रमाणांत आपल्या सर्वांमध्यें आपण पाहात नाहीं काय ? अशी स्थिति नसती तर, दुसऱ्यानें आपली चूक आपल्या नजरेस स्पष्टपणें आणून दिली असतां, ती कबूल करण्यास आपण पुष्कळ वेळां आढेवेढे घेतों ते घेतले असते काय ? आपली चूक प्रांजलपणें कबूल करण्याचा मनाचा मोकळेपणा, फार थोड्या लोकांमध्यें सांपडतो. दाखविलेली चूक कबूल केलीच तर ती मोठ्या नाखुषीनें कबूल करावयाची अशी स्थिति आपण व्यवहारांत कित्येक वेळां पाहत असतों. लहानपणीं मुलाचें मन आरशासारखें स्वच्छ व निर्दोष असून, अहंकारापासून अलिप्त असतें, यामुळें ज्ञानाचे किरण त्यामध्यें झपाट्यानें प्रवेश करीत असतात. मनुष्य प्रौढ होऊं लागला म्हणजे ही बालपणची निर्दोष वृत्ति जाऊन हळू हळू मनुष्य अहंकारानें घेरला जातो. आरसा फुटला म्हणजे वस्तूचें बराबर प्रतिबिंब त्यांत दिसत नाहीं; त्याप्रमाणें, अहंभावानें दूषित झालेलें मन वस्तूचें यथार्थ ज्ञान मिळवूं शकत नाहीं. नैतिक वातावरण अहंकाराच्या काळ्याकुट्ट ढगांनीं सर्वत्र व्याप्त झालें म्हणजे त्यामध्यें ज्ञानसूर्याचा स्वच्छ प्रकाश कसा पडावा बरें ?

" Paint me as I am "

" जसा मी आहें तशीच तसबीर काढ " हें ऑलिव्हर क्रॉमवेलचें विधान अगदीं अर्थपूर्ण होतें. चेहऱ्यावरील वैगुण्य न दाखवितां नुसतें सौंदर्य दाखविलें तर तें काल्पनिक चित्र होईल; ती खरी तसबीर होणार नाहीं. चरित्र लिहिणारा चरित्रकार चरित्र-

नायकामध्यें असलेले दोष न दाखवितां जर नुसते गुणच दाखवील तर तो उत्तम चरित्र लिहिणारा म्हणून मानला जाणार नाहीं; त्याचप्रमाणें, आपल्या नैतिक चारित्र्यांतील दोषांकडे नीट लक्ष पुरवून आपण सावधगिरीनें त्याची तपासणी केली पाहिजे. आपला न्याय आपण निःपक्षपातबुद्धीनें करावयास शिकलें पाहिजे. न्यायाचा कांटा समतोल धरला पाहिजे. अहंकारबुद्धीमुळें दोषांचें पारडें हलकें करण्याची साहजीकच प्रवृत्ति असते ती नीट ओळखून आपण आपल्यास बरोबर तोलण्यास शिकलें पाहिजे. याप्रमाणें सतत जागरूक राहून आपण आपली तपासणी करूं लागलों तर शीलाची उन्नति खात्रीनें होत जाईल.

आत्मनिरीक्षण करून आपल्या दोषांचें पर्यालोचन करण्याचे कामांत अहंभावाचा मोठा अडथळा होत असतो; त्याचप्रमाणें लोभ, क्रोध इत्यादि दुर्विकार यांचा मनामध्यें रिघाव होऊं लागला म्हणजे आत्मनिरीक्षणबुद्धि नष्ट होते. वाऱ्याची वावटळ सुटली म्हणजे चोहोंकडे धुराळाच धुराळा होऊन स्वच्छ दिसेनासें होतें; किंवा पाण्यांत माती पडली म्हणजे सर्व पाणी गढूळ होऊन जातें; त्याचप्रमाणें विकारमलानें अंतःकरणवृत्ति दूषित होऊन अस्वच्छ झाल्या म्हणजे आत्मनिरीक्षणाची प्रवृत्ति नष्ट होते. उत्कृष्ट जलानें भरलेले ढग जुळून पाऊस पडण्यास सुरुवात होणार इतक्यांत वावटळ सुटावी व ते ढग विसकटून जाऊन पाऊस नाहींसा व्हावा, त्याप्रमाणेंच, दुर्विकारांनीं मन झपाटलें म्हणजे आत्मनिरीक्षणप्रवृत्ति नष्ट होते व त्यामुळें सत्यासत्यनिर्णायक शक्ति लोपून जाऊन ज्ञानरसाची वृष्टी होत नाहीं. सारांश, अंतःकरणाची प्रसन्नता नष्ट करून त्यास अवनतीस नेणाऱ्या दोषांचें यथार्थ ज्ञान आत्मनिरीक्षणाच्या योगानें आपण करून घेतलें पाहिजे. आपलें कल्याण आपल्याच हातीं आहे; आपण आपल्यास नीट ओळखूं तर आपलें क-

ल्याण होईल; नीट न ओळखूं, तर आपलें नुकसान होईल. भगवद्गीतेंत म्हटलें आहे कीं,

आत्मैव ह्यात्मनो बंधुरात्मैव रिपुरात्मनः ॥

" कारण आपणच आपल्या स्वतःचा बंधु किंवा आपणच आपला शत्रु म्हटला आहे. " ही श्रेष्ठ उक्ति किती अर्थपूर्ण आहे बरें ? नैतिक उन्नतीच्या भव्य व रमणीय मंदिरामध्यें प्रवेश करण्यासाठीं आत्मनिरीक्षण हा पहिला दरवाजा आहे. या दरवाजांतून पार पडल्यास पुढें शिरकाव होण्याची आशा आहे; परंतु येथेंच मज्जाव झाला तर पुढें प्रवेश कसा व्हावा ? यासाठीं अंतःकरणाची स्थिरता नष्ट करून टाकणाऱ्या दोषरूपी सैतानाच्या चेष्टांच्या घाणेरड्या स्वरूपाची आत्मनिरीक्षणाच्या योगानें आपणास योग्य कल्पना येत चालली म्हणजे शीलोन्नतीचे मार्गामध्यें आपण बरीच मजल मारिली असें होईल.

# प्रकरण ७ वें

१५२९

## आत्मसंयमन

शीलाची उन्नति साधण्यासाठीं अंतःकरणांतील दोषांचें यथार्थ ज्ञान करून घेणें अत्यंत जरूर आहे; व याकरितां प्रत्येकानें आत्मनिरीक्षण करण्याची संवय लावून घेण्याची खटपट केली पाहिजे, याविषयीं मागील प्रकरणामध्यें सांगितलें आहे. आत्मनिरीक्षण करून आपल्या दोषांचें यथार्थ ज्ञान करून घेणें ही नैतिक उन्नतीच्या सोपानमार्गांतील महत्त्वाची पायरी होय; तथापि, एवढ्यानेंच इष्टकार्य साधणार नाहीं. दोषांचा अंमल हळूहळू कमी होऊन अखेर त्यांचें उच्चाटन झालें तरच मानवी आयुष्यक्रमाचें चीज होणार आहे.

गांव तेथें महारवाडा असणारच; समाज कितीही सुधारला तरी त्यामध्यें दुर्जन हे थोडेबहुत तरी असावयाचेच; तसेंच, परमेश्वरानें निर्मिलेली मानवी प्रकृति ही एक सुंदर चीज आहे खरी, तथापि त्या प्रकृतीमध्यें स्वाभाविक दोष हे असावयाचेच. प्रकृति निर्दोष कशी असूं शकेल ? सर्वांगसुंदर प्रकृति कोणाची असणार ? या जड प्रकृतीच्या आनुषंगिक असणारे दोष हे थोड्याबहुत प्रमाणांत सर्वत्र सांपडतात; कोठें कमी कोठें जास्ती, मिळून प्रकृतिजन्य दोषांपासून सर्वस्वी मुक्त असा सामान्य माणसांमध्यें कोण सांपडणार आहे बरें ?

शैत्यं हि यत् सा प्रकृतिर्जलस्य ।

—कालिदास

" थंडपणा हा पाण्याचा धर्म आहे. " त्याचप्रमाणें, प्रकृतिजन्य गुणावगुण प्रसंगानुसार प्रकृतीमध्यें उद्भूत व्हावेत हा या प्र-

कृतीचा सामान्य धर्म आहे. संशयी माणसाला नाहीं तेथें संशय उत्पन्न होऊन त्या संशयाच्या पिशाच्यानें तो पछाडला जातो ! रागीट मनुष्यास रागाचे झटके प्रसंगानुसार येऊन त्याच्या चित्ताचा क्षोभ होतो ! दुसऱ्याच्या नफानुकसानीबद्दल यत्किंचित्सुद्धां परवा न करतां, लोभी मनुष्य प्रसंगानुसार आपल्याच पोळीवर तूप ओढण्याची खटपट करीत नाहीं काय ? भीतीनें गांगरून गेल्यामुळें ज्यांच्या चित्तवृत्ति प्रसंगानुसार बेमर्यादरीतीनें अस्थिर होऊन जातात, अशीं माणसें आपण पाहात नाहीं काय ? परोत्कर्ष सहन न झाल्यामुळें मात्सर्यानें त्रस्त झालेलीं माणसें आपण थोडीं का पाहतों ? तात्पर्य, प्रत्येक मनुष्य स्वाभाविक प्रकृतिदोषांनीं बद्ध झालेला आहे.

वर सांगितल्याप्रमाणें, प्रत्येक मनुष्यामध्यें कमीजास्ती दोष असतात हें निश्चित आहे; तेव्हां प्रश्न असा कीं, या दोषांचा अंमल हळूहळू कमी करून त्यांचें निर्मूलन करतां येईल काय ? या दोषरूपी पिशाच्याची गति कुंठित करण्यास कांहीं बीरमंत्र आहे काय? जर कांहीं उपाय नसेल तर हें पिशाच्च सर्वत्र संचार करून चोहोंकडे धुडगूस घालीत राहणार ! हें मानवी अंतःकरण दोषांनीं व्याप्त होऊन त्याच्या उन्नतीची सर्व आशा नष्ट होणार ! दुर्गुणांच्या पंकांत अंतःकरण एकदां रुतलें म्हणजे मग त्यास वर कोण काढूं शकणार ? वेळींच कांहीं उपाययोजना करतां येईल काय ? आत्मनिरीक्षणाच्या संवयीमुळें दोषांचें यथार्थ ज्ञान होईल; तथापि, त्यांचें उन्मूलन झाल्याशिवाय काय फायदा ? रोगाचें निदान बरोबर करणें ही महत्त्वाची गोष्ट आहे खरी, तथापि, नुसतें निदान बरोबर झाल्यानें रोग्यास कितीसा फायदा होणार आहे ? रोगावर योग्य व कडक औषधोपचार केल्याशिवाय रोग कसा बरा होईल ? उन्मत्त झालेल्या हत्तीस साखळदंडानेंच डांबावें लागतें; मत्त झाले-

ल्या अपराध्यास शृंखला घालून ताब्यांत ठेवावें लागतें; दंडेली करणाऱ्या उन्मत्त माणसाच्या मुसक्या बांधल्याशिवाय तो वठणीस कसा यावा ? त्याचप्रमाणें प्रबल झालेल्या दोषांचें प्राबल्य कमी करून त्यांचा उच्छेद करण्याचें काम आत्मसंयमनाच्या योगानें करावें लागतें.

समाजामध्यें सर्वत्र शांतता नांदून सार्वत्रिक कल्याणाची अभिवृद्धि व्हावी याकरितां सर्व बंडाळी मोडून टाकावी लागते, त्याचप्रमाणें मनुष्याचे चित्ताची स्थिरता व शांति नष्ट करून त्यास अवनतीस नेणाऱ्या दोषांचा उच्छेद आत्मसंयमनाच्या योगानें केला पाहिजे. समाजामध्यें शासनपद्धति नसेल तर दुर्जनांचा सुळसुळाट होऊन सर्वत्र बखेडा व बेबंदशाही माजून राहील, व समाज खालावत जाईल ! त्याचप्रमाणें, आत्मसंयमन हा गुण अंगांत नसेल तर दुर्गुणांचें वर्चस्व होऊन सद्गुणांचा लोप होत जाईल; अंतःकरणांतील सद्वृत्तींचा नाश होऊन त्यांमध्यें अनीतीचें प्राबल्य माजेल !

अंतःकरणांतील दोषांचें प्राबल्य हळू हळू कमी करून त्यांचें उन्मूलन करण्यास वर सांगितल्याप्रमाणें आत्मसंयमन हाच उपाय आहे. प्रसंगानुसार प्रकृतिजन्य दोषांनीं आपलें डोकें वर काढिलें कीं आत्मसंयमनाच्या तीक्ष्ण शस्त्रानें त्यांच्यावर जोरानें व निश्चयानें आघात केला पाहिजे. याप्रमाणें वरचेवर आघात करीत गेल्यास दोषांचा उठाव न होतां ते निर्बल होत जातील; यासाठीं हें आत्मसंयमनरूपी शस्त्र पाजळून सदैव लखलखीत ठेवलें पाहिजे. हें शस्त्र जसजसें आपण जास्त तीक्ष्ण करूं, तसतशी आपली नैतिक उन्नति अधिक होत जाईल; परंतु या शस्त्रावर दाट गंज चढून तें बोथट होईल तर दुर्गुण प्रबल होऊन नैतिक ऱ्हास होत जाईल ! नीतिमत्तेच्या भव्य व सुंदर मंदिरामध्यें सुखानें वास करण्यासाठीं आत्मनिरीक्षण व आत्मसंयमन या द्वाररक्षकांची अत्यंत जरूर

आहे. आत्मनिरीक्षण करून आत्मसंयमनाची संवय वाढत गेली म्हणजे मानवी अंतःकरण खात्रीनें उन्नत होत जाईल.

ग्रीस देशांतील आथेन्स शहरीं पूर्वी एकदां एक ज्योतिषी आला. ज्योतिषशास्त्रांत तो फार निष्णात आहे अशी त्याची ख्याति होती. त्याची पारख पाहण्यासाठीं लोकांनीं सभा भरविली व त्याला सभेस बोलाविलें. त्या सभेमध्यें प्रसिद्ध तत्त्ववेत्ता सॉक्रेटिस हाही हजर होता. सभेंतील माणसांच्या स्वभावांतील गुणदोषांविषयीं त्यास पुष्कळ प्रश्न विचारण्यांत आले व अखेर साक्रेटिसाच्या स्वभावाबद्दल त्यास प्रश्न विचारण्यांत आला. तेव्हां त्यानें सांगितलें कीं, सॉक्रेटिस हा फार तापट स्वभावाचा मनुष्य असावा. हें उत्तर त्या ज्योतिष्यानें सांगितल्याबरोबर सभेमध्यें सर्वत्र हंशा पिकला. सॉक्रेटिस हा फार शांत स्वभावाचा मनुष्य असून तो तापट आहे असें म्हणणाऱ्या ज्योतिष्याची लोक फारच टर उडवूं लागले ! हा सर्व प्रकार सॉक्रेटिस पहातच होता. त्या ज्योतिष्याची लोकांनीं फारच टर उडविलेली पाहून सभेंतील लोकांना उद्देशून सॉक्रेटिस म्हणाला, अहो तुम्ही या ज्योतिष्याची अशी टर उडवूं नका. माझ्या स्वभावाविषयीं या ज्योतिष्यानें जी हकीकत सांगितली आहे ती अक्षरशः खरी आहे. यांत तुम्हांस आश्चर्य वाटण्याचें बिलकुल कारण नाहीं. हा ज्योतिषी म्हणतो त्याप्रमाणें माझा स्वभाव फार तापट आहे; इतकेंच कीं, मला राग येऊं लागला कीं तावडतोब मी त्याचा नेटानें प्रतिकार करतों. रागाची उठावणी होते परंतु त्याचें संयमन करून जेथल्यातेथें मी त्यास दाबून टाकितों. याप्रमाणें सांगून त्या थोर पुरुषानें लोकांची समजूत घातली ! या त्याच्या श्रेष्ठ आत्मनिग्रहामुळें तो अत्यंत नीतिमान् पुरुष व्हावा यांत काय आश्चर्य आहे ? आपल्या गुणदोषांची कडक तपासणी करून, दोषांना दाबून टाकण्याकरितां अहर्निश जोरानें खटपट करणाऱ्या माणसाची

नीतिमत्तेबद्दल कीर्ति व्हावी हें योग्यच आहे. सॉक्रेटिसासारखे जगामध्यें थोर पुरुष होऊन गेले त्यांच्यामध्यें हा आत्मसंयमनाचा गुण अति उज्ज्वल व श्रेष्ठ दर्जाचा होता असें दिसून येईल. उघडच आहे; जोराच्या वावटळीनें समुद्रांत चोहोंकडे लाटा उसळून सर्वत्र खळबळ उडावी, त्याप्रमाणें, ज्याचें अंतःकरण दोषांनीं व्याप्त झाल्यामुळें अस्वस्थ होऊन जातें, त्याच्या हातून महत्कार्य काय व्हावयाचें आहे ?

प्राचीन इटलीमध्यें प्रसिद्ध ज्यूलियस सीझर याचे निधनानंतर मोठा घोंटाळा माजून राहिला. त्या वेळेस एका तेजस्वी ताऱ्याचा उदय होऊन त्यानें चोहोंकडे पसरलेला अंधःकार नाहींसा केला. ऑगस्टस सीझर हाच तो तेजस्वी तारा होय. हाच रोमचा पहिला सार्वभौम बादशहा. या पुरुषामध्यें आत्मसंयमनशक्ति विशेष होती असें, इतिहासावरून दिसून येतें. इजिप्तची राणी क्लीओपाट्रा इनें आपल्या सौंदर्यानें व चेष्टांनीं ज्यूलियस सीझर व अॅन्टोनियस सारख्या माणसांना सुद्धां नादीं लाविलें होतें! अॅन्टोनियस तर या बाईच्या चेष्टांमुळें कसा फसला व त्याची कशी दुर्दशा झाली याविषयीं रोमच्या इतिहासांत लिहिलेली हकीकत महशूरच आहे. या बाईची प्रत्यक्ष मुलाखत होण्याचा प्रसंग एकदां ऑगस्टस याला आला होता; मुलाखतीचे वेळीं जाणून बुजून त्यानें आपली मान सारखी खालीं घालून, बाईकडे बिलकुल न बघतां प्रसंगास योग्य असें भाषण करून तो ताबडतोब तेथून निघून गेला. किती निग्रही वृत्ति ही ! याप्रमाणें सतत जागरूक राहून त्यानें आपल्या राज्यामध्यें उत्कृष्ट व्यवस्था लावली असल्यास काय नवल आहे ? शिवाजी महाराजांमध्यें हा गुण किती उज्ज्वल व श्रेष्ठ दर्जाचा होता याविषयींची हकीकत पहिल्या प्रकरणांत सांगितलीच आहे. कल्याणचा सुभेदार मुलाणा याच्या सुनेस मातेसमान मानून

महाराजांनीं तिचा योग्य आदर करून तिला सुरक्षितपणें विजापुरास तिच्या सासऱ्याकडे पाठविलें ! महाराष्ट्रांत राज्यस्थापना करणाऱ्या अत्यंत थोर पुरुषामध्यें अत्यंत श्रेष्ठ निग्रहवृत्ति असावी यांत नवल तें कसलें ?

अंतःकरणांतील दोषांशीं आत्मसंयमनरूपी शस्त्रानें सामना करण्यामध्येंच शीलाची अभिवृद्धि होत असते. या झगड्यामध्येंच मानवी आयुष्यक्रमाचें खरें रहस्य आहे. यांतच खरा पुरुषार्थ आहे. परंतु अंतःकरणांतील दोषांशीं न झगडतां त्यांच्या स्वाधीन होणें म्हणजे आपल्या नादानपणाचें प्रदर्शन करण्यासारखेंच आहे ! दौर्बल्यामुळें दोषांचा प्रतिकार करतां येईनासा झाला म्हणजे बुडत्याचा पाय खोलांत या न्यायानें शीलाचा ऱ्हास होण्यास काय उशीर आहे ?

आत्मसंयमन हा गुण अंगांत नसल्यामुळें शेंकडो लोकांचें नुकसान झालेलें आपण पहात नाहीं काय ? शेंकडो लोक आत्मसंयमनशक्ति नसल्यामुळें व्यसनाधीन होऊन नीतिभ्रष्ट होत नाहींत काय ? प्रकृतींत जडांशानें प्रेरित झालेली बरीवाईट इच्छा उत्पन्न झाली, व त्या इच्छेची तृप्ति करण्याच्या भरीस मनुष्य लागला, कीं नीतीचा ऱ्हास होत चाललाच म्हणून समजावें ! असल्या जडांशप्रेरित इच्छेला आळा घालून तिचें योग्य नियमन केल्याशिवाय अंतःकरण निर्मल रहात नाहीं. अफू खाण्याची वेळ आली आणि ती वेळेस मिळाली नाहीं म्हणजे अफूबाजाची कशी अवस्था होते बरें ? पाण्याच्या बाहेर काढल्यामुळें तडफडणाऱ्या माशाप्रमाणें त्याची स्थिति होत नाहीं काय ? ही अशी अवस्था कां व्हावी ? अंतःकरणांत उद्भवलेल्या इच्छेला आळा घालण्याचा प्रयत्न कधींच न झाल्यामुळें, इच्छा प्रबल होत जाऊन, मनुष्याचें स्वातंत्र्य हिरावून घेऊन ती त्यास आपला अंकित बनविते ! अंतःकरणवृत्तींवर वेळेवर दाब ठेविला नाहीं तर त्या उद्दाम व अनावर होत

जातात, व मनुष्याचें नीतिदृष्ट्या नुकसान करितात. भगवद्गीतेंत म्हटलें आहे कीं:—

इंद्रियस्येंद्रियस्यार्थे । रागद्वेषौ व्यवस्थितौ ॥
तयोर्न वशमागच्छेत्तौ ह्यस्य परिपन्थिनौ ॥ १

" इंद्रिय आणि त्याचे विषय यांच्यामधील प्रीति व द्वेष हीं मूळचींच ठरलेलीं आहेत. या प्रीतिद्वेषांच्या ताब्यांत आपण जाऊं नये; कारण ते मनुष्याचे वाटमारे शत्रु होत. " हें वचन यथार्थ आहे.

पदार्थविज्ञानशास्त्राप्रमाणें, जेथें गुरुत्वाकर्षणाचा मध्य असतो त्या ठिकाणीं पदार्थ स्थिर राहतो. हें तत्त्व स्पष्ट करून दाखविण्याकरितां एक लांकडाची बाहुली तयार केलेली असते, व ती कशीही टाकली तरी बैठी रहावी अशा रीतीनें गुरुत्वाकर्षणमध्य साधलेला असतो. त्याचप्रमाणें, मनुष्यानें आत्मसंयमनाच्या योगानें आपल्या अंतःकरणवृत्ति स्थिर ठेवण्याचा प्रयत्न सतत केला पाहिजे. गीतेमध्यें दुसऱ्या अध्यायांत स्थिरबुद्धीचें महत्त्व सांगितलें आहे तें योग्य आहे. प्रकृतिजन्य दोषांमुळें अंतःकरण हेलकावे खावयास लागलें म्हणजे त्या अंतःकरणाची स्थिति तुफानांत सांपडलेल्या तारवाप्रमाणें होते ! अशा स्थितीमध्यें आत्मसंयमनाच्या योगानेंच तें स्थिर करावें लागतें.

आपल्यामधील दोषांचें निरीक्षण करण्याचा हेतु मनांत धरून तो तडीस नेण्याचा निश्चय करावा लागतो, असें आत्मनिरीक्षणाच्या प्रकरणांत सांगितलें आहे. त्याचप्रमाणें, दुर्वृत्तींचा अंतःकरणांत उद्भव होऊं लागला कीं ताबडतोब त्यांचें नियमन करण्याचा निश्चय करावा लागतो. निश्चयानें नियमन करण्याचा प्रयत्न झाला नाहीं तर प्रकृतिजन्य दोषांचें वर्चस्व आपल्यास नकळत होत जातें. कोणतीही गोष्ट तडीस नेण्याचा संकल्प केला तरच कांहीं

तड लागण्याचा संभव आहे. कोणताही कार्यभाग पार पाडण्यास मनाचा निर्धार व चिकाटी लागते; व ज्या ठिकाणीं साहजिक प्रकृतिधर्मामुळें निश्चयाचें बळ कमी होण्याचा संभव फार, तेथें आपला निश्चय फारच संभाळावा लागतो.

आत्मसंयमन मुख्यत्वेंकरून तीन प्रकारचें आहे.

इंद्रियाणां मनश्चास्मि ।

" इंद्रियांपैकीं मन मी आहें " असें भगवद्गीतेमध्यें वचन आहे. सर्व इंद्रियांमध्यें मन हें मुख्य आहे, व बऱ्यावाईट वागणुकीचीं सर्व सूत्रें मनाच्याच स्वाधीन असतात; परंतु राज्यसूत्रें राजाच्या हातीं असलीं तरी राजाज्ञेची अंमलबजावणी करण्याचें काम दुय्यम अधिकाऱ्यांच्या हातांत असतें, यामुळें हे अधिकारीही कमी योग्यतेचे असतात असें नाहीं; त्याचप्रमाणें, वागणुकीचीं सर्व सूत्रें मुख्यत्वेंकरून मनाच्या स्वाधीन असलीं तरी बरीवाईट वागणूक प्रत्यक्ष अमलांत आणण्याचें काम इतरत्र करावयाचें असतें, व त्या संकल्पांस कृतीचें स्वरूप देण्याचें काम हस्तपादादि इंद्रियांकडून होत असतें. तेव्हां स्थूलदृष्टीनें पाहतां मानसिक, कायिक, व वाचिक अशा तीन प्रकारच्या क्रिया आहेत; व या तीन प्रकारच्या क्रियांचें नियमनही मानसिक, कायिक व वाचिक असें तीन प्रकारचें आहे.

आतां प्रथम मानसिक संयमनाचा विचार करावयाचा. दुष्ट संकल्पांचा उदय मनोभूमिकेमध्यें होऊं नये अशा रीतीनें मनाचें नियमन केलें पाहिजे. दुष्ट विचारांनीं मनाची शांति भ्रष्ट होऊं द्यावयाची नाहीं असा पक्का निर्धार केला पाहिजे. साहजिक प्रकृतिधर्म काय आहेत याबद्दल निरीक्षण करून प्रकृतिधर्मप्रेरित वाईट विचारांचें वेळींच नियमन केलें पाहिजे. नियमन वेळींच झालें नाहीं तर

संकल्पांना कृतीचें स्वरूप येऊं लागतें व नीतिमार्गापासून मनुष्य भ्रष्ट होत जातो. अंगांत ज्वर भरावयास लागण्यापूर्वीं, तो भरणार, असें एकंदर लक्षणांवरून चांगल्या वैद्यास समजतें, व त्याप्रमाणें औषधाची योजना तो करतो; तसेंच चित्ताचा विक्षेप होण्यापूर्वींच सावधपणानें लक्ष ठेवून वेळींच चित्ताचें नियमन केलें पाहिजे; कारण चित्त प्रक्षुब्ध झालें म्हणजे त्या क्षोभाच्या अमलांत मनुष्य वेळेनुसार वाटेल तें दुष्कृत्य करण्यास प्रवृत्त होण्याचा संभव असतो. चित्तक्षोभामुळें दुष्कृत्याच्या हिडिसपणाचें खरें स्वरूप बरोबर समजत नाहींसें होतें; चित्ताच्या स्थिर व शांत स्थितीमुळें वस्तूंचें यथार्थ ज्ञान होतें; सत्कृत्याचें सौष्ठव कळतें व दुष्कृत्याच्या हिडिसपणाची यथार्थ कल्पना होते; तेव्हां नैतिक उन्नतीचा सर्व आधार हें मानसिक संयमनच होय. या गुणाची जसजशी अभिवृद्धि होईल तसतशी नीति सुधारत जाईल. जगांतील सर्व दुष्कृत्यें या गुणाच्या अभावामुळें नाहीं का होत ? या गुणाची वाढ होत गेल्यास सद्वृत्तींचा उच्छ्रय होऊन आयुष्यक्रम सर्वांसच सुखकर होत जाईल; पण ही गोष्ट साध्य व्हावी कशी ? प्रथम आपल्या दोषांचें यथार्थज्ञान करून घेण्याची पुष्कळांना इच्छा नसते, व इच्छा असली तरी दोषांचें ज्ञान करून घेऊन त्यांचें नियमन करण्याची योग्य खटपट होत नाहीं; अशी स्थिति असल्यामुळें, मनुष्य बहुधा आपल्या प्रकृतीचाच अंकित बनतो; परंतु उन्नति ही मानवी आयुष्याचें रहस्य असल्यामुळें, ती साध्य करून घेण्यास दीर्घ प्रयत्न करावयास नको काय ? आपल्या उन्नतीची आपण खटपट न करूं तर हळू हळू खालावत जाऊं. प्रसिद्ध इंग्रज कवि मिल्टन म्हणतो:—

" Awake, arise, or be forever fallen. "

" जागे व्हा, उठा, नाहीं तर नेहमींच पडून रहा. " हें विधान यथार्थ आहे. उन्नतीचा लाभ व्हावा यासाठीं मनुष्यानें सतत

जागरूक राहून अविश्रांत श्रम केले पाहिजेत. देवपणा प्राप्त होण्यास लोखंडाचे चणे खावे लागतात !

आतां कायिक संयमनाचा विचार करावयाचा. कोणतेंही बरें-वाईट कृत्य करण्याचा प्रथम मनामध्यें संकल्प होतो, व नंतर तो संकल्प तडीस नेण्याकरितां मनुष्य साधारणतः हस्तपादादि इंद्रियांची मदत घेतो, असें पूर्वीं सांगितलेंच आहे. प्रथम संकल्प, नंतर प्रत्यक्ष कृति, अशी ही परंपरा आहे. अशी स्थिति असल्यामुळें, या मानवी कायेचा उपयोग सत्कृत्य करण्याकडे करावयास नको काय ? परमेश्वरानें हें शरीर कांहीं तरी योग्य कामाकरितांच उत्पन्न केलें आहे; तेव्हां सत्कृत्य करण्याऐवजीं दुष्कृत्य करण्याकडे त्याचा विनियोग होईल तर या शरीराचा दुरुपयोग झाला असें नाहीं का होणार ? परमेश्वराच्या हेतूविरुद्ध वागणूक केल्याचें पाप नाहींका लागणार ? एकादा वाईट संकल्प करणें म्हणजे वाईटच; परंतु त्या संकल्पाप्रमाणें कायिक कृति करणें हें फारच वाईट ! कालिदास म्हणतो:—

शरीरमाद्यं खलु धर्मसाधनम् ।

—कुमारसंभव

“ शरीर हें धर्माचें मुख्य साधन आहे. ” शरीर हें कर्तव्याचें साधन असल्यामुळें त्याचें योग्य नियमन करून, व तें शुद्ध व पवित्र ठेवून त्यास सत्कृत्याकडेच वळविलें पाहिजे. प्रसिद्ध इंग्रज ग्रंथकार स्मिथ म्हणतो:—

“ Handsome is, that handsome does.”

“ ज्याची कृति सुंदर, तो सुंदर. ” हें वचन मार्मिक आहे. खरोखर खरें सौंदर्य शरीराच्या दिखाऊपणांत नसून त्याच्याकडून होणाऱ्या कृतींमध्यें असतें.

आतां तिसऱ्या प्रकारचें संयमन म्हणजे वाक्संयमन. गीतेमध्यें म्हटलें आहे कीं,

अनुद्वेगकरं वाक्यं । सत्यं प्रियहितं च यत् ॥

" मनाला उद्वेग न देणारें, सत्य, प्रिय व हितकारक असें जें भाषण " तेंच उत्कृष्ट भाषण होय. वाणी मधुर, सत्य व हितकारक असून, तिच्या योगानें तिसऱ्यास उद्वेग होतां कामा नये; दुसऱ्याचे मनास लागेल अशी भाषा वापरतां कामा नये. एक वेळ शरीरास मार लागला तर त्यापासून इतका त्रास होणार नाहीं, परंतु शब्दाचा मार फार लागतो. पुष्कळ लोकांना फडाफडा बोलण्याची संवय असते; यासाठीं जेव्हां कठोर शब्द वापरण्याचा मोह उत्पन्न होतो तेव्हां जिव्हेला आंवरून धरण्याचा प्रयत्न केला पाहिजे. कटु शब्द बोलण्यापूर्वीं दहा अंक मोजावेत अशी म्हण आहे ती बरोबर आहे. बोलण्यानें बोलणें वाढत जातें असा सामान्य नियम आहे. मनुष्य एकदां मारीत सुटला म्हणजे तो मारीतच सुटतो, त्याप्रमाणें, बोलूं लागला म्हणजे तो बोलतच सुटतो. एक ठोंसा दिला म्हणजे दुसरा ठोंसा द्यावासा वाटतो; त्याप्रमाणें, एक कठोर शब्द उच्चारला म्हणजे दहा शब्द बोलावेसे वाटतात. शब्दाचें भांडण सुरू असतां हातघाईवर प्रकरण येतें हें कित्येक वेळां आपण पहात नाहीं काय ? जिव्हेवरची आवरशक्ति कमी झाल्यामुळें मनुष्य बोलत सुटतो व मग बोलण्याचे भरीं पडून हातघाईवर येतो ! जास्त बोलण्यानें चित्ताचा अधिकच क्षोभ होतो व आधक बोलावेसें वाटतें; याकरितां वेळींच जिव्हेचा निग्रह करण्याचा प्रयत्न करावयास नको काय ? परमेश्वरानें मनुष्यास वाणी दिली आहे त्यांत त्याचा काय हेतु असावा ? वाणीपासून परस्परांमध्यें ममतेची वृद्धि व्हावी हाच त्याचा हेतु असावा हें उघड

आहे. वाह्यात बोलून व भांडणतंटा करून परस्परद्वेषाची वृद्धि व्हावी असा परमेश्वराचा हेतु कधीं तरी असूं शकेल काय ?

प्रसंग ओळखून बोलणें व प्रसंगानुसार मौन धरणें ही कला फार थोड्या लोकांना साधते असा सामान्य अनुभव आहे. विशेषेंकरून प्रसंगानुसार बोलण्यापेक्षां मौन धरण्याचें कामच फार अवघड आहे. जिव्हेची बोलण्याकडे साहजिक प्रवृत्ति असल्यामुळें तिचें योग्य नियंत्रण करणें अधिक कठीण असतें.

मौनं चैवास्मि गुह्यानाम् ।

" गुह्यांमध्यें मौन मीच " असें गीतेंत योग्यच म्हटलें आहे. तेव्हां योग्य वेळीं जिव्हेचें योग्य नियमन होणें अत्यंत जरूर आहे.

वर सांगितल्याप्रमाणें, मानसिक, कायिक व वाचिक निग्रह करून, चित्तवृत्ति स्थिर व प्रसन्न ठेवल्या म्हणजे अंतःकरणामध्यें सद्वृत्तींचा उदय होतो व हळू हळू त्यांची वाढ होऊन अंतःकरण उन्नत होत जातें. शरीर, वाणी व मन यांचें योग्य नियमन करून त्यांस योग्य कर्माकडे लावणें हें एकप्रकारचें उत्कृष्ट तपच आहे असें गीतेंत म्हटलें आहे. तें असें:—

देवद्विजगुरुप्राज्ञपूजनं शौचमार्जवम् ।
ब्रह्मचर्यमहिंसा च । शारीरं तप उच्यते ॥ १
अनुद्वेगकरं वाक्यं । सत्यं प्रियहितं च यत् ॥
स्वाध्यायाभ्यसनं चैव । वाङ्मयं तप उच्यते ॥ २
मनःप्रसादः सौम्यत्वं मौनमात्मविनिग्रहः ।
भावसंशुद्धिरित्येतत्तपो मानसमुच्यते ॥ ३

" देव, ब्राह्मण, गुरु व विद्वान् यांचें पूजन, शुचिर्भूतपणा, सरळपणा, ब्रह्मचर्य व अहिंसा यांस शारीर म्हणजे कायिक तप म्ह-

णतात. ( मनाला ) उद्वेग न देणारें, सत्य, प्रिय व हितकारक असें जें भाषण तें, आणि स्वाध्यायाचा म्हणजे स्वकर्माचा अभ्यास, यांस वाङ्मय ( वाचिक ) तप म्हणतात. मन प्रसन्न ठेवणें, सौम्यता, मौन, मनोनिग्रह आणि शुद्ध भावना यांस मानसतप म्हणतात." तेव्हां, शरीर, वाणी व मन यांचें योग्य संयमन करून, वर सांगितल्याप्रमाणें उत्कृष्ट तपाचें आचरण झाल्यास, अंतःकरण निःसंशय उन्नत होत जाईल.

# प्रकरण ८ वें

## शील आणि श्रद्धा

अंतःकरणांतील दोषांचें नीट पर्यालोचन करून आत्मसंयमनाच्या योगानें त्यांचें उन्मूलन करण्याचा सतत व दीर्घ प्रयत्न केल्यास शीलाची उन्नति होत जाते, याविषयीं मागील प्रकरणांत विवेचन केलें आहे. आतां श्रद्धेचा शीलावर काय परिणाम होतो याविषयीं विचार करावयाचा आहे.

श्रद्धामयोऽयं पुरुषः ।

" पुरुष हा श्रद्धामय आहे " असें गीतेमध्यें म्हटलें आहे. श्रद्धा ही मानवी अंतःकरणाचा स्वाभाविक धर्म आहे. मानवी अंतःकरण ही एक अजब चीज आहे. कोंदणांत हिरा बसवावा त्याप्रमाणें परमेश्वरानें अघटित चातुर्यानें मानवी शरीराच्या कोंदणांत अंतःकरणरूपी अति मनोहर असा हिरा बसविलेला आहे; मात्र या अंतःकरणरूपी हिऱ्यावर दोषांचा कमीजास्त मळ बसल्यास तो वरचेवर झाडून टाकून त्याचें मनोहर स्वरूप कायम ठेवण्याचा प्रयत्न करावयास पाहिजे; व त्याप्रमाणें प्रयत्न केल्यास अंतःकरण हें श्रेष्ठ गुणांचें एक भांडारच बनणार आहे ! अंतःकरणांत सद्गुण हे बीजरूपानें असतात व या बीजावर सुसंस्कारांचें पाणी घालून त्या बीजाचा सुंदर वृक्ष बनविला पाहिजे, असें मागें सांगितलेंच आहे. या बीजरूपानें असणाऱ्या सद्गुणांपैकींच श्रद्धा हा एक उत्कृष्ट गुण आहे.

सन्माननीय माणसासंबंधानें अंतःकरणामध्यें योग्य आदरबुद्धि

उत्पन्न व्हावयास पाहिजे; कारण ज्या अंतःकरणामध्यें आदरबुद्धि उत्पन्न झाली नाहीं, तें उन्नत कसें होईल ? श्रेष्ठ पुरुषांच्या श्रेष्ठ गुणांमुळें आपल्या मनांत योग्य आदरबुद्धि उत्पन्न होईना, तर त्या श्रेष्ठ गुणांची थोरवी व योग्यता आपण बरोबर ओळखली नाहीं असें नाहीं का समजावयाचें ? याकरितां श्रेष्ठ गुणांची ओळख पटवून घेऊन अंतःकरणामध्यें त्यांबद्दल योग्य पूज्यभाव हळू हळू उत्पन्न केला पाहिजे. उत्तररामचरित नाटकामध्यें कवि भवभूति म्हणतोः—

> व्यतिषजति पदार्थान् आन्तरः कोऽपि हेतुः ।
> न खलु बहिरुपाधीन् प्रीतयः संश्रयन्ते ॥
> विकसति हि पतंगस्योदये पुंडरीकम् ।
> द्रवति च हिमरश्मा-वुद्गते चंद्रकांतः ॥ १

" पुंडरीक कमल सूर्योदय झाला म्हणजे उमलतें; व चंद्रकांत मणि चंद्रोदयामध्यें द्रवतो; त्याप्रमाणेंच दोन निरनिराळ्या वस्तूंमध्यें प्रेमसंबंध उत्पन्न होतात त्यांस कांहीं अंतस्थ ( अंतःकरणासंबंधी ) कारण असतें; हे प्रेमसंबंध वरवर दिसणाऱ्या बाह्य कारणांवर अवलंबून नसतात. " कवीची उक्ति बरोबर आहे; कारण आपल्या अंतःकरणामध्यें गुणतंतु असले तरच दुसऱ्याच्या गुणांबद्दल आश्चर्य वाटून ते आश्चर्याचे संस्कार त्या तंतूवर आघात करितात; व त्यायोगानें अंतःकरण हें मधुर अशा आनंदध्वनीनें व्याप्त होऊन त्याचा विकास होतो. सारांश, दुसऱ्याच्या श्रेष्ठ गुणांचें योग्य महत्त्व अजमावण्याइतकें मोठें अंतःकरण करून त्या गुणांबद्दल अंतःकरणामध्यें आदरबुद्धि उत्पन्न केली, तरच तें अंतःकरण अधिक उन्नत होतें.

दुसऱ्याच्या गुणांची योग्य ओळख पटून आदरबुद्धि वाढूं लागली म्हणजे शीलाची उन्नति होत जाते; कारण ज्या गुणांबद्दल पूज्यभाव उत्पन्न होतो ते गुण आपल्यामध्यें थोडेबहुत तरी उतरावेत अशी साहजिकच इच्छा उत्पन्न होऊन तदनुसार मनुष्य खटपट सुरू करतो, व या खटपटीमुळें शीलाची वाढ होण्यास मदत होते. प्रसिद्ध इंग्रज कवि जॉन मिल्टन याच्या " Paradise Lost " पॅरडाइज लॉस्ट या काव्यांतील सरस कविता व उदात्त विचार यांमुळें लॉर्ड मेकॉले साहेबास मिल्टनबद्दल फार आदर व कौतुक वाटे; तें इतकें कीं, त्यानें तें काव्य आपल्या हातानें आठ वेळां लिहून काढलें ! काय प्रचंड परिश्रम हे ! आपल्या अंगांत अंशतः तरी कवीचे गुण उतरावेत या बुद्धीनें मेकॉले साहेबानें केवढी मोठी खटपट केली बरें ? आदरबुद्धीमुळें अनुकरणेच्छा वाढली, त्यामुळेंच इतका मोठा उद्योग मेकॉले साहेबाचे हातून झाला ही गोष्ट अगदीं उघड आहे. प्रसिद्ध रामदास स्वामींबद्दल शिवाजी महाराजांना किती तरी पूज्यबुद्धि वाटत असे ! स्वामींचा निस्पृहपणा, वैराग्य वगैरे गुणांबद्दलच्या पूज्यबुद्धीमुळें महाराजांच्या नैतिकसंपत्तीमध्यें ' अधिकस्याधिकं फलं ' या न्यायानें अधिकच भर पडली असल्यास नवल तें कसलें !

वर सांगितल्याप्रमाणें गुणांबद्दलच्या आदरबुद्धीमुळें गुणानुकरणप्रवृत्ति उत्पन्न होऊन शीलाची उन्नति होत जाते हा प्रकार माणसांमाणसांसंबंधानें सांगितला; तोच न्याय मनुष्य आणि परमेश्वर यांच्यासंबंधानें लागू पडतो.

मनुष्यांमधील गुणांबद्दल आदरबुद्धि उत्पन्न होऊन जर शीलाची उन्नति होत जाते, तर परमेश्वराची अनंत शक्ति व त्याचे अ-

नंत गुण यांची आपण हळूहळू ओळख करून घेण्याचा प्रयत्न करूं, तर आपण किती तरी उन्नत होऊं बरें ?

परमेश्वर सर्वज्ञ, सर्वसाक्षी, सर्वशक्ति, षड्गुणैश्वर्यसंपन्न असा आहे. उत्कृष्ट धर्मग्रंथांमध्यें वर लिहिल्याप्रमाणें परमेश्वराच्या उदात्त स्वरूपाचें वर्णन केलें आहे. परमेश्वराच्या या गुणनिधीचें मनन करण्याचा आपण प्रयत्न करूं लागलों म्हणजे या उदात्त स्वरूपाची हळूहळू ओळख पटत जाऊन अंतःकरणामध्यें परमेश्वराविषयीं श्रेष्ठ आदरबुद्धि उत्पन्न नाहीं का होणार ? व या आदरबुद्धीमुळें परमेश्वरभक्तीनें अंतःकरण द्रवणार नाहीं काय ? भक्तिरसानें व पूज्यभावानें वर लिहिल्याप्रमाणें ओथंबलेलें अंतःकरण मग उन्नत झाल्याशिवाय कसें राहील ? परमेश्वराच्या गुणांचा अनंतपटीनें कमी असा अंश कां होईना, तो आपल्या अंगांत यावा अशी इच्छा भक्ति व पूज्यभाव यांच्यामुळें उत्पन्न होऊन, मनुष्य उन्नत होत जावा हें साहजिकच आहे. दया, क्षमा, शांति वगैरे सद्गुणांचें निधान जो परमेश्वर त्याच्या सद्गुणैश्वर्याची थोडीबहुत ओळख पटत चालली, आणि त्यामुळें उत्पन्न झालेल्या पूज्यभावामुळें अंतःकरण उचंबळूं लागलें, म्हणजे क्रौर्य, सूड घेण्याची बुद्धि, वगैरे दुर्गुणांचा अंतःकरणामध्यें प्रादुर्भाव कसा होईल ? परमेश्वराच्या अफाट व अमर्यादित गुणोदधीमध्यें बुचकळी मारणारें अंतःकरण नीरस व कोरडें ठणठणीत कसें राहील ? या सद्गुणांचें चिंतन करणारें अंतःकरण दुर्गुणांकडे कसें वळेल ?

तसेंच, परमेश्वराच्या अगाध सामर्थ्याची थोडीबहुत जाणीव उत्पन्न होऊन अंगांत पूज्यबुद्धि बाणत चालली म्हणजे आपल्या कमकुवतपणाबद्दलची आपणास बरोबर कल्पना येत जाते. परमेश्वर सर्वज्ञ, सर्वव्यापी, व सर्वसाक्षी आहे, तर माणूस अगदीं क्षुद्र व अडाणी असा प्राणी आहे.

सत्तेनें प्रभुच्याच सूर्य उगवे, त्याच्याचि सत्ताबळें ।
वारा वाहतसे नभीं, तरुलता देतात पुष्पेंफळें ॥
पाण्याचा करितात मेघ समयीं वर्षाव भूमीवरी ।
देते धान्यसमृद्धि भूमि, अवघी त्याचीच सत्ता खरी ॥ १

अथवा कालिदासानें म्हटल्याप्रमाणें:—

विषमप्यमृतं क्वचिद्भवेदमृतं वा विषमीश्वरेच्छया ॥

" ईश्वराच्या इच्छेनें केव्हां केव्हां विषाचें अमृत अथवा अमृताचें विष होऊं शकतें. " याप्रमाणें, कर्ता-करविता परमेश्वर असून सर्व सत्ता त्याचेच ताब्यांत आहे; व त्याची कर्तुम्, अकर्तुम्, अन्यथा कर्तुम, अशी शक्ति आहे; परंतु माणूस अति दुर्बळ असून निवळ निमित्तमात्र आहे. परमेश्वर सर्व ब्रह्मांडाला व्यापून राहिला आहे. व मनुष्य " दर्यामे खसखस " या न्यायानें अति अल्प असा प्राणी आहे ! याप्रमाणें परमेश्वराच्या अगाधत्वाची व तशीच मनुष्याच्या क्षुद्रपणाची योग्य जाणीव होऊं लागली म्हणजे अनंतामध्यें अणूचा लोप होऊन मनुष्यामधील अहंभावाचें प्राबल्य कमी कमी होत जातें ! " कूपमंडूक " या न्यायानें जोंपर्यंत आपली दृष्टि आपल्यापुरतीच आकुंचित असते, तोंपर्यंत अहंभाव दृढ असतो; परंतु परमेश्वराच्या अनंत सामर्थ्याचें मनुष्य निरीक्षण करूं लागला म्हणजे तो अहंभाव पार विरघळून जातो; दृष्टि फांकत जाते; आणि आपल्या अज्ञानाची प्रतीति आपल्यास अधिकाधिक पटत जाते. प्रसिद्ध सर ऐझॅक न्यूटन यानें गुरुत्वाकर्षणाचें तत्त्व शोधून काढिलें तेव्हां, हें तत्त्व म्हणजे अनंत ज्ञानापैकीं एक कण आपणास सांपडला, असें त्याला वाटलें ! तेव्हां सर्वत्र पसरलेल्या परमेश्वराच्या अफाट लीलांचें यथामति आपण निरीक्षण करूं लाग-

लों म्हणजे दृष्टि विस्तृत होऊन अंगांत विनय उत्पन्न व्हावा हें साहजिकच आहे.

परमेश्वराचें अफाट सामर्थ्य व त्याचे अनंत गुण यांबद्दलचा योग्य व व्यवस्थित विचार करण्याची संवय लावून घेतली तरच अंतःकरणावर सुसंस्कार घडत जातात. आपल्या सांसारिक गोष्टींमध्येंच माणूस विशेष दंग झाला असल्यामुळें, अखिल विश्वाच्या अवाढव्य संसाराचा चालक अशा परमेश्वराच्या निस्सीम श्रेष्ठत्वाची विचारपूर्वक कल्पना सहसा त्याचे मनांत येत नाहीं; व आलीच तर ती नीट मनांत ठसत नाहीं. परमेश्वराच्या श्रेष्ठत्वाची विचारपूर्वक कळकळीची व टिकाऊ अशी जाणीव होऊं लागली तरच अंतःकरण तन्मय व सद्गदित होऊन तें उन्नत होत जातें. काळोख्या रात्रीं आकाश निरभ्र असल्यावेळीं आकाशाकडे दृष्टि फेंकली असतां, विचारी माणसाच्या मनांत काय विचार येतात बरें ? असंख्य तारागणांचा जणूं काय सडाच शिंपडला आहे अशी कल्पना त्या तारांकडे पाहून येत नाहीं कांय ? या आश्चर्यकारक देखाव्याचा जसजसा विचार करावा, तसतसें मन अगदीं थक्क होऊन जातें ! ह्या तारा अगदीं लहान ठिपके असल्यासारख्या दिसतात तरी त्यांची स्थिति व गति किती नियमित व व्यवस्थित आहे बरें ? हा केवढा चमत्कार आहे ! रेल्वेचें टाइम-टेबल इतकें व्यवस्थित केलेलें असतें तरी सुद्धां गाड्यांची टक्कर किती तरी वेळां झालेली आपण ऐकतों ! व त्यापासून किती तरी नुकसान व प्राणहानि होत असते ! परंतु ब्रह्मांडनायक परमेश्वराचे टाइमटेबलांत असा कांहीं घोंटाळा कधीं तरी होतो काय ? या चमत्काराचा जों जों विचार करीत जावें तों तों विचाराची गति अगदीं कुंठित होऊन जाते, व सृष्टिनियंत्याच्या अगाध चातुर्याची व शक्तीची योग्य कल्पना येऊं लाग-

ते. शांत स्थळीं याप्रमाणें शांतपणानें विचार करीत गेल्यास, परमेश्वराच्या अगाधत्वाची कल्पना हळू हळू बिंबत जाऊन अंतःकरणामध्यें प्रकाश पडत जातो.

तसेंच, या प्राणिसृष्टींतील प्राण्यांची उत्पत्ति व वाढ यांबद्दल आपण नीट विचार करूं लागलों, म्हणजे आपलें अंतःकरण आश्चर्यानें भरून जातें ! प्रसिद्ध ग्रीक तत्त्ववेत्ता ॲरिस्टॉटल यानें मातेच्या पोटामध्यें असलेल्या गर्भाचीं निरनिराळीं स्थित्यंतरें कशीं होतात याबद्दल आश्चर्यकारक हकीकत दिली आहे. गर्भसंभव, त्या गर्भाचीं मातेच्या पोटामध्यें होणारीं स्थित्यंतरें, गर्भाचें पोषण, त्या गर्भपिंडामध्यें हस्तपादादि इंद्रियांची उत्पत्ति, अखेर त्याचें उदरांतून निष्क्रमण या सर्व गोष्टींचा नीट विचार केला म्हणजे कोणाचें मन थक्क होणार नाहीं ! ही परमेश्वरी योजना व व्यवस्था खरोखर अचिंत्य आहे ! व जसजसा आपण त्याबद्दल विचार करूं, तसतसें आश्चर्योदधीमध्यें निमग्न होऊन जाऊं. मानवी शरीररचना ही तरी किती आश्चर्यकारक आहे ! ती परमेश्वराच्या अगाध चातुर्याची साक्ष पटविणारी नाहीं काय ? आपलें आपल्याला समजत नाहीं म्हणतात तें हें शरीर होय ! या शरीरांतील यंत्रें व कार्यें पाहिलीं म्हणजे मन अगदीं चकित होऊन जातें ! ह्या यंत्राची रिपेरी करावी लागत नाहीं व त्यास घड्याळासारखी किल्लीही द्यावी लागत नाहीं ! इतकें असून या शरीराचे व्यापार किती व्यवस्थितपणानें व नियमितपणानें चालले आहेत बरें ? ही एकंदर व्यवस्था खरोखर अतर्क्य आहे ! शरीराच्या ह्या यांत्रिक योजनेचें ज्ञान झाल्यामुळें भरतखंडांतील अनीश्वर मताला फांटा मिळत चालला व परमेश्वराबद्दल पूज्यभाव उत्पन्न होऊन आस्तिक्यबुद्धि वाढूं लागली. याप्रमाणें, या विश्वामध्यें अनेक चमत्कार भरलेले आहेत

त्यांचें योग्य मनन केल्यास अंतःकरण श्रद्धाळू होऊन तें उन्नत व्हावें यांत काय आश्चर्य आहे ?

उत्कृष्ट धर्मग्रंथांत सांगितल्याप्रमाणें परमेश्वर सर्वज्ञ व सर्वसाक्षी आहे अशा प्रकारची भावना अंतःकरणामध्यें उत्पन्न झाली म्हणजे मनुष्य पापाचरण करण्यास प्रवृत्त होत नाहीं; कारण, सर्वज्ञ परमेश्वरापासून कोणतें दुष्कृत्य लपवितां येईल ? घरांतील वडील माणसांचा डोळा चुकवून लहान मुलें खोड्या करतील, परंतु, सर्वज्ञ परमेश्वराचा डोळा कोणालाही कसा चुकवितां येईल बरें ? अनीतीपासून मनुष्यास परावृत्त करण्यास ही भावना किती उपयोगी आहे बरें ?

परमेश्वरासंबंधानें मनुष्याचें अंतःकरण श्रद्धाळू झालें पाहिजे ही गोष्ट खरी, परंतु ही श्रद्धा शुद्ध व निर्दोष असली पाहिजे. ही ईश्वरविषयक श्रद्धा निर्लेप व शुद्ध असली तरच नीतिदृष्ट्या हितावह परिणाम होतील. परमेश्वर सर्वगुणसंपन्न आहे अशी दृढ व शुद्ध भावना अंतःकरणामध्यें बाणली व या भावनेनें प्रेरित होऊन आचरण होऊं लागलें म्हणजे नैतिक उन्नति निःसंशय होत जाईल; परंतु, परमेश्वर म्हणजे माणसाचें बरेंवाईट करणारी एक प्रचंड शक्ति आहे अशा स्वरूपाची परमेश्वराविषयीं भावना ठेवून, नानाप्रकारचे स्वार्थ साधण्याकरितां त्या शक्तीचा उपयोग करूं पाहण्याची इच्छा धरली, म्हणजे त्यापासून नैतिक ऱ्हास होत जातो. परमेश्वर केवळ सर्वशक्तिमान् नसून तो सद्‌गुणसंपन्न आहे; तेव्हां मनुष्याच्या दुष्कृत्याबद्दल त्याची सहानुभूति कधीं तरी असूं शकेल काय ? कोणत्याही बऱ्यावाईट कृत्याबद्दल त्याचें साहाय्य मिळेल अशी कल्पना करणें निवळ असमंजसपणाचें होईल! अशी कल्पना करणें म्हणजे परमेश्वराचा अक्षम्य अनादर होणार आहे. दुसऱ्यास त्रास देऊन आपला स्वार्थ साधण्यासाठीं परमेश्वरास आळवूं पाह-

ण्याची वेडगळ कल्पना केव्हां केव्हां दृष्टीस पडत नाहीं काय ? पूर्वी प्राण्यांस बळी देण्याचे प्रकार असत ते याच मासल्याचे होत. निरुपद्रवी प्राण्यांचा बळी घेऊन देव संतुष्ट होतो व बळी देणाऱ्या माणसाचें कल्याण करितो ही परमेश्वराविषयींची कल्पना निवळ स्वार्थी व आत्मघातकी नाहीं असें कोण म्हणेल? सागरांतील पाणी कधीं तरी आटून जाईल काय ? अथवा त्याला निर्दयपणा कधीं तरी सहन होईल काय ? असल्या क्रूर कृत्यांमुळें अनीतीची वाढच होत जाणार यांत बिलकुल संशय नाहीं. दुसऱ्यास त्रास देऊन आपलें कल्याण करून घ्यावें या हेतूनें वेडगळ कुलाचार व नवस वगैरे करण्याचा प्रघात कोठें कोठें दृष्टीस पडतो तो गर्हणीय आहे. असल्या कृत्यांनीं परमेश्वर खास संतुष्ट होणार नाहीं. ही परमेश्वराची निवळ विटंबना होय !

पवित्र धर्मपुस्तकांतील वचनांचा विपरीत व भलताच अर्थ करून परमेश्वरास आळविण्याची इच्छा करणाऱ्या लोकांचे मार्ग हे याच वेडगळ कोटींत येतात; या विपरीत समजुतींमुळें पूर्वीं कशीं रणें माजून राहिलीं होतीं हें इतिहासावरून दिसून येईल. “ तूं मुसलमान हो, नाहीं तर आह्मी तुझा जीव घेऊं” याप्रमाणें अवरंगजेब बादशहानें संभाजी राजास विचारतां, मी मुसलमान होणार नाहीं असें महाराजांनीं स्पष्ट उत्तर केलें, तेव्हां अवरंगजेबानें महाराजांचे हाल करून त्यांस अति निर्दयपणानें ठार केलें नाहीं काय ? या धर्मवेडाच्या लहरींत अवरंगजेबानें हिंदुलोकांचीं पवित्र देवळें व मूर्ति यांचा अत्यंत अविचारानें विध्वंस केला नाहीं काय ? व जिजियासारखा चीड उत्पन्न करणारा कर हिंदूंवर बसवून त्यांचीं मनें त्यानें प्रक्षुब्ध केलीं नाहींत काय ? कोण धर्मवेड हें ! या अशा धर्मवेडामुळेंच प्रजेचीं मनें बिथरून जाऊन मोंगलबादशाही लवकरच लयास गेली ! या अक्षम्य धर्मवेडामुळें युरोपांत काय थोडे तंटे

झाले आहेत ? ट्यूटर व स्टुअर्ट या राजांच्या कारकीर्दींमध्यें तर या धर्मवेडाचा अगदीं कळस होऊन गेला ! एका राजानें प्राटेस्टंट लोकांचा छळ करावा, तर दुसऱ्यानें क्याथॉलिक लोकांना सळो का पळो करावें; असा अत्यंत अनन्वित प्रकार सुरू झाला ! सहाव्या एडवर्डच्या कारकीर्दींत क्याथॉलिक लोकांचा छळ झाला; तर पुढें मेरीच्या कारकीर्दींमध्यें प्रॉटेस्टंट लोकांची अति निर्दयपणानें कत्तल झाली ! रिडले आणि लॅटिमर हे प्रॉटेस्टंट बिशप होते त्यांना तर जिवंत जाळलें ! ! त्यांना खांबाला डांबून खांबास आग लावून दिली ! ! कोण घोर कृत्य हें ! धर्माच्या बाबतींत असा अनन्वित छळ करणें म्हणजे मनुष्यत्वास खरोखर काळिमा आणणारी गोष्ट नाहीं काय ? प्रॉटेस्टंट पंथाहून थोडासा निराळा असा प्यूरिटन पंथ होता; या पंथाच्या लोकांवर तर इतका असह्य जुलूम झाला कीं, अखेर त्या लोकांनीं देशत्याग केला व अमेरिकेची वाट धरिली ! ! असो. याप्रमाणें परमेश्वराविषयीं शुद्ध प्रेम उत्पन्न न होतां, ज्या मनोवृत्तीमुळें परस्परांमध्यें तंटे व द्वेष उत्पन्न होऊन लोक एकमेकांचा जीव घेऊं पाहतात, त्या राक्षसी मनोवृत्तीस शुद्ध, निर्लेप व निर्दोष श्रद्धा म्हणतां येईल काय ? ही श्रद्धा नसून अक्षम्य धर्मवेड आहे ! धर्माच्या नांवाखालीं कोण अधर्म हा ! कोणत्या धर्मपुस्तकामध्यें दुसऱ्याचा छळ करावा म्हणून सांगितलें आहे ? असल्या कृत्यांमुळें धर्माची निवळ थट्टा होऊन जाते !

परमेश्वर सर्व सद्‌गुणांचें निधान असल्यामुळें तो आपल्या दुष्कृत्यास कधींही मदत करणार नाहीं; परंतु आपण सत्कृत्य करण्यास आरंभ केला तर तें सत्कृत्य परमेश्वराच्या कृपेनें खात्रीनें सिद्धीस जाईल अशी भावना मनांत बाणली पाहिजे. या भावनेमुळें अंगांत उत्साह, धैर्य वगैरे सद्‌गुणांची अभिवृद्धि होऊन अंतःकरणवृत्ति

उन्नत होतात. जे स्वतःची उन्नति करण्याचा प्रयत्न करतात त्यांना परमेश्वर मदत करितो अशा अर्थाची इंग्रजींत म्हण आहे ती यथार्थ आहे. सत्कृत्यामुळें अंतःकरणांतील सद्वृत्ति जागृत होतात व सत्कृत्यास परमेश्वराचा पाठिंबा असतो ही भावना त्या जागृत झालेल्या सद्वृत्तींचा अधिकच उठाव करते, व त्यामुळें नैतिक उन्नति होत जाते. मोठमोठे कार्यकर्ते पुरुष या भावनेनें प्रेरित होऊनच सत्कृत्यें करीत असतात. प्रत्येक महत्त्वाचे कार्यास आरंभ करण्यापूर्वी शिवाजी महाराज आई भवानीचें दर्शन घेऊन जात असत ही गोष्ट ध्यानांत ठेवण्यासारखी आहे. अगोदरच सत्कार्याचा उपक्रम, त्यांत महाराजांसारखा सामर्थ्यसंपन्न व सद्गुणसंपन्न श्रेष्ठ पुरुष, त्यांत पुन्हा परमेश्वरविषयक अलोट श्रद्धा, या तीन गोष्टींचा मिलाफ झाल्यावर, सत्कार्य सिद्धीस जावें यांत काय आश्चर्य आहे ? कर्तव्याला श्रद्धेची जोड असेल तर कर्तव्य निश्चितपणें सिद्धीस जाऊन कर्त्याचें नैतिकसामर्थ्य फार झपाट्यानें वाढत जातें. शिवाजी महाराज व अफझुलखान यांच्या भेटीचे वेळची हकीकत रा० रा० कृ० अ० केळूसकर यांनीं महाराजांचे चरित्रांत सांगितली आहे ती या संबंधांत बोधपर आहे. ती अशीः—“ इकडे महाराजांनीं पूर्वोक्त प्रकारें सगळा कडेकोट बंदोबस्त केल्यावर स्नान, देवपूजा आदिकरून नित्यविधि उरकले. नंतर त्यांनीं भवानीचें स्मरण केलें, व हा आणीबाणीचा व केवळ जिवावरचा प्रसंग पार पाडण्याविषयीं तिची मनोभावें प्रार्थना केली, ती इतकी सोत्कंठ होऊन केली कीं, भवानी त्यांचे अंगांत संचरून येणेंप्रमाणें बोलली: ‘ अरे मुला, चिंता करूं नको. यासमयीं तुझ्या पाठीवर मी उभी आहें. ’ जवळच्या कारभाऱ्यांनीं देवीचे हे शब्द टिपून ठेविले; व अंगांतलें वारें जाऊन ते सावध झाले तेव्हां त्यांस तें निवेदन केलें. तें ऐकून त्यांस अधिकच हुरूप आला. ” सत्कार्याला श्रद्धेची जोड मिळाल्यावर

अंगांत हुरूप चढून तें कार्य यशस्वी व्हावें यांत नवल तें कसलें? ईश्वरविषयक उत्कट श्रद्धेचा प्रभावच तसा आहे. यासाठींच भगवान् गीतेमध्यें म्हणतात,

मयि सर्वाणि कर्माणि सन्यस्याध्यात्मचेतसा ॥

( युद्धयस्व )

" सर्व कर्मे माझ्या ठायीं अध्यात्मबुद्धीनें अर्पण करून ( युद्ध कर. ) " हें वचन अगदीं अर्थपूर्ण आहे. सर्व कर्मे भगवंताचे चरणीं अर्पण करण्याच्या बुद्धीनें केलीं तर अंतःकरणांतील सद्वृत्तींचा विकास होऊन मनुष्य निःसंशय उन्नत होत जाईल.

अंतःकरण श्रद्धायुक्त करून, निष्कामबुद्धीनें सत्कृत्य करीत गेल्यास शीलाची उन्नति होत जाते असें या गीताप्रणित भागवत धर्माचें रहस्य आहे. या धर्मामध्यें उत्कृष्ट नीतितत्त्वांचा मोक्षधर्माशीं उत्कृष्ट मिलाफ साधला आहे. त्याचप्रमाणें, ख्रिस्ती धर्म, मुसलमानी धर्म, झोरोॲस्ट्रिअन धर्म, बौद्ध धर्म वगैरे जगांतील उत्कृष्ट धर्मपंथांनीं नीतितत्त्वांचें उत्कृष्ट प्रतिपादन करून सर्वांना नीतीनें वागण्याविषयीं उपदेश केला आहे. धर्म या शब्दामध्यें मूळ धातु ' धृ ' ' धारण करणें ' हा आहे; तेव्हां ज्या हितकर बन्धनांच्या योगानें समाजाचें धारण होऊन त्याचें कल्याण होतें अशा बन्धनांचा अंतर्भाव धर्मामध्यें होतो; ज्या वागणुकीमुळें समाज विस्कळीत न होतां, त्याचें योग्य रक्षण होऊन, त्याची उन्नति होत जाते अशा न्याय्य आचरणाचा धर्मामध्यें विचार केलेला असल्यामुळें, कोणत्याही उत्कृष्ट धर्मामध्यें नीतिसिद्धांतांचें यथास्थित विवेचन केलेलें असतें. शिवाय, या सिद्धांतांचें आविष्करण व त्यांचा पुरस्कार साधुसंतांनीं केला असल्यामुळें, सामान्य जनतेची धर्मावर

साहजिकच दृढ श्रद्धा बसलेली असते; यासाठीं धर्माचा प्रसार करण्याची खटपट झाल्यास, त्याच्या पावित्र्यामुळें व त्यावरील दृढ श्रद्धेमुळें, नीतिमत्तेची सर्वत्र अभिवृद्धि होण्यास बिलकूल विलंब लागणार नाहीं. अंतःकरणामध्यें श्रद्धेची ज्योत उत्पन्न झाल्यावर तिच्या प्रकाशामुळें अंतःकरण निर्मळ होऊन तें उन्नत व्हावें यांत काय आश्चर्य आहे ?

# प्रकरण ९ वें
# समाजनिर्बंध

श्रेष्ठ माणसाविषयीं पूज्यभाव उत्पन्न झाला व परमेश्वराविषयीं अंतःकरणामध्यें उत्कट श्रद्धा बाणली म्हणजे अंतःकरणामधील सद्वृत्ति बळावत जाऊन मनुष्य उन्नत होतो असें मागील प्रकरणांत सांगितलें आहे. आतां नीतिमत्तेवर समाज व समाजनिर्बंध यांचा सामान्यतः काय परिणाम होतो याविषयीं विवेचन करावयाचें आहे.

पहिल्या प्रकरणामध्यें सांगितलेंच आहे कीं, मनुष्य हा समाजांत राहणारा प्राणी आहे. मनुष्येतर प्राण्यांमध्येंसुद्धां संगतींत राहण्याची प्रवृत्ति दिसून येते; परंतु त्यांचेमध्यें बुद्धिसामर्थ्य नसल्यामुळें त्यांची समाजघटना विशेष गुंतागुंतीची नाहीं. बुद्धिसामर्थ्य नसल्यामुळें त्यांचा आयुष्यक्रम अगदीं साधा असून, सुखाचीं साधनें नवीन नवीन उत्पन्न करून, आयुष्यक्रम विशेष सुखकर करण्याचें सामर्थ्य त्यांच्यामध्यें नाहीं; परंतु मनुष्याचें बुद्धिसामर्थ्य विशेष असल्यामुळें, नवीन सुखसाधनें उत्पन्न करून आयुष्यक्रम अधिक सुखकर करण्याची खटपट तो करीत असतो; आणि नवीन सुखसाधनें उत्पन्न करून आयुष्यक्रम सुखकर करण्यासाठीं समाजांत राहणें अत्यंत जरूर व सोयीचें असल्यामुळें, समाज बनवून त्यामध्यें मनुष्य राहूं लागला. याप्रमाणें समाजामध्यें राहण्याच्या स्वाभाविक प्रवृत्तीमुळें व त्यापासून होणाऱ्या सुखसोयींमुळें जगांत निरनिराळे समाज बनले.

आपल्यासारखेंच दुसऱ्यास सुखदुःख होतें ही जाणीव मनुष्या-

मध्यें असल्यामुळें, नीतिशास्त्रांतील सामान्य सिद्धांतांची ओळख हळूहळू त्यास पटत चालली व समाजांतील श्रेष्ठ व बुद्धिमान् पुरुषांनीं आपल्या उपदेशानें व कृतीनें या नीतिसिद्धांतांची योग्य व स्पष्ट कल्पना आणून दिल्यामुळें, समाज हळूहळू उन्नत होत गेला. या सामान्य सिद्धांतांची स्पष्ट जाणीव प्रत्येक सुव्यवस्थित समाजामध्यें हल्लीं झालेली आहे. दुसऱ्याच्या द्रव्याचा अपहार करणें ही गोष्ट निंद्य नाहीं असें आतां कोणी तरी म्हणेल काय ? आपल्या क्षुद्र स्वार्थाकरतां दुसऱ्यास पीडा देणें ही नीतिदृष्ट्या योग्य गोष्ट आहे असें कोण कबूल करील बरें ? आपल्या भुकेचें शमन करण्यासाठीं दुसऱ्या माणसाचा जीव घेण्याचें कृत्य गर्हणीय नाहीं असें हल्लीं कोणास वाटेल ? आफ्रिकेंतील अडाणी कॅनिबल लोकांनीं प्रवासी मंगोपार्क याची दुर्दशा करून त्याचा जीव घेतला व त्याच्या मांसावर गिधाडांसारखा यथास्थित ताव मारला ही गोष्ट ऐकल्याबरोबर आपल्या अंगावर शहारे येत नाहींत काय ? मत्सरबुद्धि त्याज्य आहे असें कोणता सुज्ञ मनुष्य म्हणणार नाहीं ? धैर्य, विनय, क्षमा, परोपकार वगैरे गुण हे सद्गुण आहेत असेंच कोणीही म्हणेल. सारांश, नीतिदृष्ट्या बऱ्यावाईट गोष्टी कोणत्या आहेत यांबद्दल समाजामध्यें निश्चित कल्पना प्रचलित असतात व त्यामुळें समाजामध्यें एकप्रकारचें नैतिक वातावरण उत्पन्न होतें व त्यामध्येंच राहून प्रत्येक मनुष्य आपल्या नैतिक जीवितांचें धारण व रक्षण करीत असतो.

समाजांतील नैतिक वातावरणामध्यें प्रत्येक मनुष्य वाढत असल्यामुळें प्रचलित नैतिक कल्पनांचा ठसा प्रत्येक मनुष्याच्या हृत्पटलावर उमटला असतो; या नैतिक कल्पना प्रत्येक मनुष्याचे मनामध्यें प्रतिबिंबित होतात. हा सर्वसाधारण अमूल्य ठेवा असून, या अमूल्य ठेव्याचा फायदा सर्वांसच होत असतो. याप्रमाणें, समा-

जामध्यें नैतिक कल्पना प्रचलित असल्यामुळें; बरेवाईट कृत्याची परीक्षा समाजाकडून बिनचूक होते; व सत्कृत्याबद्दल पसंती व दुष्कृत्याबद्दल नापसंती समाज हा नेहमीं दाखवीत असतो. यासाठींच श्रीसमर्थ रामदास स्वामी म्हणतात,

जनीं निंद्य तें सर्व सोडोनि द्यावें ।
जनीं वंद्य तें सर्व भावें करावें ॥

" समाजामध्यें जें कृत्य निंद्य मानिलें जातें तें करूं नये; व जें योग्य आहे असें मानिलें जातें तें कृत्य अंतःकरणपूर्वक करीत असावें. " ही उक्ति यथार्थ आहे. समाजामध्यें ज्या गोष्टी वाईट अशा ठरल्या जातात त्या त्याज्यच होत; व ज्या वंद्य समजल्या जातात त्या ग्राह्य होत.

वर लिहिल्याप्रमाणें समाजाची सत्कृत्याबद्दल पसंती व दुष्कृत्याबद्दल नापसंती असल्यामुळें, मनुष्याच्या शीलावर समाजाचा फारच हितावह परिणाम होत असतो. प्रत्येक मनुष्य हा समाजाचा एक घटकावयव असल्यामुळें, लोक काय म्हणतील इकडे लक्ष देणें त्यास जरूर असतें; व लोक नांवें ठेवितील या भीतीमुळें, मनुष्य अनीतीचें वर्तन करण्यास सहसा धजत नाहीं. लोकापवादाच्या भीतीमुळें आपली वर्तणूक चोख ठेवण्याची खटपट बहुधा प्रत्येक मनुष्य करीत असतो. मनुष्य हा एकटा फटिंग नसून समाजाशीं त्याचा अत्यंत निकट संबंध आहे; व त्याचा आयुष्यक्रम सुखावह होण्यास हरएक बाबतींत तो समाजाच्या मदतीवर अवलंबून असतो; यासाठीं समाजाची नापसंती होईल अशी वागणूक करण्याची सहसा त्याची छाती होत नाहीं. याप्रमाणें अनीतीपासून परावृत्त करून नीतिमत्तेचें रक्षण करण्याचें उत्कृष्ट कार्य समाज आपल्या जरबेनें फार नेटानें करीत असतो. सामान्यतः लोकापवादाच्य

भीतीमुळें मनुष्य आपल्या अब्रूचें रक्षण करण्याविषयीं फार जपत असतो. केव्हां केव्हां मरणाचे आपत्तीपेक्षां दुष्कीर्ति दुःसह आहे अशा प्रकारचे विचार सामान्य माणसाचे मनामध्यें येत नाहींत काय ?

" न भीतो मरणादस्मि । केवलं दूषितं यशः ॥ "

" मरणाची भीति मला नाहीं; फक्त अब्रू खराब झाली आहे " असें मृच्छकटिक नाटकामध्यें चारुदत्त म्हणतो तें यथार्थ आहे. भगवान् गीतेमध्यें अर्जुनास म्हणतातः—

" संभावितस्य चाकीर्तिर्मरणादति रिच्यते ॥ "

" दुष्कीर्ति म्हटली म्हणजे संभावित पुरुषाला मरणापेक्षांही मरण होय. " खरोखर लोकापवादाचा वचक मनावर फार मोठा असतो. त्याचप्रमाणें, लोकांनीं आपल्यास चांगलें म्हणावें अशी इच्छाही सामान्यतः प्रत्येक मनुष्यास असते; व आपला लौकिक वाढावा अशी इच्छा असल्यामुळें, तो वाढविण्याकरितां मनुष्य नेहमीं खटपट करीत असतो. सारांश, लोकनिंदेच्या भीतीमुळें मनुष्य अनीतीच्या कृत्यापासून परावृत्त होत असतो व लौकिकाच्या चाडीमुळें तो सत्कृत्य करण्यास प्रवृत्त होतो; याप्रमाणें समाजनीतीचा मनुष्याचे वर्तनावर दुहेरी परिणाम होत असतो.

वर लिहिल्याप्रमाणें सामान्य जनांवर समाजनीतीचा दुहेरी परिणाम होत असतो ही गोष्ट खरी; परंतु दुर्जनांवर या समाजनीतीचा काय परिणाम होणार आहे ? आपला लौकिक वाढावा अशी त्यांना इच्छा कोठून असणार ? लौकिकाची चाड नसल्यामुळें, ते लोकापवादास बिलकुल भीक घालीत नाहींत; व अनीतीचा अवलंब करण्यास दिवसानुदिवस ते जास्तच उद्युक्त होतात. ज्याला जनलज्जा नाहीं त्याला मनलज्जा कोठून असणार ? तथापि दुर्जनांवर सुद्धां समाजाचा थोडाबहुत तरी वचक असतोच; व त्यामुळें सा-

मान्य माणसांचा आयुष्यक्रम सुखकर होतो. चोरानें एकाद्या माणसाला लुबाडण्याचें मनांत आणिलें तरी त्याला आपला हेतु साध्य करून घेण्यासाठीं किती तरी सावधगिरी ठेवावी लागते ! कोणी पाहील काय, कोणी धरील काय, अशी भीति सदैव त्याचे मनांत वाटत नाहीं काय ? समाजाचा याप्रमाणें वचक नसता तर जगांत किती तरी अन्याय झाले असते ! मनुष्याच्या अनीतिप्रवर्तक प्रकृतिधर्माला योग्य आळा घालण्याचें काम समाज फार जोरानें करीत असतो; म्हणून जगांतील बरेचसे अन्याय टळतात.

समाजाचा सामान्य जनतेवर दाब असल्यामुळें, नीतिमत्तेचें रक्षण करण्याचें महत्त्वाचें काम समाज करीत असतो ही गोष्ट खरी; परंतु हें काम समाजाच्या दडपणामुळें आपोआपच होत असतें. त्यासाठीं विशेष खटपट करावी लागत नाहीं; परंतु याशिवाय सार्वत्रिक नीतिमत्तेची अभिवृद्धि करण्यासाठीं समाजास पुष्कळ महत्त्वाच्या गोष्टी करावयाच्या असतात. समाजाची संघटितशक्ति फार मोठी असते; व या शक्तीचा योग्य विनियोग करून सार्वत्रिक नीतिमत्तेची अभिवृद्धि समाजानेंच करावयाची असते. तेव्हां ही अभिवृद्धि करण्यासाठीं समाजानें मुख्यत्वेंकरून कोणत्या उपायांची योजना करणें जरूर आहे याबद्दल आतां विचार करूं.

सार्वत्रिक नीतिमत्तेची अभिवृद्धि करण्याचा मुख्य उपाय म्हणजे शिक्षण होय. शारीरिक शिक्षण, बौद्धिक शिक्षण व नैतिक शिक्षण असे शिक्षणाचे तीन प्रकार आहेत असें मागें शिक्षण प्रकरणांत सांगितलेंच आहे. शिक्षणाच्या योगानें शरीर, मेंदू व अंतःकरण या सर्वांची उन्नति झाली पाहिजे. शरीर मजबूत व मेंदू तरतरीत राहून अंतःकरणवृत्ति उन्नत होत जातील अशा प्रकारची शिक्षणपद्धति समाजामध्यें सुरू होऊन, तिचा सार्वत्रिक फैलाव होईल अशी तजवीज व्हावयास पाहिजे. शिक्षणाची व्यवस्था नीट ठेवणें

हें काम एकट्यादुकट्याचें नाहीं; या कामास समाजाची मदत पाहिजे. उत्तम प्रकारचें शिक्षण देऊन समाजांतील नैतिक वातावरण शुद्ध केलें पाहिजे. नैतिक शिक्षणाच्या अनास्थेमुळें समाजांतील नीतिमत्तेचा ऱ्हास होऊन तो समाज झपाट्यानें खालावत जातो.

प्रत्येक नागरिक हा समाजाचा घटकावयव आहे; व समाजाचा एक घटकावयव या नात्यानें नागरिकाचें कर्तव्यही फार जबाबदारीचें आहे. व्यक्तीचे हितापेक्षां समाजाचें हित साधणें हें अधिक श्रेयस्कर आहे अशी प्रत्येक नागरिकाची दृढ समजूत शिक्षणाच्या योगानें झाली पाहिजे. व्यक्तीचें हित साधणें हें अधिक श्रेयस्कर आहे, अशा समजुतीनें नागरिक वागूं लागले तर समाज खालावत जाऊन अखेर समाज व व्यक्ति या दोहोंचेंही नुकसान होईल. 'पोट आणि अवयव' ही कल्पित गोष्ट महशूरच आहे. एकदां हातपाय इत्यादि अवयव पोटावर रुसले व म्हणूं लागले कीं, आम्ही मोठे श्रम करून मिळवावें आणि या पोटानें रिकामें बसून खावें, हें रास्त नाहीं. हात म्हणाले इतःपर पोटाकरितां आह्मी कोणत्याही कामास बोट लावणार नाहीं. पाय म्हणाले, ह्या पोटाचें ओझें आजपर्यंत आह्मी वाहात आलों, तें आतां वाहणार नाहीं. हें त्यांचें बोलणें ऐकून पोट म्हणालें, बाबांनों, तुम्ही असें वेडेपण करूं नका. जें करणें तें विचारपूर्वक करा. तुम्ही मला जें काय आणून देतां तें मीच मात्र भोगितों असें नाहीं, तर तुमच्या सर्वांच्या पोषणासाठीं मी जिकडे तिकडे तें वांटून देतों. अशी त्यानें त्यांची पुष्कळ समजूत केली पण ती फुकट गेली. शेवटीं अवयवांकडून पोटास कांहीं मिळेनासें झाल्यामुळें, पोट अगदीं शुष्क होऊन शरीराचा अस्थिपंजर मात्र उरला. पोटाकडून अवयवांचें पोषण न झाल्यामुळें, तेही अशक्त झाले. शेवटीं शरीर क्षीण होत जाऊन नाश पावलें—( मराठी क्रमिक चौथें पुस्तक ). वरील गोष्टींत लिहिल्याप्र-

माणें पोटाची आवळ सुरू झाली तेव्हां हस्तपादादि इंद्रियें दुर्बळ होत चाललीं; त्याचप्रमाणें समाजाचे कल्याणाकडे दुर्लक्ष झालें म्हणजे त्यांतील घटकावयवांचा नाश व्हावा हें निःसंशय आहे. यासाठीं समाजाच्या कल्याणाची अभिवृद्धि करण्याकडे नागरिकांच्या अंतःकरणाची प्रवृत्ति होईल अशा प्रकारचें नीतिशिक्षण त्यांना मिळावयास पाहिजे. स्वतःचें हित साधण्याविषयीं प्रयत्न करूं नये असें नाहीं, परंतु वैयक्तिक व कौटुंबिक हित हें समाजाच्या हितापेक्षां कमी दर्जाचें आहे व समाजाच्या हितामध्यें वैयक्तिक व कौटुंबिक हिताचा अंतर्भाव होतो, अशी नागरिकांची समजूत शिक्षणाच्या योगानें पटविली पाहिजे. समाज खालावत चालला म्हणजे व्यक्तीचा व कुटुंबाचा योगक्षेम बरोबर चालत नाहीं.

शिक्षणाची योग्य तजवीज झाली म्हणजे मिळालेल्या शिक्षणाच्या योगानें मनुष्य उत्कृष्ट नागरिक होतो, व समाजांतील जबाबदारीचीं कामें करण्यास तो लायक होतो; आणि हीं जबाबदारीचीं कामें नागरिकांकडून करून घेण्याची योग्य तजवीज झाली म्हणजे या श्रेष्ठ कर्तव्यामुळें त्याच्या अंतःकरणवृत्ति उन्नत होऊन सर्व समाजाचें कल्याण होईल.

नागरिकांच्या नीतिमत्तेचा ऱ्हास न होतां त्यांच्या नीतिमत्तेचें रक्षण व्हावें, यासाठीं समाजाची सांपत्तिक स्थिति चांगली राहील अशी तजवीज होणें अत्यंत जरूर आहे. संपत्ति ही साध्य नसून ती साधन आहे असें पहिल्या प्रकरणामध्यें सांगितलेंच आहे; परंतु मनुष्याचा योगक्षेम व्यवस्थित रीतीनें चालावा यासाठीं संपत्तीची नेहमीं जरूर आहे. सांपत्तिक स्थिति खालावत चालली म्हणजे योगक्षेम नीट चालेनासा होतो; व योगक्षेम नीट चालेनासा झाला म्हणजे ' बुभुक्षितः किं न करोति पापम् ' या वचनाप्रमाणें सामान्यतः सद्गुणांचाही ऱ्हास होत जातो; माणसांमाणसांमध्यें परस्पर फसवा-

फसवीचा व लबाडीचा प्रकार हळू हळू सुरू होऊन अंतःकरणांतील सद्वृत्ति पार लोपून जातात ! देशाच्या सांपत्तिक स्थितीचा याप्रमाणें मनुष्याच्या नीतिमत्तेशीं संबंध असल्यामुळें, अर्थशास्त्रानें ठरविलेल्या सामान्य सिद्धांतांची नीट ओळख पटून त्यांची योग्य अंमलबजावणी झाली तर देशाची संपत्ति कायम राहील व त्यामुळें नागरिकांच्या नीतिमत्तेचा ऱ्हास होणार नाहीं; परंतु समाज जसजसा दरिद्री होत जाईल तसतशी नीतिदृष्ट्या त्याची हानि होत जाईल ! यावरून संपत्तीची वाढ होत चालली म्हणजे त्याबरोबर सार्वत्रिक नीतिमत्तेची वाढ होत जाईल असें अनुमान करणें चुकीचें होईल; परंतु, शरीरामध्यें रक्ताचा योग्य पुरवठा नसला म्हणजे शरीर क्षीण होत जातें, त्याप्रमाणेंच, समाजामध्यें संपत्तीचा भरपूर पुरवठा नसेल तर मात्र त्या समाजाचा नैतिक ऱ्हास होत जाईल !

नागरिकांच्या नीतिमत्तेचा ऱ्हास न होतां त्यांच्या नीतिमत्तेचें रक्षण व्हावें, यासाठीं समाजांतर्गत कारभारामध्यें उत्तम शिस्त, उत्कृष्ट व्यवस्था व योग्य निर्बंध असणें ही अत्यंत आवश्यक गोष्ट आहे, व याप्रकारची शिस्त, व्यवस्था व निर्बंध प्रत्येक सुव्यवस्थित समाजामध्यें असतातही. समाजांतील कारभार व्यवस्थित नसला तर मानवी प्रकृतीमधील क्षुद्र प्रकृतिधर्मांचा उठाव होण्यास वाव सांपडतो, व या मिळालेल्या सवलतीमुळें या क्षुद्र प्रकृतिधर्मांचा वरचेवर उठाव होत गेला म्हणजे मनुष्याची नीतिमत्ता बिघडते; यासाठीं समाजान्तर्गत हरएक महत्त्वाच्या बाबीमध्यें योग्य व हितकर निर्बंध घालून दिले व त्या निर्बंधांचें योग्य परिपालन होत गेलें म्हणजे नीतिदृष्ट्या फार हितावह परिणाम होतो. शिवाजीमहाराजांनीं महाराष्ट्रामध्यें राज्यस्थापना केली तेव्हां सर्व कारभार व्यवस्थित व सुरळीत चालावा म्हणून राज्यांतील महत्त्वाच्या बाबींची त्यांनीं योग्य व हितकर विभागणी करून त्या बाबी निरनिरा-

ऱ्या अंमलदारांकडे सोंपविल्या होत्या, व या ‘ अष्टप्रधानी ’ राज्यव्यवस्थेमुळें बरेच दिवसपर्यंत राष्ट्रांतलि कारभार उत्तम प्रकारें चालत होता; व महाराजांनीं घालून दिलेल्या शिस्तीप्रमाणें व निर्बंधांप्रमाणें कारभार चालला असता तर पेशवाईमध्यें जो पुढें घोंटाळा माजला तो माजला नसता; कारण या हितकर निर्बंधांचा अनादर व अतिक्रमण झाल्यामुळें राज्यव्यवस्थेचें विस्तृत व उदार स्वरूप जाऊन तिचें स्वरूप फार संकुचित होऊन गेलें. वर लिहिल्याप्रमाणें हकीकत महाराष्ट्रांतील प्रसिद्ध इतिहासकार कै० न्यायमूर्ति रानडे यांनीं आपल्या इतिहासांत दिली आहे.

समाजामध्यें नागरिकांच्या शिक्षणाची योग्य तजवीज झाली; व समाजाची सांपत्तिक स्थिति सुधारत जाऊन समाजान्तर्गत हरएक बाबींमध्यें शिस्त व व्यवस्था सुरू झाली; तथापि, गांव तेथें म्हारवडा असावयाचा, या न्यायानें दुर्जन हे समाजामध्यें असावयाचे हें निश्चित आहे. मानवी प्रकृतीमधील तामसवृत्तींचा उठाव झाल्यामुळें दुष्कृत्य करण्याची प्रवृत्ति कांहीं माणसांमध्यें उत्पन्न व्हावी हें साहजिक आहे. आपल्या स्वार्थबुद्धीला वाव देऊन समाजाची शांति व सुरक्षितपणा नष्ट करून टाकणारे नीतिभ्रष्ट लोक हे समाजामध्यें थोडेबहुत असणार हें उघड आहे; यासाठीं असल्या लोकांच्या मनावर चांगला वचक बसून त्यांना अनीतीच्या मार्गापासून परावृत्त करण्याकरितां सक्त व कडक निर्बंधांची योजना होऊन, त्यांची योग्य अंमलबजावणी व्हावयास पाहिजे. याप्रमाणें प्रत्येक सुव्यवस्थित समाजामध्यें असे निर्बंध आहेतही. अपराध केल्यास शिक्षा मिळते अशा प्रकारचा धाक कुमार्गगामी माणसास वाटला म्हणजे त्याच्या पापबुद्धीला थोडाबहुत तरी आळा बसण्याचा संभव आहे.

सारांश, ‘ मन्मनदरींत न शिरे कोप-मतंगज विवेक-हरि जागे ॥ ’

या कविश्रेष्ठ मोरोपंतांच्या उक्तीप्रमाणें, अनीतीच्या वर्तनावर समाजाचा कडक पाहारा असल्यामुळें नागरिकांची नीति न बिघडतां तिचें रक्षण होण्यास समाजाची फार मोठी मदत होत असते; याशिवाय समाजांतील नागरिकांना योग्य शिक्षण देऊन त्यांच्या नीतिमत्तेची अभिवृद्धि करावयाची, व समाजामध्यें शिस्त व व्यवस्था ठेवून व कडक निर्बंधांची योजना करून नागरिकांच्या नीतिमत्तेचें रक्षण करावयाचें, असें हें महत्त्वाचें काम समाजाकडून योग्यरीतीनें बजावलें गेलें म्हणजे नागरिकांची व सर्व समाजाची नैतिक उन्नति निःसंशय होईल.

# प्रकरण १० वें

## कांहीं शंकांचा खुलासा

नीतिमत्तेशीं मुख्यत्वेंकरून ज्या ज्या गोष्टींचा संबंध येतो त्या त्या गोष्टींबद्दल मागील प्रकरणांमध्यें विवेचन केलें आहे. त्या विवेचनामधील कांहीं शंकांचा खुलासा करणें जरूर वाटल्यावरून त्यांसंबंधानें या प्रकरणामध्यें विचार करावयाचें योजिलें आहे. कोणत्याही विषयाचें व्यवस्थित विवेचन करावयाचें म्हणजे त्यासंबंधानें ज्या शंका उत्पन्न होण्याचा संभव आहे त्यांचाही थोडाबहुत विचार करावा लागतो. कोणत्याही विषयाचें रहस्य त्यासंबंधानें उत्पन्न होणाऱ्या आक्षेपांचें निरसन झाल्याशिवाय मनास नीट पटत नाहीं. असो.

शंका पहिली:—केव्हां अशी शंका घेण्यांत येते कीं, नीतीची वागणूक कोणती व अनीतीची वागणूक कोणती यासंबंधानें ठाम व निश्चयात्मक सिद्धांत ठरवितां येत नाहींत; एका कालांत जी वागणूक नीतिदृष्ट्या बरी वाटते तीच दुसऱ्या कालांत बरी अशी ठरत नाहीं; एका समाजामध्यें जी वागणूक नीतिदृष्ट्या बरी ठरते तीच दुसऱ्या समाजाच्या दृष्टीनें बरी ठरतेच असा नियम नाहीं; किंबहुना, तोच समाज जसजसा सुधारत जाईल तसतशा त्याच्या नैतिक कल्पनाही हळू हळू बदलत जातात; सारांश, नीतिविषयक सिद्धांत अनिश्चित असल्यामुळें, त्यांच्याबद्दल विशेष विचार करण्यांत फारसा अर्थ नाहीं. या शंकेचें उत्तर पहिल्या व नवव्या प्रकरणामध्यें थोडक्यांत देण्यांत आलेंच आहे. सर्व सुसंस्कृत समाजांमध्यें नीतिमत्तेसंबंधानें सामान्य सिद्धांत हल्लीं ठरून गेलेले आहेत.

रानटी स्थितींत असलेल्या समाजांमध्यें नैतिक कल्पना वेगळ्या असूं शकतील; प्रवासी मंगोपार्क यास रानटी ऑफ्रिकन लोकांनीं पकडून त्याचे मांसावर त्यांनीं चांगली चैन उडविली ही हकीकत मागें सांगितलीच आहे; परंतु ज्या समाजामध्यें याप्रमाणें पशुतुल्य वागणूक पहावयास मिळेल असे समाज सुदैवानें हल्लीं क्वचितच असतील ! आपली भूक शमविण्याकरितां मनुष्याची हिंसा करणें ही गोष्ट कोणता समाज हल्लीं चांगली म्हणेल ? ती सर्वत्र निंद्यच मानिली जाईल. परद्रव्यापहार करणें ही गोष्ट सर्वत्र निंद्यच मानली जाते. गीतेंत म्हटलें आहेः—

दातव्यमिति यद्दानं । दीयतेऽनुपकारिणे ॥
देशे काले च पात्रे च । तद्दानं सात्त्विकं स्मृतम् ॥ १

" दान करणें आपलें कर्तव्य आहे अशा बुद्धीनें योग्य स्थल, काल व पात्र यांचा विचार पाहून आपल्यावर उपकार न करणाऱ्यास जें दान देतात तें सात्त्विक म्हटलें आहे. "

या उक्तीप्रमाणें देश, काल व पात्रता पाहून परोपकार करणें ही गोष्ट कोण वंद्य मानणार नाहीं ? आपल्या मुलास राज्यप्राप्ति व्हावी म्हणून रामासारख्या थोर विभूतीस ज्या मत्सरबुद्धीमुळें अरण्यवास पतकरावा लागला त्या कैकेयीच्या मत्सरबुद्धीला कोण नांवें ठेवणार नाहीं? असल्या वागणुकीला सर्वत्र नाकच मुरडणार ! सारांश, समाजांतील महात्म्यांची श्रेष्ठ वर्तणूक व उदात्त वचनें व स्वतःचा अनुभव यांच्या योगानें सुसंस्कृत समाजांतील प्रत्येक मनुष्याची सदसद्विवेकबुद्धि पुरेशी तीक्ष्ण झाली असून मनुष्य आपल्या मानवी स्वभावास आतां चांगला ओळखूं लागला आहे. सद्गुण कोणते व दुर्गुण कोणते यांबद्दलची ओळख पटण्यास आपल्याला कितीशी अडचण पडते बरें? सज्जन व दुर्जन यांची निवड

करण्यास आपल्यास कितीसें अवघड जातें ? सज्जनांचा द्वेष करणारे दुर्जनसुद्धां त्यांचे चांगुलपणाबद्दल तारीफ करीत असतात असें पुष्कळ वेळां आपल्या पहाण्यांत येत नाहीं काय ? दुष्टलोक सुद्धां आपल्या कृत्याच्या हिडिसपणामुळें कधीं कधीं पस्तावलेले दृष्टीस पडत नाहींत काय? ज्याच्यामध्यें अनेक सद्गुण एकवटलेले आहेत अशा शिवाजी महाराजांसारख्या थोर विभूतीला लोक देवाप्रमाणें मानतात कीं नाहीं ? मनुष्याचें अंतःकरण शुद्ध आहे अथवा अशुद्ध आहे, तें सद्विकारप्रेरित आहे अथवा दुर्विकारप्रेरित आहे, याबद्दलचें बरोबर निदान करण्यास मुळींच अडचण पडत नाहीं.

म्यां आपुल्या चावुनि शुद्ध दांतें ।
चाखोनि घे मी शिवतें पदातें ॥

याप्रमाणें श्रीरामचंद्रास उद्देशून बोलणाऱ्या भिल्लीणीला शुद्धभावामुळें व्यवहार कळला नाहीं असें एक वेळ म्हणतां येईल; परंतु प्रभु रामचंद्राविषयीं तिचें अंतःकरण शुद्ध व प्रेमळ होतें असेंच म्हणावें लागेल ! मनुष्य सुरूप आहे अगर कुरूप आहे हें ओळखणें फारसें कठीण नाहीं; त्याचप्रमाणें, अंतःकरणवृत्ति शुद्ध अगर अशुद्ध आहेत हें ओळखणें विशेष अवघड नाहीं. अंतःकरण गंगाजळासारखें शुद्ध व स्वच्छ आहे किंवा डबक्यांतील घाणेरड्या पाण्याप्रमाणें तें अशुद्ध व घाणेरडें आहे हें कळण्यास कसली अडचण आहे ? व यांत अनिश्चितपणा तो कसला असावयाचा? मनुष्य दुर्वर्तन करण्यास प्रवृत्त होतो याचें कारण त्याला बऱ्यावाईट वर्तणुकीची जाणीव नसते हें नव्हे, तर आपल्या सद्बुद्धीला मागें सारून बेपरवाईनें जाणूनबुजून तो अनीतीचा अवलंब करतो.

शंका दुसरी:—केव्हां केव्हां अशी शंका घेण्यांत येते कीं, नीतिविषयक सिद्धांत बोलण्याला मोठे गोड व सोपे आहेत, परंतु त्याप्रमाणें प्रत्यक्ष वर्तन करणें हें काम फार दुर्घट आहे.

परोपदेशे पांडित्यं । सर्वेषां सुकरं नृणाम् ।
धर्मेस्वयमनुष्ठानं । कस्याचिद्धि महात्मनः ॥ १
—सभातरंग

" दुसऱ्याला उपदेश करणें हें सर्वांस सोपें आहे; परंतु त्याप्रमाणें स्वतः वर्तन करणें हें एकाद्याच महात्म्याला साधतें. " मनुष्याचे प्रकृतिधर्म जबरदस्त असल्यामुळें त्यांचें योग्य नियमन करून नैतिक उन्नति साधण्याचें काम कठिण असल्यामुळें, त्या कामांत प्रयत्न करण्यापासून कितीसा फायदा होणार आहे ? सूर्यबिंब धरण्याकरितां फक्त मारुतीनेंच उडी मारावी ! दुसऱ्यानें त्या फंदांत कशाला पडावें ?

" प्रांशुलभ्य फले लोभादुद्बाहुरिव वामनः ॥ "

" उंच माणसाच्या हाताला येणाऱ्या फळासाठीं लोभानें उंच हात करून तें घेण्याचा प्रयत्न करणाऱ्या जामुनाप्रमाणें ( माझी स्थिति आहे ) " या कालिदासाच्या उक्तीप्रमाणें उंच असलेलें फळ तोडण्यासाठीं धडपड करणाऱ्या जामून माणसाची ज्याप्रमाणें हास्यास्पद स्थिति होते त्याप्रमाणेंच नैतिक सिद्धांतांप्रमाणें प्रत्यक्ष वर्तणूक करणाऱ्या माणसाची स्थिति होते ! इसापनीतिमधील ' कोल्हा आणि द्राक्षें ' या गोष्टींतील कोल्ह्यानें द्राक्षें फार उंच असल्यामुळें तीं आंबट आहेत असें म्हणून पळ काढला; त्याचप्रमाणें, नीतितत्त्वें सुंदर असलीं तरी त्यांना प्रत्यक्ष कृतीचें स्वरूप देण्याचें काम अवघड असल्यामुळें, त्या बाजूचा प्रयत्न सोडून देणें हें फार बरें ! याप्रमाणें आक्षेप घेण्यांत येतो; परंतु हा आक्षेप बरोबर नाहीं. पर्वताच्या उच्च शिखरावर एकदम उडी मारण्याची हांव धरिली म्हणजे सर्वच डाव फसतो; शिखरावर जाऊन पोंचण्यास हळूहळूच प्रयत्न केला पाहिजे. त्याचप्रमाणें, नैतिक उन्नतीच्या श्रेष्ठ पायरीस पोंचण्यासाठीं हळूहळूच प्रयत्न झाला पाहिजे. काम अवघड

असलें म्हणजे तें अशक्य असतें असें नाहीं; मात्र तें साध्य करून घेण्यासाठीं दृढ निश्चय व दीर्घोद्योग या गुणांची अत्यंत जरूरी असते. अवघड कार्य साध्य करून घेण्याचा प्रयत्न आजीबात सोडून देणें केव्हांही इष्ट होणार नाहीं. काम दुष्कर असल्यामुळें तें अजीबात सोडून दिल्यास आपल्यावर कमकुवतपणाचा व नामर्दपणाचा आरोप येईल ! व आपण अक्षम्य अपराध केला असें होईल !

प्रारभ्यते न खलु विघ्नभयेन नीचैः ।

" कार्यांत विघ्न येईल या भयानें जे कामास आरंभ करीत नाहींत ते अधम कोटींतील लोक होत " ही कवि भर्तृहरीची उक्ति यथार्थ आहे. कार्याच्या कठिणपणामुळें आपण कार्याला आरंभच न करूं तर खरोखर आपल्याला आपण अगदीं हलक्या कोटींत नेऊन बसवूं !

शंका तिसरीः—आपलें शील कायम ठेवून जगांत वागण्याचें काम मोठें कठीण झालें आहे. सभोंवतालच्या परिस्थितीचा विचार करितां श्रेष्ठ नीतितत्त्वांचा अवलंब करून त्याप्रमाणें वागण्याचा प्रयत्न केल्यास आपण आपलें नुकसान करून घेऊं. भामटच्या डोक्यावरील पागोटें घेऊन जाऊं लागला तरी त्यास प्रतिकार न करितां स्वस्थ बसणें म्हणजे त्याच्या दुष्कृत्यास उत्तेजन देऊन आपलें विनाकारण नुकसान करून घेणें नव्हे काय ? जगामध्यें बऱ्यावाईट माणसाशीं प्रत्येकाचा नेहमीं संबंध येत असल्यामुळें " दिधलें दुःख परानें उसनें फेडूं नयेचि सोसावें " हा उपदेश आत्मघातास कारण नाहीं का होणार ? या आत्मघाताच्या कृत्यास कोणी सत्कृत्य म्हणेल काय ? या कृत्यास कोणीही दुष्कृत्यच म्हणेल ! व ज्या मनोवृत्तीमुळें याप्रमाणें दुष्कृत्य घडतें त्या वृत्तीला सद्वृत्ति कोण म्हणेल ? सारांश, व्यवहाराचा व नीतितत्त्वांचा मेळ बिल-

कूल बसत नाहीं, व परिस्थितीच्या दृष्टीनें पाहतां, नीतितत्त्वें व्यवहार्य नाहींत. याप्रमाणें कधीं कधीं आक्षेप घेण्यांत येत असतो. या आक्षेपाचा विचार केल्यास असें दिसून येईल कीं, सामान्य नीतितत्त्वांबद्दलच्या गैरसमजुतीमुळें हा आक्षेप उत्पन्न होतो. नीतिमत्ता म्हणजे दौर्बल्य नव्हे; व सत्कृत्याचा परिपोष करणाऱ्या सर्व गुणांचा नीतिमत्तेमध्यें अंतर्भाव होतो ही गोष्ट विसरली जाते. वर आयेंत लिहिल्याप्रमाणें थोड्याशा सोशीकपणानें व शांतीनें व्यवहारांत पुष्कळ कार्यभंग होतो असें केव्हां केव्हां दिसून येतें. खून करण्यास प्रवृत्त झालेल्या इसमावर दया केल्यामुळें त्याची दुष्टबुद्धि नष्ट झाली अशी हकीकत गौतमबुद्धाचे चरित्रामध्यें आहे. दयेनें क्रौर्याला जिंकावें असें बुद्धाचें वचन आहे; तथापि दया, सहनशीलता वगैरे सद्गुण परिस्थितीमुळें दुर्गुणांप्रमाणें हानिकारक होतात तेव्हां त्यांचा अवलंब करणें श्रेयस्कर होणार नाहीं. दूध अमृतासारखें गोड आहे, परंतु तापानें आजारी असलेल्या माणसास तें वाईटच आहे. दुधाच्या गोडीमध्यें केव्हांच फरक पडत नाहीं; फक्त परिस्थितीमुळें तें वेळेनुसार अग्राह्य ठरेल इतकेंच काय तें. यासाठींच श्रेष्ठ पुरुष व्यवहारांत केव्हां केव्हां कडकपणाचा व कठोरपणाचा आश्रय करीत असतात. उत्तररामचरित्रामध्यें कवि म्हणतोः—

वज्रादपि कठोराणि । मृदूनि कुसुमादपि ॥
लोकोत्तराणां चेतांसि । को हि विज्ञातुमर्हति ॥ १

—भवभूति

" श्रेष्ठ पुरुषांचें अंतःकरण वेळेनुसार वज्रापेक्षां कठोर बनतें व केव्हां फुलापेक्षांही मृदु होतें. लोकोत्तर पुरुषांचें अंतःकरण जाणण्यास कोण योग्य आहे बरें ? " सुपरिणामाकडे दृष्टी देऊन श्रेष्ठ पुरुष विचारपूर्वक कठोरपणाचा आश्रय करीत असतात. सत्कृत्य शेवटास नेण्यासाठीं कडकपणाची जरूरी असल्यामुळें, ते प्रसंगानु-

सार कठोर बनतात. सुईच्या अग्राएवढी सुद्धां भूमि कौरव पांडवांना देईनात; तरी सुद्धां संग्रामाचा अनर्थ टळावा म्हणून श्रीकृष्ण शिष्टाईस गेले; परंतु त्या शिष्टाईला कौरव मुळींच भीक घालीनात, तेव्हां न्यायाचें रक्षण करण्यासाठीं अखेर कठोरपणाचें अवलंबन करून संग्राम सुरू करावा लागला; तसेंच सीतेस परत देण्याविषयीं श्री रामचंद्रांनीं सुद्धां अंगदास शिष्टाई करण्यासाठीं रावणाकडे पाठविलें होतें परंतु त्याच्या शिष्टाईचा कांहीं उपयोग होईना, तेव्हां दयालु रामचंद्र न्यायाचें रक्षण करण्यासाठीं संग्रामास प्रवृत्त झाले. गीतेमध्यें म्हटलें आहे:—

परित्राणाय साधूनां । विनाशाय च दुष्कृताम् ॥
धर्मसंस्थापनार्थाय । संभवामि युगे युगे ॥ १

" साधूंचें रक्षण करण्यासाठीं व दुष्टांचा नाश करण्यासाठीं आणि धर्मस्थापनेसाठीं मी युगायुगांमध्यें जन्म घेतों. " दुर्वृत्तींचा नाश करण्यासाठीं व सद्वृत्तींचा उद्भय करण्यासाठीं दयाळु परमेश्वर सुद्धां वेळोवेळीं अवतार घेतात ! गोब्राह्मणांचें अन्यायापासून रक्षण करण्याचा उदात्त हेतु मनांत धरूनच शिवाजी महाराजांनीं सभोंवतालच्या दुःस्थितीचा नाश करण्यासाठीं केव्हां केव्हां कडकपणाचें अवलंबन करून सत्कृत्य शेवटास नेलें ! परंतु या कडकपणाचा उगम दयेपासूनच होत नाहीं काय ? सारांश, एकंदर परिस्थितीचा पूर्ण विचार करतां, जें कृत्य परिणामीं कल्याणकारक होतें तें शेवटास नेण्याकरितां जरूर अशा सर्व गुणांचा अंतर्भाव नीतिमत्तेमध्यें होतो; कारण हे गुण सत्कृत्याचा परिपोष करितात.

शंका चौथी:—चित्तवृत्ति स्थिर व शांत ठेवून कर्तव्य करीत गेल्यास नैतिक-उन्नति होत जाते असें ' शील आणि सत्कृत्य ' या प्रकरणामध्यें सांगितलें आहे; यासंबंधानें असा आक्षेप घेण्यांत येतो कीं, चित्तवृत्ति प्रक्षुब्ध झाल्याशिवाय कोणतेंही कृत्य मनु-

ष्याचे हातून पार पडणार नाहीं. घोड्यास चाबूक मारला म्हणजे तो पळत सुटतो; त्याचप्रमाणें, प्रक्षुब्ध झालेल्या मनोवृत्तींच्या जोरामुळें मनुष्य कोणतेंही कृत्य करण्यास प्रवृत्त होतो. चित्तवृत्ति क्षुब्ध होईनात तर मनुष्य हा मातीच्या गोळ्याप्रमाणें थंडगार व निर्जीव असा पदार्थ होऊन बसेल ! प्रसिद्ध नेपोलियन बोनापार्टीची महत्त्वाकांक्षा फार प्रबळ असल्यामुळें, त्याच्या हातून जगाला थक्क करून सोडणारे पराक्रम झाले! प्रसिद्ध शिकंदर बादशहाची जिगीषा फार बलवत्तर असल्यामुळें त्यानें सर्वत्र विजय संपादन केले व अखेर जिंकण्याकरितां नवीन देश सांपडेना म्हणून त्याला फार खेद झाला ! सारांश, मनोवृत्ति शांत राहिल्या तर कर्मप्रवृत्ति होणार नाहीं, असा हा आक्षेप आहे. या आक्षेपाचें उत्तर असें कीं, घोड्याला जर चाबूक मारून आपण पिटाळीत सुटलों तर घोडा उधळून जाईल व आपल्याला कोठें तरी फेंकून देईल ! त्याचप्रमाणें, मनोवृत्ति प्रक्षुब्ध होऊन मनाची शांति नष्ट झाली म्हणजे तें भडकून जाईल; व त्या भडकलेल्या स्थितींत कोणतेंही कार्य व्यवस्थित रीतीनें पार पडणार नाहीं. नदीच्या धारेंत सांपडलेला माणूस धारेच्या जोरामुळें धारेबरोबर बळेंच खेंचला जातो ! व याप्रमाणें खेंचला गेल्यावर तो कोठें जाऊन पडेल याचा कांहीं नेम आहे काय? नदीकांठीं असलेल्या वृक्षांचीं मुळें नदीस पूर आल्यावेळीं लोंढ्याच्या जोरानें उघडीं पडतात ! व मोठमोठे वृक्ष सुद्धां मुळांसकट उपटून पडतात ! प्रकृतीमध्यें वाताचें प्राबल्य झालें म्हणजे मनुष्य वाटेल तशी दांडगाई करीत सुटतो; परंतु त्या वेळीं त्याच्यामध्यें खरी शक्ति असते काय ? प्रकृति निकोप असतांना अंगांत शक्ति असेल तीच खरी शक्ति; वाताचे झटके हे शक्तीचे द्योतक नसून ते विकृतीचे द्योतक आहेत ! वारा सोंसाट्याचा सुटला म्हणजे ढग पार विसकटून जातात; परंतु मंद वाऱ्याची झुळूक सुटली म्हणजे

ढग एकत्र जमून पृथ्वीवर सुवृष्टि होते ! त्याचप्रमाणें चित्तवृत्ति स्थिर राहिल्या म्हणजे कार्याकार्यतेची बरोबर जाणीव राहून कार्य-सिद्धीस आवश्यक अशा सद्गुणांची योग्य वाढ होत जाते. काळोखांत सांपडलेल्या माणसाला विजेच्या अनियमित चमकीमुळें वाट कोठें दिसते ! अशा चमकीमुळें तो जास्तच गोंधळांत पडून अंधारांत वावरत सुटतो ! परंतु शांत व स्थिर अशा चंद्रप्रकाशामुळें वाट स्वच्छ दिसून तो उद्दिष्ट स्थळीं जाऊन पोंचतो. दोघांमध्यें श्रेष्ठ कोण याविषयीं सूर्य आणि वायु यांचेमध्यें एकदां तंटा सुरू झाला. या तंटयाचा निकाल कसा लावून घ्यावा याबद्दल ते विचार करूं लागले; इतक्यांत एक घोंगडी पांघरलेला प्रवासी त्यांच्या दृष्टीस पडला; तेव्हां दोघांनीं असें ठरविलें कीं, प्रवाशाला आपल्या अंगावरून घोंगडी काढावयास जो लाविल तो श्रेष्ठ. वायूला वाटलें कीं आपल्या सोंसाटयानें हें काम आपण तेव्हांच करून टाकूं; असें वाटून वायु त्या प्रवाशावर सोंसाटयानें वाहूं लागला; परंतु वायु जसजसा तुफान होऊं लागला तसतसा तो प्रवासी अंगास घोंगडी जास्तच लेपाटून घेऊं लागला ! वायूची ही स्थिति पाहून सूर्य वायूस म्हणाला, तूं बाजूला हो, मी आतां प्रयत्न करून पाहतों; असें म्हणून सूर्यानें हळूहळू प्रकाश पाडण्यास सुरवात केली तेव्हां त्या प्रकाशामुळें अंगांत ऊब आल्याबरोबर त्या प्रवाशानें घोंगडी चटकन् एकीकडे फेंकून दिली ! सारांश, चित्तवृत्ति प्रक्षुब्ध झाल्या म्हणजे कर्तव्यबुद्धि शुद्ध न राहतां ती क्षोभानें लेपाटली जाते व मग मनुष्याचे हातून कर्तव्य योग्यरीतीनें बजावलें जात नाहीं; आणि कर्तव्य नीटरातीनें बजावलें गेलें नाहीं म्हणजे कर्तव्यास जरूर अशा सद्गुणांची वाढ होण्यास वाव सांपडत नाहीं. परंतु चित्तवृत्ति स्थिर व शांत राहून कर्तव्य करीत गेल्यास उत्कृष्ट समाधानाचा लाभ होऊन सद्गुणांची अभिवृद्धि होत जाते.

शंका पांचवी:—नैतिक उन्नति हें मानवी आयुष्याचें रहस्य आहे व ती साध्य करून घेण्याचा प्रत्येकानें प्रयत्न केला पाहिजे असें मागें सांगितलें आहे; परंतु नैतिक उन्नतीचा मार्ग बिकट आहे व त्या बिकट मार्गाचें अवलंबन करून कदाचित् नैतिक उन्नतीचा लाभ झाला तरी त्यापासून विशेष असा कोणता फायदा आहे ? जगामध्यें नीतिमान् पुरुषांची चलती खात्रीनें होतेच असें वस्तुस्थितीवरून दिसून येत नाहीं; इतकेंच नव्हे, पण कित्येक सद्गुणी स्त्रीपुरुष आपत्तींमध्यें बुडून गेलेले कित्येकवेळां आपण पहात नाहीं काय ? खावें, प्यावें व मजा मारावी या तत्त्वानुरूप वागणाऱ्या लोकांचीच चलती असून तेच लोक सुखी असतात. याप्रमाणें कधीं कधीं आक्षेप घेण्यांत येत असतो; परंतु हा आक्षेप खरा नाहीं. पूर्वीं सांगितलेंच आहे कीं, नीतीच्या वागणुकीपासून मनुष्यास उत्कृष्ट समाधान होतें व त्यापासून मनुष्यास श्रेष्ठ सुखाचा लाभ होतो. खावें, प्यावें व मजा मारावी या तत्त्वानुरूप वागणाऱ्या लोकांस या श्रेष्ठ समाधानाचा व सुखाचा लाभ कोठून होणार ? जड शरीराचें कोड पुरविल्यामुळें होणारें सुख हें श्रेष्ठ सुख आहे असें म्हणतां येईल काय ? तसेंच या तत्त्वानुरूप वागणाऱ्या लोकांची जगामध्यें चलती चाललेली दिसते ती निवळ तकलुपी सोन्यासारखी असते. तकलुपी सोनें कांहीं वेळ झगझगीत दिसेल, परंतु त्यास खऱ्या सोन्याची सर येईल काय ? खऱ्या बावन्नकशी सोन्याचें तेज कायमचें टिकाऊ असतें; तसें या बेगडी सोन्याचें तेज कधीं तरी असूं शकेल काय ? त्याचप्रमाणें नीतिमान् पुरुषाचा आयुष्यक्रम श्रेष्ठ सुखानें भरलेला असून कल्याणकारक असतो. उत्कृष्ट नैतिक आचरणापासून कल्याणप्राप्ति होते. भगवान् गीतेंमध्यें असें निक्षून सांगतात कीं:—

न हि कल्याणकृत्कश्चिद् । दुर्गतिं तात गच्छति ॥

" पुण्यकर्मे करणाऱ्या कोणत्याही पुरुषास बाबा, दुर्गति मिळत नाहीं. " असो. वर लिहिल्याप्रमाणें नीतिमत्तेपासून श्रेष्ठ सुख व कल्याण यांचा लाभ होतो ही गोष्ट खरी; तथापि कोणत्याही मोबदल्याची अपेक्षा न करितां नीतीनें वागण्याचें कडक व्रत प्रत्येकानें पाळलें पाहिजे. सद्गुणांला सद्गुण हेंच बक्षीस होय. दुसऱ्या मोबदल्याची त्यांस बिलकुल जरूर नाहीं. याच अर्थाची इंग्रजींत म्हण आहे ती अशी:—

" Virtue is its own reward. "

" सद्गुणाला सद्गुण हेंच बक्षीस होय. "

कवि भर्तृहरि नीतिशतकामध्यें म्हणतो:—

अद्यैव वा मरणमस्तु युगांतरे वा ।
न्याय्यात्पथः प्रविचलन्ति पदं न धीराः ॥

" आज मरण असो अथवा तें दुसऱ्या युगांत असो; योग्य मार्गापासून श्रेष्ठ लोक एक पाऊलभरसुद्धां ढळत नाहींत. " ही कवीची उक्ति अर्थपूर्ण आहे. सारांश, कसलीही बिकट स्थिति प्राप्त झाली तरी थोर पुरुष नीतीच्या मार्गापासून कधींही भ्रष्ट होत नाहींत; कारण, शीलच्युतीचें समर्थन करण्यास कोणतीही सबब योग्य व पुरेशी होणार नाहीं.

REFBK-0001526
१५२६